
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. 2013.



REFBK-0015581



# बुद्धायन

( सर एडविन् अर्नोल्ड यांच्या ‘ लाइट आफ् एशिया ’ या जगविख्यात काव्याचा पद्यमय अनुवाद )

लेखक

गोपीनाथ तळवलकर

REFBK-0015581

आनंद कार्यालय, पुणें.

मूल्य सहा रुपये

प्रकाशक :
य. गो जोशी, व्यवस्थापक
आनंद कार्यालय,
१०१५ सदाशिव, पुणें

प्रथमावृत्ति, २९ नोव्हेंबर १९६६
सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २

विवेक आणि करुणा

यांचा संगम बुद्धदेवाप्रमाणेंच

ज्यांच्यांत झाला आहे त्या

**जगद्‌गुरु जे. कृष्णमूर्ति**

यांना सादर

**समर्पण**

प्रकाशक :
य. गो जोशी, व्यवस्थापक
आनंद कार्यालय,
१०१५ सदाशिव, पुणं

प्रथमावृत्ति, २९ नोव्हेंबर १९६६
सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणं २

विवेक आणि करुणा

यांचा संगम बुद्धदेवाप्रमाणेंच

ज्यांच्यांत झाला आहे त्या

**जगद्‌गुरु जे. कृष्णमूर्ति**

यांना सादर

**समर्पण**

# नि वे द न

## बुद्धभक्तीचें बीज

गेल्या तीन दशकांत ज्या लोकोत्तर विभूतींच्या शिकवणुकीचे माझ्या मनावर संस्कार झाले त्यांत भगवान् बुद्ध अग्रगण्य ठरेल. बुद्धाविषयींची माझी भक्ती एखाद्या दिव्य क्षणीं अकस्मात् निर्माण झालेली नाहीं. मस्तकावरील कुंतलभाराप्रमाणें ती हळू हळू नकळत वाढत गेली आहे. १९२८ मध्यें २–३ वर्षांचें स्थलांतर संपवून मी परत पुण्यांत आलों. त्यावेळीं औदासीन्य हाच माझ्या मनाचा स्थायी भाव होता. उच्च शिक्षणाचीं कवाडें ज्याला कायमचीं बंद झालीं आणि लायकी असून ज्याला खालच्या पातळीवर ( आणि तेंहि अकालीं ! ) योगक्षेमासाठीं कष्ट करावे लागत होते असा एक अननुभवी, पराभूत, दुर्बळ तरुण मी होतों. घर असून अनिकेत, व बुद्धि असून अल्पशिक्षित अशी माझी स्थिति होती. व्यावहारिक यश म्हणजे सर्व कांहीं नाहीं ही समज तेव्हां आली नव्हती. पंखांत बाण घुसून जखमी झालेल्या पक्ष्याप्रमाणें मी मोठ्या खेदानें मार्गक्रमण करीत होतों.

मात्र सर्वच कांहीं बिघडलें नव्हतें. श्रद्धा अढळ होती. सौंदर्यासक्ति आणि वाङ्मयप्रेम अंतःकरणांत ओसंडत होतें. भोवतालच्या सृष्टींत उच्च मूल्यांची बूज ठेवलेली प्रत्ययास येत होती. आणि याच वेळीं ‘ आनंदा ’चा सात्त्विक आसरा मला मिळाला होता. माझे पितृतुल्य गुरु. कै. वासुदेव गोविंद आपटे यांच्या प्रेमळ छत्राखालीं संपादकीय उमेदवारी करतांना फार समाधान वाटे. वासुदेवराव ‘ अशोक चरित्रा ’ची दुसरी आवृत्ति तयार करीत होते. त्या कामीं त्यांना मी हौसेनें मदत करीत असे. सम्राट् अशोकाचे शिलालेख त्यावेळीं प्रथमच वाचायला मिळाले आणि भगवान् बुद्धाच्या अमर संदेशाची

ओळख झाली. या संदेशाचें सामर्थ्य आणि सौंदर्य असें होतें कीं त्या कोवळ्या वयांत त्याच्या प्रभावानें मनांतलें विषण्णतेचें धुकें कमीं होत गेलें. पण विषण्णतेची पार्श्वभूमि नसती तर कदाचित् त्या संदेशाचें अलौकिकत्व कळलेंहि नसतें. कारण दुःख हें एकच धर्मज्ञानाचें माध्यम आहे.

पुढें वर्ष दीड वर्षानें बडोद्याला जाण्याचा योग आला. ती रमणीय सायंकाळ मी कधींच विसरणार नाहीं. संध्याकाळचें तांबुस सोनेरी रंग ' सुर-सागरां 'त प्रतिबिंबित झालेले होते. मांडवीचा नगारखाना व न्यायमंदिरांचीं शिखरें आकाशाच्या पडद्यावर मोठीं डौलदार दिसत होती. गुलाबी थंडीनें त्या धूसर वातावरणांत एक गूढ प्रसन्नता भरून राहिली होती. अशा वेळीं ' ज्युबिली बाग 'त आम्ही आलों आणि समोर बुद्धाचा पुतळा दिसला. मी अगदीं एकाग्रतेनें बुद्धाच्या मुद्रेकडे पाहूं लागलों. एवढी अगाध शांति कुठल्याहि मूर्तींत तोंवर मला आढळली नव्हती. मी भोवतालचें जग विसरलों. आतां मी आणि समोरची बुद्धमूर्ति एवढ्या दोनच गोष्टी उरल्या आहेत असें मला वाटलें. समाधि विसर्जन करून हा शाक्य मुनि आतां मला दोन धीराचे शब्द सांगणार आहे असा भास झाला. तेव्हांपासून माझ्या हृदय-मंदिरांत बुद्धाची प्रतिमा कायमची लावली गेली. पुढें बडोद्याशीं कायमचा ऋणानुबंध जडल्यानें तिकडे मी नेहमीं जातों. ' ज्युबिली बाग ' हें एक तीर्थ-क्षेत्रच होऊन राहिलें आहे.

बुद्धभक्तीला अशी सगुण रूपाची बैठक मिळाली आणि लगेच मीं ' आशियाचें धर्मदीप ' लिहावयास घेतलें. बुद्धचरित्राच्या लेखनासाठीं जुळवाजुळव करतानाच प्रस्तुत The Light of Asia या जगविख्यात काव्याचा परिचय झाला. आणि तेव्हांच उत्साहानें अनुवादास आरंभ केला. तो अनुवाद आज इतक्या दीर्घकालानें पुरा होत आहे. १९५६ सालीं पुणें आकाशवाणींत संयोजकाच्या जागेवर माझी नेमणूक झाली आणि माझें भाग्य असें कीं, लौकरच बुद्धाच्या अडीच हजाराव्या जन्मतिथीचा समारोह भारत सरकारनें मोठ्या थाटामाटानें साजरा केला. ' बुद्धदेव ' हें माझें लहानसें पुस्तक मीं त्याच वेळीं लिहिलें. त्यास लोकप्रियता आणि राजमान्यता एकदमच मिळाली. आकाशवाणीच्या कामांत मला कांहीं परदेशी बौद्ध विद्वानांचे लेख भाषांतरित करून ध्वनिक्षेपित करण्याचा योग आला. अशा रीतीनें या

चिंतनांत व अभ्यासांत गेलीं अनेक वर्षें मीं काढलीं आहेत. बुद्धभक्तीची गंगा गुप्तप्रकट स्वरूपांत गेलीं तीन दशकें माझ्या जीवनांत वहात राहिली. यामुळेंच अंतर्बाह्य शत्रूंच्या माऱ्यांतून निभावून इतपत समतोल मी टिकवूं शकलों. म्हणून आज अनेक वर्षांचें हें आवडतें वाङ्मयकार्य पुरें करून जनतेपुढें ठेवतांना बुद्धरूपी परमेश्वराला कृतज्ञतेनें प्रणाम करण्यास माझें मस्तक वाकत आहे.

## सौंदर्यवाद्याला कां आकर्षण आहे ?

बुद्धाचा उपदेश विवेकवादी आणि वास्तवाला धरून आहे. त्याला तर्काची खंबीर बैठक आहे. वरवर पाहिल्यास जगांतले उपभोग सोडून संन्यस्त व व्रतस्थ जीवन कंठावें असाच सूर त्यांतून ऐकू येतो. असें असतांही माझ्या सादर्यवादी मनाला बुद्धानें भारून टाकावें हें आश्चर्यच नव्हे काय? पण आश्चर्य तरी कसलें? बुद्धाच्या उपदेशांत कुठल्याहि प्रकारच्या धुंदीचा निषेध दिसत असला तरी त्याचें स्वतःचें चरित्र किती काव्यमय आहे! मध्यरात्रीं, ऐन तारुण्यांत सारें राजवैभव व लावण्यखनी पत्नी सोडून सिद्धार्थ धर्म-संशोधन करायला बाहेर पडतो ही एकच गोष्ट स्वप्नाळू व समर्पणशील वृत्तीला आकर्षित करायला पुरेशी नाहीं काय? त्या भव्य दिव्य मूर्ति, ती हृदयंगम लेणीं, ते विशाल स्तूप, तीं प्रचंड गुरुकुलें, ते पीतवस्त्रधारी बौद्ध-संघ-सर्वच कांहीं मोठें चित्ताकर्षक आहे. अफाट सागर आणि उत्तुंग पर्वत यांना न जुमानतां बौद्ध धर्म सर्व जगभर पसरत गेला याहि गोष्टीचें आकर्षण कांहीं कमी नाहीं. बुद्ध चरित्राभोवतीं कवींनीं रचलेली आरास आणि बुद्धाच्या उपदेशांत पदोपदीं आढळणारें काव्य यांयोगें मनाची सौंदर्यासक्ति पूर्णपणें तृप्त होतें. आणि म्हणूनच कर्मठपणा हा दोष मानणाऱ्या सौंदर्यवादी मनालाहि बुद्धाचें विलक्षण आकर्षण वाटतें.

परंतु हें आकर्षण केवळ मूर्ति, शिल्प, किंवा आख्यायिका यांचेंच आहे असें नाहीं. बुद्धानें जीवनाची शिस्त म्हणून जी सांगितली ती निर्वाणासाठीं नव्हे तर सौंदर्याच्या साक्षात्कारांसाठीं आवश्यक आहे. धर्मसाक्षात्कार झाल्या-नंतर धर्मप्रचारासाठीं निघालेल्या बुद्धानें सारनाथ येथें पहिल्या पांच भिक्षूंपुढें जें प्रवचन केलें तें अत्यंत हृद्य आहे. बुद्ध म्हणाला,

> “ भिक्षूंनो ! जगाचा त्याग करणाऱ्यांनें दोन टोकें टाळलीं पाहिजेत कोणतीं हीं दोन टोकें ? ऐषारामांत आयुष्य घालविणें हें एक टोक हें निष्फळ, अनुदात्त आणि अधोगतीला नेणारें आहे.
> कायाक्लेश करणें हें दुसरें टोक. हेंहि निष्फळ व अनुदात्त आहे आणि त्यांत वेदना फार आहेत. हीं दोन टोकें टाळून मी मध्यम मार्ग शोधून काढला. हा मार्ग शांति, शहाणपण, उच्च ज्ञान, आणि निर्वाण यांकडे नेणारा आहे. ” ( महावग्ग )

माझ्या मतें सौंदर्याचें खरेंखुरें दर्शन घडवून देणारा हाच मार्ग आहे. नुसत्या उपभोगानें खरें सौंदर्य आकळतां येत नाहीं. कारण उपभोगाचें सुख उत्कट असलें तरी तें क्षणभंगुर असतें. शिवाय त्या सुखाच्या मागून एक भयानक अशी विफलतेची, पश्चात्तापाची जाणीव येते. पोकळी निर्माण होते. आपण वरच्या पातळींवरून घसरलों अशी जाणीव होतें. आपणच कित्येकदां आपला तिरस्कार करूं लागतां. जीवनाची सारी लयबद्धता नाहींशी होते. आणि लयच नाहींसा झाला म्हणजे सौंदर्याशीं एकजीव कसें होता येणार ?

याच्या उलट कर्मठपणानें रसच रहात नाहीं. सौंदर्याचा आस्वाद घेण्याच्या आड ही स्थिति येते. एक प्रकारची निषेधात्मक भूमिका तयार होते. मधुर सुगंध, सुबक आकृति, मोहक संगीत, किंवा हृदयंगम शब्द यांचा परिणाम मनावर होऊंच नये असा बधिरपणा येतो. लय नाहींसा होण्याइतकीच ही गोष्ट घातुक आहे. सौंदर्याशीं समरस होता यावें यासाठीं लय आणि रस दोनही पाहिजेत. त्याप्रमाणें एक प्रकारची अलिप्तताहि पाहिजे. ‘ फुलांतील रंग व गंध यांची हानि न करतां भ्रमर जसा त्यांतील रस लुटून घेऊन जातो तद्वत् जो मुनि आहे त्यानें, गांवांत भ्रमराप्रमाणें वर्तन करावें ’ ( धम्मपद ) असें बुद्धानें म्हटलें आहे. आपल्या रसग्रहणाच्या सामर्थ्याला जो काबूत ठेवूं शकेल तोच सौंदर्याचा खरा उपभोक्ता म्हणतां येईल. ही कला साध्य होण्यास बुद्धानें उपदेशिलेला मध्यम मार्गच परिणामकारक ठरेल असें मला पूर्णपणें पटलें या मार्गावर सतत मला पावलें टाकतां आलीं आहेत असा माझा दावा नाहीं. अजूनहि मन पुष्कळदां दोन टोकांत लंबकाप्रमाणें हेलकावे खात राहतें आणि मध्यम मार्ग चुकून मी आडरानांत शिरतों. पण जेव्हां जेव्हां चार दोन पावलें त्या मार्गावर टाकायला मिळतात तेव्हां तेव्हां बुद्धानें प्रवर्तित

केलेला धर्म सौंदर्यवादाला पायाभूत आहे ही निष्ठा अधिक दृढ होते. एवढें प्रथम सांगितलें म्हणजे पुरें. यापुढील विवेचनांत यावर आणखी प्रकाश पडेलच.

## प्रगति आणि प्रतिक्रिया

जगाच्या इतिहासांत गौतमबुद्ध ही एक अलौकिक विभूति होऊन गेली याबद्दल आता मतभेद उरलेला नाहीं. विभूतीच्या कर्तृत्वानें इतिहास तयार होतो हा कार्लाइलचा सिद्धांत एकेकाळीं विशेष गाजला होता. पुढें मार्क्सनें आपला भौतिकवादाचा पक्ष सिद्ध करतांना आर्थिक परिस्थितीनें इतिहासाची घडण होतें असें प्रतिपादन केलें. या दोन्ही सिद्धांतांत जसें कांहीं सत्य होतें तशाच त्यांना कांहीं मर्यादाहि होत्या. विभूति इतिहासचक्राला गति देते हें खरेंच. पण आपल्या कर्तृत्वासाठीं जीं साधनें तिला वापरावीं लागतात तीं परिस्थितीनें बनविलेलीं असतात. त्या साधनांचा आवाका जेवढा असेल तेवढीच विभूतीला प्रगति करतां येते. सामान्यांपेक्षां महापुरुषाचा पल्ला खूपच लांब जाईल. पण त्या लांबीलाहि कुठेंतरी मर्यादा पडते. केवळ साधनें किंवा भौतिक परिस्थिति यांनींच इतिहास घडवला जातो असेंहि म्हणतां येणार नाहीं. ग्रेट ब्रिटनसारखी समुद्रवलयांकित बेटें जगांत काय थोडीं आहेत ? पण ग्रेट ब्रिटनप्रमाणें जगद्विजयी त्यांपैकीं कितीशीं झालीं ? म्हणजे समुद्राचें सांनिध्य एवढ्यानेंच कांहीं साहस आणि नेतृत्व येतें असें नाहीं. म्हणून विभूति किंवा परिस्थिति यांपैकीं एकच विचारांत घेऊन इतिहासाचा उलगडा होणार नाहीं. विभूतीचें कर्तृत्त्व आणि तिच्या भोवतीचें भौतिक वातावरण हीं दोन्ही विचारांत घेतलीं म्हणजे संपूर्ण दर्शन होतें. याच दृष्टीनें बुद्धाचें चरित्र पाहतांना त्या वेळची परिस्थिति आणि त्या वेळीं प्रचलित असलेलीं तत्त्वज्ञानें यांचा विचार करणें अगत्याचें आहे.

बुद्धासारखीं माणसें रूढ विचारांना पुढें नेतात आणि रूढ कल्पनांचा उच्छेदहि करतात. त्यांचें जीवन ही प्रगति असते आणि प्रतिक्रियाहि असतें. परंपरेमध्यें जें पुरोगामी आहे त्याचा विकास करणें आणि प्रतिगामी आहे त्याचा नाश करणें अशी दुहेरी कामगिरी बुद्ध किंवा येसू यांच्यासारखे प्रेषित साधतात. मागासलेले, प्रतिगामी, बुरसट असे जे असतील त्यांना या प्रेषि-

तांचें कार्य मूर्तिभंजक किंवा विध्वंसक वाटतें, वस्तुतः तें रचनात्मक असतें. “ मी विनाश करण्यासाठीं आलों नाहीं, तर पूर्तता करण्यासाठीं आलों आहे ” असें येशू म्हणाला त्याचें रहस्य हेंच होय. बुद्धाची भूमिका हीच होती.

## क्रांतीचीं स्पष्टास्पष्ट पावलें

बुद्धकालापूर्वी वैदिक मताचा या देशावर प्रभाव होता. उषा, अग्नि, पर्वत, सागर इ० सृष्टीचमत्कारांच्या प्रथम दर्शनानें चकित व किंचित् भय-भीत झालेल्या आर्यांनीं सुंदर सूक्तें रचिलीं. आणि निसर्गोपासनेचा एक संपन्न धर्म प्रतिष्ठित केला. यज्ञ संस्था निर्माण झाली. क्षत्रियांनीं दिग्विजय करून यज्ञ करावेत आणि ब्राह्मणांनीं पौरोहित्य करावें असा क्रम असे. वैश्यांना यांत द्रव्यदान करावें लागे. यज्ञाच्या समारंभापासून शूद्र वंचितच असायचे. उपनिषदांतलें आनंदमय असें सुंदर तत्त्वज्ञान मध्यंतरीं उदयाला आलें खरें पण त्यांत रममाण होऊन देहाचें सार्थक करणारे थोडे. बाकी मंत्र, तंत्र, जपजाप्य, शकुन, नवस, सिद्धि यांचाच वडिवार माजला. यज्ञाचें रहस्य त्यांत झाकळून गेलें. आणि वर्णाश्रमाच्या भिंती उंच घातल्या जाऊन सामाजिक जीवन खेळतें न राहतां डबक्यासारखें झालें. वैदिक धर्म मुळांत विजिगीषु, प्रवृत्तिवादी, व सर्वसंग्राहक असला तरी त्याचें तें स्वरूप या वेळीं भ्रष्ट झालें होतें. देशांत सुबत्ता होती. ग्रामराज्यें सुखानें नांदत होतीं. परंतु समाजजीवनांत सतत ताजे प्रवाह खळखळत राहायला पाहिजेत तसें मात्र होत नव्हतें. जातिवादाचा पगडा भयंकर असल्यानें कांहीं वरिष्ठ गट सुखाच्या नंदनवनांत होते तर नीच समजल्या गेलेल्या जातींना हें जग नरकासारखें वाटत होतें. उच्च राहणी किंवा भौतिक सुस्थिति ही फक्त कांहीं ठराविक गटांची मिरासदारी होती.

सांचलेल्या पाण्यासारख्या या समाजजीवनाला प्रवाही व गतिमान् कर-ण्याचा प्रयत्न कांहीं पंथ आणि क्रांतिदर्शी करीत होते. त्यांपैकीं जैनमत प्रमुख म्हणतां येईल. बुद्ध जन्माला आला त्या वेळीं महावीरानें अहिंसा-तत्त्वाची ध्वजा उंच उभी केली होती. महावीर हा जैनांचा २४ वा तीर्थंकर. म्हणजे बुद्धाच्या अगोदर कितीतरी वर्षें जैनांनीं वैदिक संस्कृतीला टोला देण्याचें

काम केलें होतें. जैन हा कर्मठ पंथ. अहिंसा, अपरिग्रह इ० व्रतांना अगदीं टोकाचें रूप जैनांनीं दिलें. यज्ञांतील पशुहत्येविरुद्ध ही प्रतिक्रिया होती. ती अतिरेकी असली तरी साहजिक व परिणामकारक होती.

या युगांतला एक क्रांतिदर्शी पुरुष मक्खली गोसाल हा होय. गोशाळेंत जन्मला म्हणून याला गोसाल म्हणत. हा दासीपुत्र होता. मालकाची तुपाची घागर डोक्यावर घेऊन चालला असता हा पाय घसरून पडला. मालक रागें भरील या भीतीनें घागर तशीच टाकून पळून गेला आणि विरक्त रीतीनें राहूं लागला. हा हातांत एक बांबू बाळगीत असे. याचा मार्ग 'संसारविशुद्धि' या नांवानें प्रसिद्ध आहे. माणसाला सर्व योनींतून गेल्याशिवाय मोक्ष मिळत नाहीं असें गोसाल म्हणे. म्हणजे यज्ञानें स्वर्ग मिळतो या श्रद्धेवर यानें प्रहार केला होता.

अजित केशकंबल हाहि असाच स्वतंत्र विचाराचा होता. हा केसाचें कांबळें पांघरीत असे म्हणून याला केशकंबल असें नांव पडलें. दान, यज्ञ, स्वर्ग या कल्पना यानें खोडून काढल्या. मानवी शरीर हें चार द्रव्याचें बनलेलें आहे आणि मरणोत्तर हीं चारहि द्रव्यें सृष्टींत विलीन होतात असें अजित केशकंबलचें म्हणणें होतें. याच्या मताला 'उच्छेदवाद' म्हणतात. नांवावरूनच त्याचें क्रांतिकारकत्व दिसून येते.

पूरणकाश्यप हा खानदानी कुळांतला होता. मालकाचें पहारेकऱ्याचें काम एकदां याला सांगितलें. त्यामुळें याला आपला अपमान झाला असें याला वाटलें. यानें लागलीच अरण्य गांठलें. तेथें चोरांनीं त्याला गांठलें. आणि त्याचीं वस्त्रें काढून घेतलीं. तो नग्नच हिंडूं लागला. पुढें तो गांवांत गेला असतां लोकांनीं त्याला वस्त्रें नेसायला दिलीं. तेव्हां पूरण म्हणाला, "वस्त्र हें लज्जेसाठीं आहे. आणि लज्जा ही पापप्रवृत्तीपासून उत्पन्न होतें. मी पापप्रवृत्तीच नष्ट करून टाकली आहे. मला वस्त्राचें प्रयोजन काय?" त्याच्या या क्रांतिकारी विचारसरणीचा लोकांवर फार परिणाम झाला. हा 'दिगंबर' पुरुष खून, चोरी, व्यभिचार याचा मानवी जीवनावर कांहीं परिणाम होत नाहीं असें मानी. कांहींसें चार्वाकाच्या सुखवादाशीं याचें मत जुळतें होतें. यांत पापाला उत्तेजन देण्याचा त्याचा मुळींच इरादा नव्हता. पुण्याचें तंत्र आणि व्रतवैकल्यें हें अवडंबर कसें फोल आहे हें याला दाखवावयाचें होतें.

ककुभ कात्यायन आणि संजय वेलातिपुत्त हीं नांवें याच पंक्तीला बसण्यासारखीं आहेत. वैदिक परंपरेनें यज्ञ-स्वर्गादि कल्पनेच्या जालांतून समाजाला वर खेचण्याचे हे लहानथोर प्रयत्न होते.

त्या काळीं असलेल्या अशा या प्रवाहांतून नवा, स्फूर्तिदायक, सर्वंकष विचार निर्माण करणें हें लोकोत्तर प्रतिमेचेंच काम होतें. आणि बुद्धानें तें योग्य रीतीनें पार पाडलें. वैदिक परंपरा भ्रष्ट किंवा प्रतिगामी झाली होती तरी बुद्धानें त्या परंपरेंतल्या चांगल्या गोष्टीचा उच्छेद केला नाहीं. उलट, पतंजलीचा योग, कपिलाचें सांख्यमत यांतला बराच भाग आपल्या उपदेशांत नवा उजळा देऊन घेतला. पापपुण्याच्या कल्पना ठोकळेबाज झाल्या होत्या हें खरें. पण चांगलें केल्यानें पुण्य लागतें असें नाहीं किंवा वाईट केल्यानें पाप जोडलें जातें असेंहि नाहीं या मतपंथामुळें सामाजिक अराजक माजण्याचा संभव फार होता. तत्त्वतः एखादी गोष्ट खरी असली तरी तिच्या प्रत्यक्ष आचाराला कांहीं भक्कम जाणिवेची पार्श्वभूमि नसेल तर ती समाजविध्वंसक होते. बहुजनहितासाठीं तळमळणाऱ्या भगवान् बुद्धानें हें नीट ओळखलें होतें म्हणून पडीक समाजरचनेवर आघात घालतांना केवळ अभावात्मक किंवा निकराच्या गोष्टी तो बोलत राहिला नाहीं. यज्ञांतल्या हिंसेला विरोध करण्यासाठीं त्यानें अहिंसातत्त्वाला आपल्या उपदेशांत जरूर प्राधान्य दिलें. पण त्याला त्यानें विवेकाची बैठक दिली. तें केवळ अधांतरीं, अगम्य किंवा अनाचरणीय करून ठेविलें नाहीं.

बुद्धानें आपला प्रचंड भिक्षुसांप्रदाय स्थापन केला हें खरें असलें तरी त्याचें तत्त्वज्ञान केवळ संन्यासासाठीं नाहीं. श्रमण आणि संसारी दोन्हीकरितां त्यानें नियम करून दिलें. संसारी माणसाच्या आचारधर्मांत नृत्य, संगीत इ. गोष्टींवर बहिष्कार नाहीं. कर्ज चुकविण्यासाठीं किंवा केवळ असाध्य रोग बरा करून घेण्यासाठीं कोणी संघांत शिरूं लागेल तर त्याला बुद्ध आपल्या संघांत प्रवेश देत नसे. फार काय, अवेळीं भटकत राहणें याहि गोष्टीचा त्यानें निषेध केला आहे! यावरून त्याची समाजाभिमुखता आणि मानवी स्वभावाचें ज्ञान सिद्ध होतें. एक देशव्यापी विचारपरंपरा निःसत्त्व आणि विकृत झालेली आणि तिच्याविरुद्ध सात्त्विक असंतोषाची कमीजास्त प्रमाणांत उठावणी कुठें कुठें होत चाललेली. अशा वेळीं लोकांचा गोंधळ उडूं न देतां

खऱ्या आचारावर व धर्मतत्त्वावर त्यांचें चित्त एकाग्र करणें महाकर्मकठीण होतें. लोकांना जें ज्ञान होतें त्याचाच आधार घेऊन त्यांना अज्ञाताकडे न्यायचें होतें. विलक्षण तर्कबुद्धि, दिव्य प्रतिभा, अगाध करुणा, अजोड संघटनाचातुर्य, आणि विशुद्ध व त्यागमय जीवन एवढी अलोट गुणसंपदा लाभल्याकारणानें धर्मप्रतिष्ठापनेचें काम बुद्ध या प्राचीन धर्मभूमींत एवढ्या यशस्वी रीतीनें करूं शकला.

बुद्धाच्या उपदेशाचा महत्त्वाचा विशेष हा कीं त्यानें इहलोकीच्या विजया-वर मुख्य भर दिला. मनुष्य भौतिक परिस्थितीच्या पलीकडे विचार करूं लागला की, अनेक गूढ प्रश्न त्याला भंडावून सोडतात. आपण कोण ? आलों कुठून ? जायचें कुठें ? हें जग कुणी निर्माण केलें ? मृत्यूनंतर या देहाचें काय होणार ? अशीं कोडीं त्याला पडतात. तत्त्वज्ञान किंवा धर्म यांचा उदय अशाच प्रश्नांतून झाला आहे. ही जिज्ञासा उच्च प्रकारची आहे. माणसाला इतर कोटींपासून अलग करणारी आणि देवकोटीकडे नेणारी शक्ति म्हणजेच ही जिज्ञासा होय. परंतु ही जिज्ञासाच कित्येकदां त्याला भोवतालच्या जगावर प्रभुत्त्व मिळविण्याच्या आड येते. त्याचा आत्मविश्वासहि कमी करते. म्हणूनच बुद्धानें या जिज्ञासेला फारसा थारा दिला नाहीं आणि मानवी जीवनाचा शुद्ध वास्तववादी दृष्टीनें विचार करून आत्मजय आणि माणसामाणसांतील संबंध यावर मुख्य भर दिला, आत्मानात्मविचाराच्या भोवऱ्यांतून मानवी मनाला बुद्धानें बाहेर काढलें आणि शुद्ध नीति शिकविली.

बुद्धाचे कित्येक अधिक जिज्ञासू शिष्य आत्मानात्म विचाराकडे मोहित होऊन जात. परंतु बुद्ध त्यांना तिकडून परत फिरायला लावी. एकदां एका शिष्यानें जगाचा स्रष्टा कोण यासंबंधीं कांहींतरी सांगाच असा बुद्धाजवळ आग्रह धरला. तेव्हां बुद्धानें त्याला सांगितलें, “ तुझ्या पायांत विषारी तीर घुसला आहे. तो काढून टाकणें हें तुझें कर्तव्य आहे. तो तीर कोणी मारला, कसा मारला याचा विचार करीत बसशील तर विष सर्वांगांत भिनून प्राणास मुकशील. तसें जीवनांतलें दुःख नाहींसें करणें हें तुझें काम आहे. तें कुणी निर्माण केलें याची चर्चा करीत बसण्यांत फायदा काय ? ”

‘ मज्झिम निकायां ’त आपली भूमिका भगवानानें मोजक्या शब्दांत स्पष्ट केली आहे.

" मालुक्य पुत्रा, मी काय सांगितलें नाहीं ? जग शाश्वत कीं अशाश्वत, जीव व शरीर एक का निराळें, मृत्यूनंतर मी असतों की नसतों या गोष्टी स्पष्ट करून मी सांगितल्या नाहींत. असें कां केलें म्हणशील तर त्याला माझें उत्तर असें आहे कीं या कथनापासून कांहीं फायदा नाहीं. या ज्ञानाचा वैराग्य, परमज्ञान इ० ना कांहींच उपयोग नाहीं. मग मी कोणत्या गोष्टी स्पष्ट केल्या ? माझ्या धर्माचा विषय म्हणजे इथें जगांत सगळें दुःख आहे, तें दुःख उत्पन्न होणारें आहे तसेंच नाश पावणारें आहे. त्या दुःखांचा अंत करणारा असा माझा धर्ममार्ग आहे. "

## आत्मप्रत्यय देणारा उपदेश

बुद्धाच्या या लोकोत्तर कामगिरीची प्रसिद्धि पुष्कळ झालेली असली तरी तिचें खरें रहस्य मात्र संपूर्णपणें आकलन झालें असें म्हणवत नाहीं. विभूति किंवा धर्मसांप्रदाय यांच्या मुख्य गाभ्याऐवजीं त्यांच्या कमी महत्त्वाच्या बाह्यांगावरच जगाची दृष्टि खिळून राहते. बौद्ध धर्महि याला अपवाद नाहीं. बौद्धधर्म म्हणजे यतींचा, संन्यासमार्गाचा पंथ हाच समज सर्वत्र रूढ आहे. निराशा आणि दुःख यांचा रांधा म्हणजे बौद्धमार्ग असें सांगितलें जातें. पण बुद्धानें प्रवर्तित केलेला धर्म हा झुंजार आहे हें विसरतां कामां नये. सुप्रसिद्ध सामर्थ्यपूजक जर्मन तत्त्वज्ञ नित्छे यानें ख्रिस्ती धर्मापेक्षां बौद्ध धर्म हा श्रेष्ठ कां आहे हें सांगतांना बुद्धानें आत्मजयावर भर दिला असें कारण सांगितलें आहे. मनुष्यानें जाणिवेची व आचाराची अधिकाधिक उंच पातळी गांठत जावी असा बुद्धाचा प्रयत्न होता. सर्वांत मोठें धर्मयुद्ध हें अंतरंगांत चालू असतें. तें जिंकणें याहून दुसरा थोर कुठला पुरुषार्थ कोणता असणार ? बुद्धानें व्यक्तीला माहात्म्य देऊन माणसाला स्वावलंबी केलें. " आत्मदीप व्हा. आत्मशरण व्हा. " असा त्याचा उपदेश आहे. कुणीहि परावलंबी राहूं नये यासाठीं आपली स्वतःचीहि महती मर्यादित आहे हें त्यानें दाखवून दिलें. " भिक्षूंनो ! माझ्या वचनांची परीक्षा करून मगच त्या स्वीकारा. केवळ माझ्या आदरानें भारावून ती पत्करूं नका. " ( परीक्ष्य ग्राह्यं मद्वचो न तु गौरवात् ) हें त्याचें वचन प्रसिद्ध आहे. मृत्युसमयीं शोकाकुल

झालेल्या आपल्या पट्टशिष्याला तो म्हणाला, "आनंदा, मी जात आहें याचें दुःख करूं नका. मी प्रवर्तिलेला धर्म तुमचा शाश्वतचा मार्गदर्शक आहे."

आपण आपलें जीवन निष्कारण सान्त म्हणजे मर्यादित करीत असतों. आपली जात, पंथ, पूर्वग्रह, कटु स्मृति, भवितव्याबद्दलचे भीषण विचार या आणि अशा गोष्टींनीं आपलें जीवन वेढलेलें राहतें. जगांत जें अनंतत्व भरून राहिलें आहे त्यांतून आपण आपल्याच जीवनाचा वेगळा लहानसा तुकडा पाडल्यानें असुरक्षिततेच्या भयानक जाणिवेनें आपण झपाटलें जातों. बिंदु हा सिंधूतून वेगळा काढला कीं तो सुकणारच. विश्वजीवनांतून आपण वेगळें झाल्यानें अशीच शुष्कता येते. मनांतली पोकळी सहन होत नाहीं. आणि ती भरून काढण्याकरितां काहीं कृत्रिम सुखोपभोगाचा मसाला आपण आंत ओततों. पण त्यानें खरें सुख न लाभतां अधिकच भडका उडतो. वर्तमान हाच अनंतत्त्वाचा खराखुरा प्रतिनिधी आहे आणि त्याच्याशीं समरस होणें हाच खरा अमृतानुभव. पण आपण वर्तमानाकडे पाठ फिरवून मागें पुढें पाहतों आणि जें लभ्य नाहीं त्याविषयीं शोक करतों.

We look before and after
And pine for what is naught.

या सुंदर पंक्तींत शेलीनें ही शोकांतिका रंगविली आहे.

याच शोकांतिकेला सुखांतिका कसें करतां येईल याचें बुद्धानें आमरण दिग्दर्शन केलें. एकदां कोणी बुद्धाला विचारलें कीं, "तुमचे भिक्षू वनांत राहतात, चिंध्या परिधान करतात, मिळेल तें खाऊन राहतात मग ते कांतिमान् कसे ?" त्यावर भगवानानें सांगितलें, 'माझे भिक्षू गताची चिंता करीत नाहींत आणि अनागताविषयीं विचार करीत नाहींत, मिळेल त्यावर संतुष्ट राहतात. म्हणून ते कांतिमान् आहेत.' प्रसन्नजीवनाचा मार्ग याहून थोड्या शब्दांत कुणीहि सांगितला नसेल. "**संतोषादनुत्तमसुखलाभः**" हें पतंजलीचें सूत्र या संदर्भांत विचारांत घेण्यासारखें आहे.

## बुद्ध दुःखवादी की वास्तववादी

सुखाचा असा दिव्य मंत्र सांगणारा बुद्धदेव 'दुःखवादी' किंवा 'निराशवादी' या निंदाव्यंजक विशेषणानें ओळखला जावा हें विचित्र नव्हे काय ? जग हें

दुःखमय आहे असें बुद्धानें सांगितलें यांत त्यानें कांहीं अतिशयोक्ति केली असें थोडेंच आहे ! बुद्ध वास्तववादी होता, अगदीं कठोर वास्तववादी होता. ‘ सर्वं दुःखम् सर्वं क्षणिकम् ’ हें दररोज प्रत्ययाला येणारें सत्य नाहीं काय ? तुरुंग, स्मशान, इस्पितळें, झोपड्या, रणांगणें, गलिच्छ वस्त्या, फूटपाथ इ. ठिकाणीं काय दिसतें ? फार काय आपण आपल्या घरीं किंवा शेजारीं सहानुभूतीच्या डोळ्यांनीं पाहिलें तर दुःखाचा भुजंग फूत्कार टाकीत वावरत आहे असेंच दिसून येईल. हेंच बुद्धानें आपल्या सामर्थ्यवान् शब्दांत प्रकट केलें. मात्र तेवढेंच सांगून तो थांबता तर त्याला ‘ दुःखवादी ’ म्हणणें उचित दिसलें असतें. तसें पाहिलें जगांत दुःख आहे हें कळणें हे वैदिक परंपरेतहि ज्ञानाचें एक लक्षण समजलें जातें. ( दुःखदोषानुदर्शनम्...एतद् ज्ञानम् -गीता ) बुद्धानें दुःखाचा नाश कसा करावा यावर भर दिला. ‘ सर्वं क्षणिकम् ’ असें सांगताना त्यानें ‘दुःखमपि क्षणिकम् ’ असेंहि म्हटलें आहे. दुःख हें पहिलें आर्यसत्य असें बुद्धानें मांडलें. पण त्याबरोबरच दुःखाचा विनाश, तो विनाश करण्याचा अष्टांगिक मार्ग हींहि पुढील आर्यसत्यें त्यानें सांगितलीं. राधाकृष्णन् हेंच विशद करतांना म्हणतात, “ माणसाच्या पापापेक्षा त्याच्या दुःखाची चिंता बुद्धाला अधिक होती. प्रत्येक माणसाला अर्हत्पदाची, बुद्धत्वाची पायरी गांठणें शक्य आहे हें ठामपणें सांगून बुद्धानें व्यक्तीला एक नवी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. मानवी आत्म्याचें महत्त्व हांच साऱ्या संस्कृतींचा पाया आहे. त्रस्त जगाची ती एकमेव आशा होय. ”

मनुष्य जेव्हां पंचमहाभूतांवर विजय मिळवूं लागला, पृथ्वी, आप, तेज इ. त्यानें जेव्हां वेठीला धरलें तेव्हां त्याला स्वतःचें सामर्थ्य पटूं लागलें. विज्ञानाच्या वाढीबरोबरच अंधश्रद्धा आणि भय यांचा ऱ्हास होत जाऊन माणसाला नवा आत्मविश्वास आला. स्वर्गनरकादि कल्पनाच्या भोवऱ्यांतून माणूस बाहेर आला. हा चमत्कार पश्चिमेकडे मध्ययुगांत घडला आणि गेल्या शतक-दीडशतकांत पूर्वेकडे त्याचा प्रभाव हळूं हळूं पडत आहे. मनुष्य हाच आपल्या भवितव्याचा शिल्पकार आहे याचा प्रत्यय अशा रीतीनें गेल्या ३-४ शतकांतच विज्ञानामुळें येत आहे. परंतु बुद्धदेवानें वीस शतकें अगोदर हा आत्मविश्वास जागृत केला होता. त्याचा संदेश विसरला गेल्यानें किंवा त्याचा विपर्यास झाल्यानें आत्मप्रत्ययाच्या अभावीं जग पुनः अंधारांत चाचपडत

राहिलें. आज विज्ञानानें पुनः कांहीं आशेचीं किरणें दाखविलीं खरीं. परंतु बाह्य सृष्टीवर विजय मिळविण्याचा मंत्र विज्ञानानें दिला असला तरी माणसाच्या अंतःसृष्टीवर प्रभुत्व कसें मिळवावें याचें मार्गदर्शन विज्ञान करूं शकत नाहीं. म्हणूनच आज सुधारणेचा पसारा एवढा वाढला, अंतरिक्षांत माणूस भ्रमण करूं लागला, चंद्र–मंगळापर्यंत आमचे अग्निबाण पोंचले तरी असुरक्षिततेचा व भीतीच्या जाणिवेनें मनुष्याचा आत्मप्रत्यय पुनः पंगूत्व होत आहे. आज बुद्धाच्या उपदेशाचें महत्त्व आहे तें याचसाठीं. बाह्यसृष्टीच्या ज्ञानाला माणूस जेव्हां आत्मजयाची जोड देईल तेव्हांच सारें ज्ञानविज्ञान माणसाला खरें सुख, खरी सुरक्षितता, आणि खरी शांति देऊं शकेल.

## जुना आदर्श मोडला नाहीं

बुद्धानें वैदिक धर्म नेस्तनाबूद करण्याचा खटाटोप केला नाहीं तर वैदिक धर्मांतील जीं मूल्यें मलिन झालीं होतीं, गंजलीं होतीं त्यांना त्यानें उजाळा दिला. सतत चलनांत असणारीं मूल्याचीं नाणीं गुळगुळीत होतात आणि त्यांवरील खरें मूल्य दिसेनासें होतें. कित्येकदां खोटीं नाणीं समाजांत प्रसृत होऊन खरीं नाणीं बाहेर जातात. चलनफुगवटा म्हणजेच समृद्धि असें चुकीनें समजलें जातें. अशा वेळीं सारें चलन तापलेल्या मुशींत घालून त्यांतला हिणकस भाग जाळून टाकणें आणि नवीं मूल्यें निर्मून त्यांचीं खरी किंमत निश्चित करणें हें काम एखाद्या असामान्य प्रेषिताला करावें लागतें. बुद्धाचें जीवितकार्य तें हेंच. माणसाला सामान्य कोटींपासून वरच्या पायरीकडे नेण्यासाठीं वैदिक धर्मानें एक आदर्श तयार केला होता. परमेश्वराच्या मुखांतून हा आदर्श निर्माण झाला आहे असा त्याचा दावा होता. हा आदर्श म्हणजे ब्राह्मण हा बुद्धाच्या कालापर्यंत अवनतीला पोचला होता. प्रस्थापित सत्तेची लाचारी आणि ऐषाराम याखेरीज या वर्गाला दुसरा छंद नसे. बुद्धानें या वर्गाची खरी वेदप्रणीत थोरवी दाखवून दिली आणि या आदर्शाचा गौरव केला, 'धम्मपदां'त बुद्धदेव म्हणतो—

"ज्याचेकडून शरीर, वाणी, आणि मन यांनीं पाप घडत नाहीं आणि या तीनही ठिकाणीं जो संयमी आहे त्याला मी ब्राह्मण म्हणतों."

" जटाजूटानें, जन्मानें किंवा गोत्रानें कुणी ब्राह्मण होत नाहीं. सत्य आणि धर्म यांचा आश्रय करतो तोच पवित्र आणि ब्राह्मण."

" ब्राह्मण मातेच्या उदरीं जन्माला आला म्हणून मी कुणाला ब्राह्मण म्हणत नाहीं. जो अपरिग्रही आणि त्यागी आहे तोच खरा ब्राह्मण."

" जो निर्भय, संगरहित, आसक्तिरहित आहे तोच ब्राह्मण."

हीं वचनें लक्षांत घेतलीं म्हणजे वेदप्रणीत ब्राह्मणाचा किंवा गीतेंतील स्थितप्रज्ञाचा आदर्शच बुद्धानें पुनः कसा जगापुढें मांडला हें दिसून येईल. बुद्धानें वैदिक परंपरेचा लोप केला नाहीं तर तिची संशुद्धि केली. श्रीमत् शंकराचार्यांसारख्या वैदिक परंपरेच्या जाज्वल्य प्रवर्तकानें '**योगिनां चक्रवर्ती.**' असा बुद्धाचा गौरव केला त्याचें रहस्य हेंच होय.

## बौद्धधर्मांतला ओलावा

दुःखाप्रमाणें रुक्षता हा बौद्धधर्माचा एक विशेष आहे असा गैरसमज रूढ आहे. अर्थात् या गैरसमजामागें कांहीं तर्कसंगति नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. जो धर्म निव्वळ विवेकावर आधारलेला आहे तो रसाळपणांत उणा पडणार हा कयास कांहीं फारसा चुकीचा नाहीं. भक्ति, ईशकृपा ( Grace ), यांयोगें वैदिक, खिस्ती, इस्लाम इ० धर्मांत भावनेचा भरपूर ओलावा आला. जीव व शिव यांचा संबंध, भक्तभगवंताच्या नात्यांतील अनेक पैलू, भक्ताचा हट्ट व देवानें आपलें देवत्व विसरून त्यांची घातलेली समजूत, देवाचीं विविध रमणीय रूपें इ० श्रद्धाविलास बौद्धधर्मांत असणें शक्य नाहीं. बुद्ध ईश्वर मानीत नव्हता. निदान ईश्वराच्या आस्तित्वाबद्दल त्यानें मुग्धता धारण केली होती. त्याच्या अनुयायांनीं आणि भक्तांनीं जरी त्याला देवपदावर चढविलें तरी स्वतः तो या कल्पनेला थारा देत नसे. त्याला वैयक्तिक देव ( Personal God ) मान्य नव्हता हें सिद्धच आहे. अर्थात् या धर्मांत एकंदर ज्ञानाला प्राधान्य आलें, भावना मागें पडली तर नवल नाहीं. ईश्वरी लीलांचा ओलावा नसलेलें बौद्धवाङ्मय, वेद, बायबल किंवा संतवाणी यासारखें रसपूर्ण नसेल, नसावें असाच ग्रह सर्वत्र रूढ आहे.

परंतु परंपरेला ओलावा यायला केवळ सगुणनिर्गुणाची उपासना एवढा मार्ग आहे असें थोडेंच आहे ! आस्तिक्यबुद्धि किंवा श्रद्धा जरूर पाहिजे.

पण ती परमेश्वराबद्दलच असावी असेंच कांहीं नाहीं. मानव जातीबद्दल अगाध करुणा ही बुद्धदेवाच्या जीवनाची आणि उपदेशाची गंगोत्री आहे. त्या करुणेनें त्याच्या चरित्राला आणि सांप्रदायाला जीवनरस पुरविला. स्वामी विवेकानंदांसारखे वैदिक धर्माचे कडवे अनुयायी देखील बुद्धाचा गौरव करतांना बुद्धचरित्रांतील याच भागाचा मुख्यतः उल्लेख करतात. त्यांच्या मतें खरें बुद्धत्त्व तें हेंच. आपल्या भिक्षूंना ' बहुजनहिताय बहुजनसुखाय ' संचार करा असें बुद्धानें सांगितलें. ऐन यौवनांत व्याधिग्रस्त, जरत्कारू अशीं माणसें पाहून बुद्धाला कांहीं स्वतःच्या भवितव्याबद्दल दहशत निर्माण झाली नाहीं; तर मानवजातीविषयींच्या करुणेनें त्याचें मन उचंबळून आलें. बोधिवृक्षाखालीं धर्मसाक्षात्कार झाल्यावर दुष्ट प्रवृत्तीचा सैतान ( मार ) त्याला म्हणता कीं, " तुझें काम झालें. आतां सुखानें रहा. " तेव्हां बुद्धानें उत्तर दिलें कीं, " आता तर माझें काम सुरू झालें. मला मिळालेला सुखशांतीचा मार्ग सर्व जगाला शिकविल्यावांचून माझें खरें समाधान होणार नाहीं. " केवळ आत्मजय एवढीच साधना बुद्ध सांगत नाहीं तर जगाच्या दुःखाचें हरण करणें हेंहि तो धर्माचरणाचें आवश्यक अंग असें म्हणतां. फार काय, ' ब्रह्मविहार ' ही जी साधकाची परमोच्च स्थिति तीमध्येंहि मानवाच्या सुखाचा विचार हाच प्रमुख असला पाहिजे असें त्यानें सांगितलें आहे. ' मेत्रसुत्तां ' बुद्ध म्हणतो--

> " माता ज्याप्रमाणें आपले प्राण वेचून आपल्या एकुलत्या एक पुत्राचें रक्षण करते त्याप्रमाणें सर्व प्राण्यांबद्दल अमर्याद प्रेमभावना वाढवावी. " " वर, खालीं, मध्यंतरीं सर्व मानवांविषयीं अबाधित स्नेह आणि निरतिशय अशी मित्रभावना वाढवावी. "
>
> " उभे असतां, चालत असतां, बसलें असतां, झोपलें असतां, जागृत राहून मैत्रीची भावना कायम ठेवावी. "
>
> " या भावनेलाच या लोकांचा ब्रह्मविहार असें म्हणतात. "

यावर अधिक स्पष्टीकरण करण्याची जरूरी नाहीं. मात्र एका रससिद्ध कवीनें यावर केलेल्या सुंदर भाष्यांतला एक लहानसा उतारा देण्याचा मोह अनावर होतो. विश्वकवि रवीन्द्रनाथ या ब्रह्मविहाराचें रहस्य सांगतात--

" सर्व विश्वाच्या ठायीं व्यापून राहिलेलें आणि आईच्या आपल्या पुत्रावरच्या प्रेमाप्रमाणें सर्वांवर प्रेम करणारें असें जें ब्रह्माचें अपरिमित मानस, त्या मानसाबरोबर आपलें मानस मिळविणें हा ब्रह्मविहार. त्या प्रेमाबरोबर आपलें प्रेम मिळालें नाहीं तोंवर ब्रह्मविहार होऊं शकत नाहीं...ईश्वराविषयीं आपले ठायीं प्रेम उत्पन्न झालें आहे कीं नाहीं या संबंधानें आपणा स्वतःसच भूल पडण्याचा संभव आहे. पण सर्वांना पोचण्याइतकें आपलें प्रेम विस्तृत झालें आहे कीं नाहीं, आमच्या मनांतला द्वेषभाव कमी झाला आहे कीं नाहीं, आपला मंगलभाव वाढला आहे कीं नाहीं, याचें प्रमाण निश्चित करणें कठीण नाहीं. कांहीं एक निर्दिष्ट साधनमार्ग प्राप्त करून घेण्याविषयीं मनुष्याच्या ठायीं व्याकुलता असते. बुद्धदेवानें एकीकडे ध्येय जसें उच्च ठेविलें —तें खालीं आणिलें नाहीं—त्याप्रमाणें त्यांनीं तें खूप स्पष्ट करूनहि सांगितलें, "

बौद्धधर्म आणि वाङ्मय यांतला जिव्हाळा या अगाध मैत्री भावनेंतून निर्माण झाला आहे. आणि आजचें विज्ञानपीडित जग ईश्वराविषयीं कदाचित् अश्रद्ध असेल पण मानवाविषयींची मैत्री त्याला मान्य आहे. किंबहुना तोच आजचा धर्म आहे. या दृष्टीनें बौद्ध परंपरेला ओलावा आजच्या जगाला विशेष सुभग व आकर्षक वाटावा हें ओघानेंच येत नाहीं का! वेल्ससारखे तत्त्वज्ञ इतिहासकार म्हणूनच म्हणतात कीं, " आजच्या जगाला जर कोणता एकच धर्म पत्करायचा असेल तर बौद्ध धर्म होय. " शौपेनहारसारखा दुःखवादी दार्शनिक आपल्या टेबलावर बुद्धाची सुवर्णप्रतिमा ठेवीत असे आणि अनातोल फ्रान्ससारखा संशयवादी पण मानवतेविषयीं जिव्हाळ्या असलेला कलाकार शांतीसाठीं बुद्धचरित्राकडे जाई. हें पाहिलें म्हणजे बुद्धाच्या उपदेशांत रुक्षता आहे असें कुणीहि आधुनिक म्हणणार नाहीं. बुद्धाच्या उपदेशांतला ओलावा ईश्वरभक्तींतून निर्माण झाला नाहीं तर मानवप्रेमांतून निर्माण झाला आहे. आधुनिक जगाला त्याचें आकर्षण तें याचमुळें.

## निसर्गप्रेम

बौद्ध वाङ्मयांतला ओलावा करुणा किंवा मैत्री या भावनेनें जसा आला

आहे तसा तो निसर्गप्रेमानेंहि आलेला दिसेल. ज्या भावनेमुळें मनुष्य लोभमोहानें ग्रस्त होत नाहीं अशा भावनेंत विहार करायला बौद्ध धर्माची कांहींच हरकत नव्हती. " दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो " अशी बुद्धदेवाची दिनचर्या असे. नगराबाहेर एखाद्या रमणीय राईत किंवा शांत गुहेंत तो रहात असे. पण भिक्षा व धर्मचर्चा यासाठीं तो नगरांत येई. मानवी समाजाबद्दलची करुणा आणि निसर्गाचें प्रेम यांचा असा सुंदर मिलाफ त्यानें घातला होता. पावसाळ्यांत तो बराच काळ अरण्यवासीच असे. एखाद्या कातळावर उभे राहून भोवतालचा विस्तीर्ण प्रदेश, जलाशय, सूर्याचे उदयास्त किंवा चंद्राची सुषमा तो न्याहाळीत राही. निसर्गाच्या प्रेमानें त्याचें अंतःकरण ओसंडत असे. यातूनच कित्येकदां पूर्वी स्फुरलेल्या तत्वाचे अंधुक आकार स्पष्ट व रेखीव होत जात. ' चित्रं जंबुद्वीपम् । मनोहरं जीवितं मनुष्याणाम् ' ( हा भारतदेश किती सुंदर आहे, मनुष्याचे जीवितही किती मनोहर आहे ! ) असे संतोषाचे उद्गार बुद्धानें वैशाली सोडतांना काढले.

विजनाविषयींची ही बुद्धाला वाटणारी ओढ त्याच्या अनुयायांतहि दिसून येते. उत्तुंग शैलाचें सांनिध्य हें तपस्येला अतिशय पोषक होतें असा बौद्ध-भिक्षूंना अनुभव येई. प्राचीन बौद्धवाङ्मयांतल्या कांहीं कविता ओल्डेनबर्ग यांनीं अनुवादित केलेल्या आहेत. त्यांत आढळून येणारी निसर्गसौंदर्याबद्दलची आस्था वर्डस्वर्थ, बालकवि इ. निसर्गपूजक कविवर्यांच्या तोडीची आहे.

> " एखादा बगळा दिसतो. त्याचे ते निर्मल शुभ्र पंख काळ्याभोर वादळी मेघाच्या तडाख्यांतून सुटण्याकरितां विस्तारले आहे, घिरट्या घालतां घालतां त्याला निवाऱ्याची जागा मिळत आहे. हें पाहिलें कीं माझ्या मनाला आल्हाद वाटतो. "
>
> " उदासवाण्या धूसर आकाशांत वादळी मेघाच्या दुंदुभी झडत आहेत. मुसळधार पावसानें पक्ष्यांचे मार्ग रोखून टाकले आहेत. अशा वेळीं धर्मबंधु डोंगरांतील एक गुहेंत एकटाच बसला आहे. आत्मानात्मविचारांत त्याचा लय लागला आहे. याहून कोणता उच्चतर आनन्द मानवी प्राण्याला मिळेल बरें ? "
>
> " घनदाट अरण्यांत एखाद्या वृक्षाखालीं मी उभा राहतों. घटकेंत पर्वतावरील गुहेंत जातों. अशा वेळीं माझें हृदय आनंदोर्मीनें भरून

येतें. तप्त झालेल्या धरणीवर पावसानें शिंपण केलें आहे. वाऱ्याच्या गार झुळुका वहात आहेत. आकाशांत विजांचा संचार चालला आहे. मनावरील पटल नाहींसें झालें आहे आणि माझ्या अंतःकरणांत परम तत्त्वानें आपला अंमल बसविला आहे. ”

या कवितांवरून निसर्गाच्या भव्य रूपांत आपला जीवात्मा मिसळून टाकण्याचा बौद्धभिक्षूंचा प्रयत्न स्पष्ट होईल. भारतांतील प्राचीन धर्म व तत्त्वज्ञान हें अरण्यांतच जन्म पावलें. बौद्ध धर्म त्याच परंपरेंतला आहे.. ‘ वन्य भावना ’ ( अरण्य सञ्ज्ञी ) ही साधनेंतलीं एक आवश्यक गोष्ट बौद्ध भिक्षू मानीत. भगवद्गीतेंतहि ‘ विविक्तदेशसेवित्त्वम् ’ हें ज्ञानाचें एक लक्षण मानलें आहेच. तपाला योग्य स्थान कोणते ? यावर ज्ञानेश्वरांनीं केलेलें काव्यमय विवरण रसिकांनीं अवश्य वाचावें. धर्मचिंतन करणाऱ्या या श्रमणसंघांत लोकोत्तर प्रतिभेचे कलाकारहि होते. गिरिकंदरी हिंडतां हिंडतां त्यांना प्रतिभेचें स्फुरण झालें आणि या कलाकारांनीं आपल्या छिनीनें व कुंचल्यानें खडकांतून अद्भुत चित्रसृष्टि निर्माण केली. अजंठा, कार्ले येथील रंगरेषांचें गूढ सौंदर्य हा आजच्या सुधारलेल्या जगालाहि एक चमत्कार वाटतो. हीं लेणीं आणि भित्तिचित्रें बौद्धधर्मातील काव्यमयतेचीं उत्कृष्ट प्रतीकें होत.

एका प्रसिद्ध पाश्चात्त्य लेखकानें म्हटलें आहे कीं, बुद्धानें आत्म्याशिवाय पुनर्जन्म कल्पना मांडली आणि देवाला वगळून धर्म स्थापन केला. पण बुद्धानें भरच मुळीं वेगळ्या गोष्टींवर दिला. जगाचें कोडें उकलेल कसें यापेक्षां जगाचें दुःख नष्ट कसें होईल याकडे त्यानें अधिक लक्ष पुरविलें. आपण जन्माला कां आलों ? आपल्यामागें दुःख कां लागलें ? या मूलभूत प्रश्नापासूनच त्यानें सुरुवात केली. तृष्णेपासून दुःख उद्भवते. त्या तृष्णेचाच जर नाश केला तर दुःख आपोआप गळून पडेल हें त्याचें मुख्य विचारसूत्र होतें.

पण तृष्णा ही सहजासहजी नाहींशी होणारी गोष्ट नाहीं. मुख्य समस्येवर चित्त एकाग्र करणें आणि गूढ चिंतन यायोगेंच तृष्णेचा नाश करतां येईल हें त्यानें सांगितलें. चित्ताची एकाग्रता ही शिस्तबद्ध संयमी जीवनानेंच प्राप्त होणारी गोष्ट आहे. यासाठीं योग्य विचार, योग्य संकल्प, योग्य भाषण, योग्य व्यवसाय, इ. अष्टांगिक मार्ग आचरला पाहिजे. मन हें सारथी आहे आणि इंद्रियें हे लगामानेंच घोडे आहेत. संयमाच्या हे घोडे ताब्यांत राहतात.

ते घोडे उधळतील इतका लगाम ढिला करतां उपयोगीं नाहीं अथवा त्यांची गति कुंठित होईल इतका तो ताणूनही धरणे योग्य नाहीं. आत्मजय हाच अखेर खरा पुरुषार्थ होय.

पण मनुष्यजीवन हें जितकें व्यक्तिगत आहे तितकेंच तें सामाजिकहि आहे. आत्मजयानें मनःशांति मिळाली तरी समाजजीवनाचा भाग उरतोच. आणि मनःक्षोभ होण्याचा प्रसंग तेथें तर वारंवार येणार. म्हणूनच प्राणि-बद्दल अपार करुणा माणसानें बाळगली पाहिजे. आत्मजयानें मिळालेली शांति आमरण टिकायची असेल तर करुणेच्या रसायनांत ती सतत बुडलेली असणें अवश्य आहे. म्हणूनच बुद्धानें सांगितलें कीं, नैतिक जीवन हें केवळ मनुष्याला व्यक्तिगत सुखशांती देण्यासाठीं आवश्यक आहे असें नाहीं तर समाजजीवन सुस्थित ठेवण्यासहि त्याची जरूरी आहे. जो तृष्णेच्या आहारीं गेला तो माणूस स्वतः तर संत्रस्त राहीलच, पण आपल्या बांधवांच्या वेदना कळणेंही त्याला शक्य नाहीं. माणसाला नैतिक अधिष्ठान असल्याशिवाय तो व्यक्ति म्हणून किंवा सामाजिक घटक म्हणून यशस्वी होणें शक्य नाहीं.

बुद्ध हा मूलतः नैतिकतावादी होता. मात्र त्यानें क्रांति केली ती ही कीं देव, यज्ञ, स्वर्ग इ. कल्पनांना संक्षेप देऊन माणूस हाच आपल्या नैतिक जीवनाचा मुख्य आधार व भाग्यविधाता आहे असें त्यानें आग्रहानें प्रति-पांदन केलें. विवेक बुद्धीला प्राधान्य देऊन माणसाचा आत्मा स्वतंत्र व स्वावलंबी केला. बुद्धाला अतींद्रिय ज्ञानाची पूर्ण अटकळ होती. पण हें ज्ञानही तर्क व विवेक याच्या निकषावर घासूनच घ्यावें या मताचा तो होता. या दृष्टीनें तो जितका पुरातन तितकाच आधुनिक आहे असें म्हणतां येईल. विवेकवाद, लोकशाही, सहिष्णुता, शांतिवाद इ. आजच्या साऱ्या मूल्यांचें स्पष्ट दर्शन बुद्धाच्या उज्ज्वल उपदेशांत होतें

मनुष्य जन्माला येतो तेव्हां त्याचें अंतरंग पुष्कळ विकारांनीं भरलेलें असतें. हे विकार ताब्यांत आणून, आणि त्यावर प्रभुत्व मिळवून जेव्हां तो समर्थ होईल तेव्हांच तो दुःखमुक्त होईल. बुद्धानें निर्वाण कल्पना काढली ती या मुक्ततेची परम सीमा आहे ‘ संयुक्त निकायांत ’ राधेला उत्तर देतांना बुद्ध म्हणतो, “ तृष्णेचा नाश हेंच निर्वाण. ‘ धम्म-पदांत ’ म्हटलें आहे, ‘ सर्वांत उत्तम लाभ आरोग्य. सर्वांत उत्तम धन

संतुष्टता, सर्वांत खंबीर मित्र आत्मविश्वास; आणि सर्वांत श्रेष्ठ सुख निर्वाण.' निर्वाण या स्थितीबद्दल विद्वानांत बरेंच वादंग माजलें असलें तरी साध्या निकोप मनाला तें मोठेंसें कोडें नाहीं. एका विकाररहित आनंदमय वातावरणांत मन जाणें हीच निर्वाणप्राप्ति होय अशा उच्चतम अवस्थेची कल्पनाच मनुष्याला नसते असें म्हणणें चुकीचें ठरेल. ही अवस्था एकदम एकाद्या अपघाताप्रमाणें सिद्ध होते असें नाहीं. साधकाला त्यासाठीं खडतर तपश्चर्या करावी लागते. पण ही तपश्चर्या करीत असतांनाच मधून मधून त्या अवस्थेच्या सीमेला मन स्पर्श करून येतें. साक्षात्काराचे हे क्षण नीट उमगून ते चिरस्थायी करण्यासाठीं झटणें हीच खरी साधना.

बुद्धानें आपल्या उपदेशाला कुठल्याहि प्राचीन ग्रंथाचा आधार घेतला नाहीं. आत्मप्रचीति हें एकच प्रमाण त्यानें ठरविलें; आणि हेंच प्रमाण आपल्या आनुयानांनींहि मानावें असा त्याचा आदेश होता. पोथीवर किंवा भक्तीवर आधारलेल्या धर्मांना पुष्कळदां आग्रहाचें आणि माथेफिरूपणाचें स्वरूप येते. जगांतील प्रमुख धर्मांचा इतिहास असल्या माथेफिरूपणाच्या राक्षसी लीलानीं बरबटलेला आहे. असल्या असहिष्णुतेपासून बुद्धानें मनुष्य-जातीला वांचविलें. उदात्त तत्वें हीं केवळ अधांतरीं आहेत असल्या भोळ्या भावानें तीं आचरण्याचा सल्ला त्यानें दिला नाहीं. प्रत्यक्ष प्रयोगानें येणाऱ्या प्रत्ययावरच त्यानें आपला उपदेश आधारला म्हणून विरोधाच्या कसल्याहि झंझावातानें तो उखडला जाण्याचें भय नाहीं. 'द्वेष' वाईट कां? पुराणें म्हणतात तो सत्त्वगुणाला विरोधी आहे म्हणून नव्हे. द्वेषामुळें आपली मनः-शांति आणि त्याचबरोबर मनःसामर्थ्य ढासळतें ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. आणि म्हणूनच द्वेष व्याज ठरतो. क्रोधानें क्रोधाचा नाश होत नाहीं तर अक्रोधानेंच तो होतो. हें केवळ गोड पण अव्यवहार्य असें वचन नाहीं. रागाचा सूड तितक्याच कडवट भावनेनें घेण्याचा प्रयत्न जेथें जेथें होतो तेथें तेथें रागाची धग दोन्ही बाजूंनीं अधिक वाढत जाते. आणि त्या प्रमाणांत हिंसेचा अंमलहि अधिक बसूं लागतो; त्याबरोबर भयहि वाढते आणि निर्मळ आनंदा-वर जबरदस्त सावट पडतें. हा नित्याच्या जीवनांत येणारा अनुभव आहे. 'हिटलरचा नाश करण्याकरितां भयानक संहारक अस्त्रे तुम्ही वापराल तर हिटलर मरेल पण त्याचें भयंकर हिंसात्मक तत्त्वज्ञान मरणार नाहीं, उलट

हिंसेचें तांडव अधिक वेगानें सुरू होईल. ' म्हणजे हिटलच्या शरीराचा नाश करून तुम्ही सवाई हिटलर झाला तर हिटलरचा तो पराभव नव्हे, तर तो मोठाच विजय होईल. असा इशारा दोस्त राष्ट्रांना गांधीजींनीं दुसऱ्या महा-युद्धाचे वेळीं दिलेला होता. आजचें थंडें युद्ध आणि संहारक शस्त्रें वाढविण्या-बद्दल वड्या राष्ट्रांत चाललेली चढाओढ पाहिली म्हणजे गांधीजींचा इषारा किती योग्य होता हे कळून येईल. क्रोधाचा नाश अक्रोधानें केला तरच खरी शांति प्रस्थापित होते. महाभारतकारांचें एक वचन या संदर्भात फार मननीय वाटेल.

मृदुना दारुणं हन्ति । मृदुना हन्त्यदारुणम् ।
नासाध्यं मृदुना किंचित् । तस्मात् तीक्ष्णतमं मृदु ॥

( भयंकर गोष्टीचा नाश मृदुतेनें करता येतो. भीषण नाहीं त्याचाहि मृदुतेनें नाश करतां येतो. मृदुतेनें असाध्य असें कांहीं नाहीं. म्हणून मृदु हें अत्यंत शक्तिशाली आहे. )

बुद्धाच्या उपदेशाचीं सूत्रें अशीं प्रत्ययकारीं आहेत म्हणूनच त्यांचें माहात्म्य मोटें. बुद्धानें आपला उपदेश पालीसारख्या लोकभाषेंत केला आणि दृष्टांतकथांचें तंत्र वापरलें. त्यामुळें सामान्य जनांना धर्माचीं द्वारें खुलीं झालीं. बुद्धाच्या काळापर्यंत धर्मतत्त्वें संस्कृतच्या तिजोरीत बंद करून ठेवलेलीं होती. या तिजोरीची किल्ली बहुजनाच्या हातीं द्यायची नाहीं असा अहंकारमूलक आग्रह धरून वरिष्ठ वर्गानें बहुजनसमाजाला धर्मापासून दूर ठेविलें. याविरुद्ध बुद्धानें केलेली क्रांति केवळ अपूर्व होती. बुद्धानें आपल्या धर्मात नीच समजल्या जाणाऱ्या जातींना प्रवेश देऊन त्यांना नवी प्रतिष्ठा दिली. एका बौद्ध धर्मग्रंथाचा कर्ता उपाली हा अस्पृष्ट होता. बहुजनांना जीवनांत नवीन आशय, नवीन अर्थ वाटू लागला. कर्मकांड, यज्ञयाग, आणि जातिभेद यांना बुद्धानें फाटा दिल्या कारणानें विषमतेमुळें साचलेलें शेवाळलेलें समाजजीवन शुद्ध, प्रवाही, आणि प्रबळ झालें. शिल्प, राजकारण, मानसशास्त्र, वैद्यक इ० ज्ञानाच्या व कलेच्या शाखांना अपूर्व बहर आला. बुद्धानें केवळ निवृत्तिपर संथा दिली असें म्हणणाऱ्या टीकाकारांना बुद्धाच्या अवतारामुळें भारतीय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible] ७४८६९ दि. ...५।१।८५...
[illegible] २०१० [illegible]

समाज व संस्कृति यांना चहूकडून आलेली ही संपन्नता एक दिसत तरी नसावी किंवा तीकडे ते मुद्दाम डोळेझांक तरी करीत असावेत.

विरक्त वृत्तीनें राहून समाजसेवा करणाऱ्या लोकांचे प्रचंड संघ स्थापणें ही बुद्धाची कामगिरी मानवतेच्या इतिहासांत अजोड अशी ठरेल. बुद्धाला वेळोवेळीं शिव्या हासडणाऱ्या ज्ञानकोशकार केतकरांनींहि बुद्धाची 'संघचालकत्व-मूलक' थोरवी मान्य केली आहे. एकाद्या ध्येयास वाहून जीवनसमर्पण करणारी 'मिशनरी' वृत्ति सामुदायिक रीतीनें निर्माण करणारा बुद्ध हा जगांतला पहिला महापुरुष होय. भिक्षूंची संघटना प्रबळ होती. तिचे व्रतनियम कडक होते. बुद्धाच्या स्वर्गवासानंतर सहाच महिन्यांनीं सर्व भिक्षूंचा एक मेळावा भरला. यानंतर १०० वर्षांनीं ( खि. श. पूर्वी ३८३ ) असाच एक प्रयत्न झाला. खि. श. पूर्वी नंतर २४७ व्या वर्षी बौद्धांची तिसरी मोठी परिषद् भरली. ही अत्यंत महत्त्वाची होती. बुद्धानें संघटनेचें एक परिणाम-कारक तंत्र निर्माण केलें होतें. आणि म्हणूनच वरील तीनहि मेळाव्यांचे कार्य फार पद्धतशीर रीतीनें पार पडलें. या परिषदांनीं बुद्धाच्या उपदेशाचें अधिकृत रीतीनें संकलन करून पुढील पिढ्यांवर फार मोठे उपकार करून ठेविले.

या भिक्षूसंघांनींच बौद्ध धर्माची मशाल भारताबाहेर नेली आणि अज्ञानांधकारांत चाचपडणाऱ्या अनेक मानवसमूहांना कल्याणाचा राजमार्ग दाखविला. सम्राट् अशोकाचें या क्षेत्रांतलें कर्तृत्व असामान्य आहे. बुद्धाच्या निर्वाणानंतर सुमारें दीड दोन शतकांनीं जन्मलेल्या अशोकानें भारतांत शिलालेख कोरून बुद्धाचा अमर उपदेश सर्वत्रांना सुलभ केला. आणि आपली मुलगी संघमित्रा व मुलगा महेंद्र याना बोधिवृक्षाची एक फांदी देऊन लंकेस धर्म-प्रसारासाठीं पाठविलें. लंकेहून लौकरच ब्रह्मदेश, तिबेट, सयाम, चीन, जपान इ० देशांत बौद्धधर्म पसरला. ठिकठिकाणच्या रूढ कल्पनांचा किंवा परंपरांचा रंग त्यावर चढत जाऊन बौद्धधर्माचें मूळ स्वरूप थोडथोडें पालटत गेलें हें जरी खरें असलें तरी बौद्धधर्मानें या सर्व देशांत सामाजिक पुनरुत्थान केलें याबद्दल वादच नाहीं. बुद्धाची ती शांतदांत मूर्ति चहूकडे प्रसिद्ध झाली. पश्चिमेकडेहि हे वारे वाहूं लागले. आणि जरी पश्चिमेकडील देशांनीं प्रत्यक्ष

बौद्धधर्माचा अंगीकार केला नाहीं तर पाश्चिमात्य धर्मविचारावर बुद्धमताचे परिणाम झालेच. बुत् (मूर्ति) हा अरबी शब्द बुद्धाचाच संक्षेप आहे. यावरून बाहेरील जगांत देवमूर्ति म्हणजे बुद्ध असाच समज कसा दृढ झाला हें दिसून येईल. एका देशांत उगम पाहून आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत आपली प्रभा पसरविणारा बौद्धधर्म हा पहिलाच पंथ होय.

भारतांत बौद्धधर्माची पुढें पुढें पीछेहाट झाली याला एक कारण इस्लामचें भारतावरील आक्रमण म्हणतां येईल. यांतूनहि बौद्धधर्म वांचायला हरकत नव्हती. पण बौद्धधर्माचे कठोर आचारनियम पुढें लोकांना झेपेनासे झाले. राजाश्रय मिळाल्यामुळें भिक्षू आणि भिक्षुणी हे सुखासीन बनून आदर्शाची पायमल्ली करूं लागले. वैदिक धर्माचा सक्त विरोध बौद्धमताला होताच. कांहीं सिद्धि प्राप्त व्हावी यासाठीं विचित्र मार्गाचा अवलंब करणारे कांहीं जुने पंथ भारतांत होते. या तांत्रिक मताच्या लोकांचें आकर्षण बौद्ध लोकांना वाटूं लागून जारण-मारण, उच्चाटन, मंत्रतंत्रें, जपजाप्य यांत ते रमूं लागले. अनेक राक्षसी देवतांना बौद्धांनीं आपल्या उपासनेंत स्थान दिलें! या तांत्रिक मताचे लोक धर्माच्या नांवाखालीं विचित्र व ओंगळ गोष्टी करीत. असलीं मतें बौद्धांनीं पत्करल्यानें बुद्धाचा मूळ विवेकनिष्ठ व तेजस्वी उपदेश मागें पडला. आणि भारताबाहेर जेव्हां बौद्ध धर्माची पताका उंच फडकूं लागली तेव्हां भारतांत मात्र बौद्धधर्माला अवकळा येत गेली.

परंतु बौद्धधर्माची संघटना आणि डोलारा या देशांत कोलमडला असला तरी बुद्धाच्या उपदेशानें या भूमीवर केलेला संस्कार चिरस्थायीच आहे. १९५६ सालीं बुद्धदेवाच्या जन्माला अडीच हजार वर्षें झालीं म्हणून जो मोठा समारोह सरकारतर्फे साजरा झाला त्यावेळीं भाषण करतांना डॉ. राधाकृष्णन् म्हणाले, “बुद्धानें आपला हिंदुत्वाचा वारसा हिंदुधर्मातील कांहीं दोष दुरुस्त करण्यासाठीं वापरला. त्यानें विध्वंस न करतां परिपूर्ति केली. आपल्या देशांतल्या धर्मपरंपरेचा बुद्ध हा असामान्य प्रतिनिधी आहे. या भूमीवर त्यानें आपली पदचिन्हें ठेविलीं आणि या देशाच्या आत्म्यावर, चालीरीतींवर आपला ठसा उमटविला. बुद्धाच्या या कर्मभूमींत त्याचा उपदेश हा आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य घटक होऊन राहिला आहे.”

## स्वतंत्र भारतांत बौद्धधर्म

१९ वर्षांपूर्वी भारत स्वतंत्र झाला तेव्हां भारतांत बौद्ध धर्माला पुनः ऊर्जितकाळ आला असें म्हणतां येईल. बुद्धाची अहिंसा आधुनिक भारतांत गांधीजींनीं आपल्या तेजस्वी जीवनानें पुनः एकदा प्रतिष्ठित केली. अहिंसा हें दुबळ्याचें शस्त्र नाहीं तर हिंसेहून अनंत पटीनीं प्रभावशाली असें तें तत्त्व आहे हें त्यांनीं पटवून दिलें. इंद्रियजयाबद्दल गांधीजी कट्टर श्रमणाइतकेच आस्थेवाईक होते. व्यक्तीला समाजाच्या परिघांतून वेगळें काढण्याची कल्पना गांधीजींना मुळींच मान्य नव्हती. 'बहुजनसमाज आहें म्हणून मी आहे' असें ते म्हणत. व्यक्तीचा मोक्ष हा समाजसेवेंतूनच साध्य झाला पाहिजे असें गांधीजींनीं आमरण प्रतिपादन केलें. मैत्री, करुणा या बुद्धदेवानें सांगितलेल्या मूल्यांना गांधीजींच्या उपदेशांत प्रमुख स्थान होतें. ही सर्व अनुकल पार्श्वभूमि मिळाल्यानें स्वतंत्र भारतांत बौद्धधर्माचें स्वागत उत्साहानें होऊं शकलें.

१९५६ सालीं भारत सरकारनें बुद्धाच्या अडीच हजाराव्या जन्मदिनाचा महोत्सव फार मोठ्या प्रमाणांत साजरा केला. जवळजवळ सहा महिने बुद्धाच्या जयजयकारानें सारा भारत निनादून गेला होता. लक्षावधि बौद्धधर्मी व बुद्धप्रेमी लोक बुद्धदेवाच्या या जन्मभूमींत आणि कर्मभूमींत बुद्धाला श्रद्धांजलि वाहायला आले होते. यांत कुणाला राजकारणाचा दर्प आला असला तरी मूलतः हा सांस्कृतिक एकीचाच समारोह होता. आधुनिक जगाच्या प्रकृतीला जुळणारा जर कोणता धर्म असेल तो तर तो बौद्धधर्मच होय आणि या आमच्या भारतांत तो उदय व विकास पावला तेव्हां जगानें भारताकडे गुरुस्थान या दृष्टीनें पाहावें अशी भारतीय नेत्यांची विचारसरणी असली तर तींत अवास्तव अहंकार आहे असें कोण समंजस माणूस म्हणेल ?

स्वतंत्र भारताची राजमुद्रा सारनाथ येथील बौद्ध शिल्पांतल्या सिंहांची आहे. आपल्या राष्ट्रध्वजावरचें धर्मचक्र बुद्धाचेंच. आकाशवाणीनें 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' हें ब्रीदवाक्य बुद्धाच्या खास उद्गारांतूनच घेतलें. फार काय 'पंचशील' हा शांततावादी धोरणाचा निदर्शक असा जो शब्द रूढ झाला तो बौद्ध परंपरेंतलाच आहे. बौद्ध प्रतीकांना व तत्त्वांना हें प्राधान्य मिळण्यास आमच्या राष्ट्रधुरीणांना वाटणारें बुद्धाबद्दलचें आकर्षण हेंच कारण

होय. पं. जवाहरलाल नेहरू यांना बुद्धाबद्दल फार आदर वाटे. आज दिल्ली येथील तीन मूर्ति रस्त्यावरील पंडितजींच्या स्मारक मंदिरात त्यांच्या शयनागारांमध्यें एक बुद्धमूर्ति दिसेल. या मूर्तीकडे पाहून आपणांला धीर येई असें ते म्हणत. बुद्धाच्या चेहऱ्यावरील अगाध शांति म्हणजे या थोर मानव वंशाच्या अंतरंगीं असलेल्या असीम सुप्त आत्मशक्तीचा आविष्कार होय असें त्यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे. राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् तुलनात्मक धर्मशास्त्राचे गाढे पंडित असून बौद्ध-धर्माविषयींचा त्यांचा व्यासंग सर्वश्रुत आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं तर बौद्धधर्माची पताका भक्तिभावपूर्वक खांद्या-वर घेतली होती. समाजांतील विषमतेविरुद्ध बुद्धदेवानें बंड केलें त्याची पुनरा वृत्ति झाली पाहिजे ही आंबेडकरांना तळमळ होती. ‘ त्रिपिटिका ’च्या भाषांतराचें प्रचंड काम डॉक्टर महाशयांनीं हातीं घेतलें होतें आपल्या अनुयायांनीं बौद्ध-धर्माची दीक्षा घ्यावी असें प्रचार त्यांनीं केला आणि त्याचा परिणामहि झाला. आज ‘ नवबौद्ध ’ हा समाज भारतांत उदयास येत आहे. धुळींत मिसळलेलीं बीजें पावसाच्या पहिल्या सरींनीं अंकुरित व्हावींत त्याप्रमाणें भारत सरकारच्या प्रयत्नानें या भूमींत अदृश्य असलेल्या बौद्ध-मूल्यांना टवटवी व नवजीवन मिळालें.

आपलें सरकार निधर्मी असलें तरी अधर्मी मुळींच नाहीं. भारतांत वैदिक आणि अवैदिक अशा दोन परंपरा प्रमुख होत्या. 'एकाच प्रवाहाचे हे दोन फाटे होत. अवैदिक धर्मांत आंतरराष्ट्रीय ख्यातीला पोचलेला बौद्ध धर्मच होय. या दृष्टीनें बौद्धप्रतीकांचा स्वीकार केल्यानें प्राचीन संस्कृतीशीं व अंतरराष्ट्रीय क्षेत्राशीं एकदमच ऋणानुबंध जोडला गेला. या आमच्या राष्ट्रनेत्यांचें द्रष्टेपण यांत दिसून येतें. धर्माधिष्ठित राज्य आजच्या काळांत शक्य नाहीं आणि अधर्मी राज्य येथील लोकांच्या मनोरचनेला मानवणार नाहीं. प्राचीन हिंदु संस्कृतीं-तून जन्माला आलेल्या बौद्धासारख्या पुरोगामी धर्माला उत्तेजन देण्याचा मध्यम मार्ग हाच कल्याणकारक ठरण्यासारखा होता. बौद्धधर्मांत देव नसला तरी मानवता आहे, समाजाभिमुखता व लोकशाही आहे, आणि विशेष म्हणजे यांतील सर्व तत्त्वज्ञानाची उभारणी विवेकावर केलेली आहे. यामुळें आधुनिक जगाला मानवणारा असाच हा एकच धर्म असें म्हणतां येईल.

शिवाय ज्या भयानक संघर्षामुळें आज मानवी संस्कृतीचें मंदिर जमीनदोस्त होण्याची वेळ आली आहे तो संघर्ष टाळायचा असेल तर बुद्धाचें अहिंसेचें तत्त्वच उपयोगीं पडणार आहे. हा सारा विचार करून बौद्धमूल्यांचें व प्रतीकांचें ज्यांनीं पुनरुज्जीवन केलें त्या आमच्या राष्ट्रनेत्यांच्या प्रतिभेची वाखाणणी करावी तेवढी थोडीच.

बौद्धधर्माच्या या जागृतींत महाराष्ट्रानें आस्थेनें व आदरानें लक्ष घातलें पाहिजे. दुर्दैवानें महाराष्ट्रांत बुद्धाच्या उपदेशाबद्दल केवळ औदासीन्यच नाहीं तर तिरस्कार निर्माण झाला. डॉ. केतकर यांच्यासारख्या वैदिक धर्माच्या महापंडितांनीं बुद्धाबद्दल अत्यंत तुच्छतेनें लिहिलें. आपली परंपरा लढाऊ आहे म्हणून हा अहिंसामार्ग आपल्या कामाचा नाहीं असा एक समज महाराष्ट्रांत कायमचा रूढ आहे! राष्ट्रवादाच्या जहाल नेत्यांनीं लोकाराधनेसाठीं जुनें व सनातनी मत नेहमीं उचलून धरलें त्यामुळें पुरोगामी बौद्धधर्माला मान्यता मिळाली नाहीं. फार काय, कुठलाहि सात्त्विक, नेमस्त, पुरोगामी, शांतिधर्मी विचार रुजूंच द्यायचा नाहीं असा आधुनिक महाराष्ट्रांतील जहांबाज जहालांनीं निर्धारच केला होता. पुनरुज्जीवन करायचेंच असेल तर तें रूढींनीं जखडलेल्या हिंदुधर्माचें करायचें अशा निर्धारानें हे लोक झटत. जनमनावर त्यांची पकड असल्यानें दुर्दैवानें त्यांना आपल्या प्रतिगामी कार्यांत भरघोस यश मिळालें !

तसें पाहिलें तर बौद्ध विचाराला महाराष्ट्राएवढी अनुकूल भूमि दुसरी कोणती नसेल. अजंठा, कार्लें सारख्या महान् बौद्ध कलाकृती महाराष्ट्रांत आहेत. यावरून बौद्ध भिक्षूंनीं या ठिकाणी धर्मसाधना आणि धर्मोपदेश केला असेल हें निश्चितच. या ठिकाणीं भागवत धर्माची परंपरा अखंड पांच सात शतकें चालत राहिली आहे. ‘ जगाचिया सुखोद्देशें, राहाटणें हें अहिंसे, रूप जाण ’ ‘ पुण्य परउपकार पाप ते परापीडा ’ ‘ विश्व जालिया वन्हीं, संतें सुखें व्हावें पाणी ’ अशीं शेंकडों संतवचनें बुद्धदेवाच्या अहिंसात्मक उपदेशाशीं समांतरच नव्हे तर एकजीव झालेलीं आढळतील. आमचे अत्यंत लोकप्रिय दैवत विठ्ठल हें बुद्धासारखेंच आहे. मैत्री किंवा करुणा यांच्या या धारेतच विवेकवादाचा प्रवाह येऊन मिळाला आहे. दोन टोकें टाळण्याची प्रवृत्ति महाराष्ट्रांत सर्वत्र दिसते. तर्काच्या

कसोटीवर जें टिकेल तें पत्करण्याची महाराष्ट्राची तयारी असते आणि बौद्धमत हें तर शुद्ध तर्कवादावर आधारलेलें तत्त्वज्ञान आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर महाराष्ट्रांतील बुद्धिजीवी वर्गात बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनांत आत्मीयतेनें लक्ष घालणें अगदीं शक्य आहे असेच दिसून येईल. मात्र पूर्व-ग्रहाचीं कोळीष्टकें झटकलीं पाहिजेत.

एका सामाजिक आंदोलनाच्या दृष्टीनेंहि या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे महाराष्ट्रांत अस्पृष्ट वर्ग हा समाजाचा एक प्रमुख भाग आहे. शतकानुशतकें विषमतेच्या हालअपेष्टा सोसून हा वर्ग कडवट झाला आहे आणि कै. आंबेडकरांच्या आदेशास अनुसरून हा वर्ग बौद्धधर्माकडे वळत आहे. दुसऱ्या कुठल्याहि धर्मांत जाण्याचा सल्ला न देतां बाबासाहेबांनीं बौद्धधर्म स्वीकारण्यास अनुयायांना सांगितलें यांत त्यांचीं देशभक्ति, संस्कृतिप्रेम, दूर-दर्शित्व दिसून येतें. बौद्धधर्मांत गेल्यानें आमचे अस्पृष्ट बांधव अहिंदु न होतां सुधारक हिंदु होतील आणि स्पृष्टास्पृष्टांना एकाच संस्कृतीच्या छत्राखालीं नांदता येईल. मात्र नवबौद्धांनीं कडवटपणा सोडून दिला पाहिजे. पण त्याचीहि जबाबदारी पुष्कळशी स्पृष्ट वर्गावर आहे. स्पृष्टांनीं सश्रद्ध मनानें बौद्धधर्माचा अभ्यास करून नवबौद्धांना त्यांतलें सामर्थ्य, रहस्य, व सौंदर्य पटवून दिलें पाहिजे. तुम्ही अलग होत नसून एका अधिक विस्तीर्ण क्षेत्रांत पण आमच्याच परिवारांत राहात आहां हें नवबौद्धांना स्पृष्टांनीं समजावून दिलें तर महाराष्ट्राची एक मोठी समस्या सुटेल आणि ह्या देशाच्या सामर्थ्याला पारावार उरणार नाहीं.

## या अनुवादासंबंधीं

The Light of Asia या अनुवादाचा आरंभ मी फार पूर्वी केला हें वर सांगितलेंच आहे. २-११३६ या तारखेस हा पद्यबद्ध अनुवाद करण्यास मी सुरुवात केली ! पहिला सर्ग झपाट्यानें पूर्ण झाला. पण दुसऱ्या सर्गांत गाडी जी अडली ती अडलीच ! पुढें १८-१९ वर्षांनीं म्हणजे १९५४-५५ मिळून दुसरा सर्ग पुरा झाला आणि तिसऱ्या सर्गाला आरंभ झाला. तरीहि मध्यंतरीं चार वर्षें गेलीं ! मग ९-४-५९ रोजीं पुनः जें काम हातीं घेतलें तें मात्र पुढें मुळींच रेंगाळलें नाहीं. गति वेगवान् आणि अखंड

होती असें नाहीं. पण डोक्यांत दुसरें कांहीं आणावयाचेंच नाहीं असा संकल्प केला आणि वेळ मिळेल व तंद्री लागेल तेव्हां अनुवाद करीत राहिलों. हें काम अखेर २५–११–६० रोजीं पुरें झालें आणि कधींहि न अनुभवलेली कृतार्थता दिवशीं त्या अनुभवली. आनंदातिशायामुळें रात्रीं झोप आली नाहीं आणि थोडी गुंगी आली तेव्हां बुद्धचरित्रांतले अनेक रोमांचकारी प्रसंग स्वप्नांत गर्दी करूं लागले. एक पुस्तक लिहून झालें यापेक्षां एका साधनेची आपण सांगता केली हा भावच प्रबळ होता.

अनुवाद पुरा होण्यास इतकीं वर्षें लागलीं यास कारण कांहींसा माझा सुखासीन स्वभाव तसाच योजनाबद्धतेचा अभाव हें असूं शकेल. पण हें बरेंच तांत्रिक स्वरूपाचें कामहि मनाची नीट धून लागल्याशिवाय करायला घ्यायचें नाहीं हा माझा निश्चय असे. स्वर आणि लय यांत मन जेव्हां रमेल, मनाच्या घुमटांतले मुके पडसाद शब्दबद्ध करावे अशी निकड मनाला लागेल तेव्हांच मी अनुवादाचें काम हातीं घेई. अशी तंद्री अर्थातच हुकमी नसते. त्यामुळें अनुवादाचें काम महिनेच्या महिने नव्हे वर्षेंच्या वर्षें रेंगाळत राहिलें. दिवस वायां जात आहेत याची खंत मनाला लागे. पण काव्यनिर्मितीला अनुकूल अशी मनाची धारणाच होत नसल्यानें मन घट्ट करून कालप्रवाह समोरून वहात जाऊं दिल्यावांचून गत्यंतर नव्हतें.

म्हणूनच अनुवादाला इतकीं वर्षें लागलीं असलीं तरी वेठबिगार म्हणून हें काम केलें नाहीं तर काव्यनिर्मितीला पोषक अशाच वृत्तींत असतांना याची घडण करीत गेलों, हें समाधान मला वाटतें. यांत जर कांहीं रसाळपणा आला असेल तर तो बव्हंशीं याच कारणानें. अनुवाद रेंगाळत राहिला ही आणखी एका दृष्टीनें मला इष्टापत्ति वाटते. १९३६ सालीं रोज बैठक मांडून, ५-६ महिन्यांत अनुवाद संपविला असता तर थोडेफार काव्यगुण कदाचित् त्यांत आले असते. परंतु त्यांतील आशयाचें जसें आकलन पुढें होत गेलें आणि त्यायोगें काव्यात्मा व काव्यदेह यांचें सारूप्य जसें अनुवादांत बऱ्यात प्रमाणांत उतरूं शकलें तसें तें त्यावेळीं शक्य झालें नसतें. दुःखावांचून धर्माचेंच काय पण महाकाव्याचेंहि अंतरंग कळत नाहीं. मग धर्म आणि काव्य यांचा ज्या कलाकृतींत मिलाफ झाला आहे आणि दुःखाच्या आधारावर जिचें शिल्प उभें राहिलें आहे तिच्या रहस्याचें सौंदर्य

तर दुःखानुभवावांचून कळणें केवळ अशक्यच ! गेल्या दोन वर्षांत मी निराशा, वेदना, दुःख पुष्कळ अनुभवलें. स्वतः यातना भोगल्या आणि दुसऱ्यांच्या यातनांशीं समरस झालों. केवळ परिस्थितीनेंच नव्हे तर स्वतःच्या अंतरंगशत्रूंनींहि मला हैराण केलें. बुद्धदेवाच्या चरित्राचा आणि उपदेशाचा गाभा निकट येण्यास या सर्वांची मला मदतच झाली. अर्थात् या विषयाला धरून वाचन आणि चिंतन पुष्कळ झालेंच. पण मुख्य साधना दुःखाची आणि म्हणूनच या अनुवादाला इतका कालावधि लागला हें उत्तमच झालें असें मी मानतों.

मूळ काव्यांतील अर्थाचें पुरेपूर माप घालणें एवढेंच अनुवादकाचें काम नाहीं. मुळांतील काव्याचें वातावरण ज्या प्रमाणांत अनुवादांत उतरेल त्या मानानें तो अनुवाद यशस्वी म्हणतां येईल. मूळ काव्य प्रसादपूर्ण असेल आणि अनुवादांत सर्वच्या सर्व अर्थच्छटा आणतांना दुर्बोधता आली तर अनुवादकाचें तें यश खासच नव्हे. अर्थाचे कांहीं तपशील सुटले तरी चालतील परंतु मुळांतला काव्याचा डौल व प्रसाद अबाधित राहिला पाहिजे आणि मूळ लेखकाच्या व्यक्तित्वावर अनुवादकाच्या वैशिष्ट्याचा मुलामा चढला म्हणजे तर अनुवाद हा स्वतंत्र काव्याच्या पदवीला पोचतो. फिट्झेरल्डनें उमर खय्यामच्या रुबाया इंग्रजींत आणल्या पण फिट्झेरल्डचें जगविख्यात इंग्रजी काव्य आज एक मौलिक रचना म्हणून प्रतिष्ठा पावलें. अनुवाद वाचताना मूळ कलाकृतीची आठवणसुद्धां न होणें हें अनुवादाचें सर्वांत मोटें यश मी समजतों. ‘ संशयकल्लोळ ’, ‘ वाईकर भटजी ’ ह्या रूपांतरित कृतींची अंगलट इतकी मनोहर आहे कीं त्यांच्या सौंदर्यानें मोहित झालेल्या वाचकांना मूळ ग्रंथ पाहण्याची इच्छाच होत नाहीं. हे अनुवाद स्वतंत्र कलाकृतीच म्हणायला हरकत नाहीं. हाच आदर्श माझ्या डोळ्यां-पुढेंच होता.

सर एडविन अर्नोल्ड यांनीं बौद्धवाङ्मयाचें उत्कृष्ट परिशीलन करून हें काव्य रचलें. इंग्रजी विद्वान् मेहनतीची कसूर कधींच करीत नाहींत. यांतून अर्नोल्ड हे पुनः जातिवंत कवि. त्यामुळें या काव्याला विद्वत्ता आणि रसवत्ता यांची सारखीच जोड लाभली आहे. सर्व काव्य धावत्या वृत्तांत आहे. क्वचित् ‘ We are the voices of the wandering wind ’ असें

एकादेंच गीत मध्यें आढळतें. शेवटचा सर्ग बराचसा चतुष्पदी कडव्यांचा आहे. पण त्यांत केवळ धर्मनियमांची नोंद आहे म्हणून मी त्याचा बराच संक्षेप केला आहे.

कथनात्मक काव्यांत कथेचें सूत्र सतत पुढें जात असेल किंवा भावनांचा उत्कर्ष होत असेल तोंवर काव्याची रंगता टिकते. पण कांहीं तपशील किंवा तत्त्वचर्चा आली कीं कंटाळवाणेपणा येतो. महाकवि कालिदासासारख्या रससिद्ध कवीच्या 'रघुवंशा'सारख्या महाकाव्यांतही रघुदिग्विजयाच्या वर्णनांतले भूगोलाचे आराखडे नीरस वाटतात. हा नीरसपणा टाळण्यासाठीं खूप प्रयत्न करावा लागतो.

वृत्तवैचित्र्य हा त्या प्रयत्नाचाच एक स्थूल भाग आहे. प्रस्तुत काव्यांत मी जाति आणि वृत्तें यांचा सढळ हातानें उपयोग केला आहे. साधारणतः प्रत्येक सर्गाला भूपति, पादाकुलक, जलधरमाला, चंद्रकांत अशी एकादी धावती जाती घेतली आहे. परंतु थोडा वेगळा आशय आला किंवा निवेदनाचें वळण जरा बदललें कीं उपजाति. मालिनी, शालिनी, मंदाक्रांता अशासारख्या जुन्या वृत्तांचा उपयोग केला आहे. रघुनाथपंडिताच्या नलदमयंती स्वयंवराख्याना-सारख्या रसाळ कथा-काव्याचें ज्यांनीं परिशीलन केलें असेल त्यांना अशा वृत्तवैचित्र्यानें काव्य कसें रंजक होतें हें सहज समजेल. जातींमुळें प्रवाहित्व यावें आणि वृत्तामुळें आदर्श ( Classic ) काव्याचा डौल यावा असा असा हेतु धरून हा एक वेगळाच रांधा ( Pattern ) मी तयार केला आहे.

हा अनुवाद करतांना माझ्या मनापुढें आणखी एक आदर्श होता. बाबू मैथिलीशरण गुप्त यांच्या 'यशोधरा' ह्या परमरमणीय काव्यानें मला केवळ वेड लावून टाकलें होतें. रवीन्द्रनाथांनीं रामायणांतील 'अव्यक्तवेदना' उर्मिलेची रमणीय मूर्ति विस्मृतीच्या कोपऱ्यांतून काढून मध्यभागीं ज्याप्रमाणें आणून उभी केली आणि नव्या जाणिवेचे प्रकाशझोत तिच्यावर टाकून तिचा स्वतंत्र गौरव केला. त्याप्रमाणें मैथिलीशरणजींनीं यशोधरेला एक नवें महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. बुद्धदेवाच्या देदीप्यमान चरित्रांत एकांतांत अश्रू गाळणारी संयमी व पतिपरायण यशोधरा लोकांना तितकीशी आठवत नव्हती. मैथिलीशरणांनीं तिच्या गूढ वेदनांना वाचा फोडली. मैथिलीबाबूंचें हें काव्य भावगीतात्मक आहे. बुद्ध, यशोधरा, राहुल, शुद्धोदन इ० महत्त्वाचीं पात्रें

आपापलें मनोगत भावगीतांत व्यक्त करतात. Drammatic monologue चा हा उत्कृष्ट प्रयोग आहे. प्रस्तुत अनुवादांत कुठें कुठें मीं अशीं भावगीतें घातलीं आहेत. कथनात्मक काव्यांत मधून मधून अत्यंत भावगर्भ प्रसंग येतात. ते धावत्या चालींत किंवा प्रौढ वृत्तांत रंगविण्यापेक्षां त्यांना गीताचा साज चढविला तर काव्याला संपन्नता व मधुरता अधिक येते. नाट्यहि चांगलं निर्माण होतें. माझ्या मतें या अनुवादांत आलेलीं गीतें हें त्याचें एक हृदयंगम वैशिष्ट्य ठरेल.

एडविन् अर्नोल्ड यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं सूक्ष्मता खूपच आहे. एकेक कल्पना किंवा वर्णन आठ आठ दहा पंक्तींचे आणि त्यांत विशेषणें, क्रियाविशेषणें, वाक्यें उपवाक्यें, यांचीं खेचाखेच. अर्थात् इंग्रजीच्या प्रकृतीमुळें तें सुंदर वाटतें. अनुवादात हा इंग्रजी साजशृंगार मीं मोकळा केला आहे. कांहीं वर्णनांचा संक्षेप केला आहे. पण अशीं स्थळें थोडीं. आणि या संक्षेपांची भरपाईहि मधून मधून स्वतंत्र वर्णनांच्या छटा देऊन केली आहे. कुठें स्थूल-सूक्ष्म बदल औचित्याच्या दृष्टीनें केले आहेत उदा० गौतमाच्या रथाला बैला-ऐवजी मीं घोडे जोडले. ‘ अपारसंवित् सुखसमाधि, ‘ अनवप्रसवा,’ ‘ योग-मुद्रा,’ ‘ ध्यानावस्थित ’ इ० अर्थगर्भ संस्कृत शब्दांचा फायदा मराठी अनुवादाला सहजच मिळाला.

काव्याच्या घडणीसंबंधींचें हें विस्तृत निवेदन करण्याचें कारण रसिक वाचकाला त्याची यथार्थ कल्पना यावी हेंच होय. अनुवाद सुबोध, रंजक व डौलदार व्हावा यासाठीं आशयांतला कमी महत्त्वाचा भाग गळला किंवा संक्षेपानें आला तरी चालेल हें माझें धोरण होतें. आशयाच्या सूक्ष्मतम छटा जशाच्या तशा आणून हें काव्याइतकेंच किंवा याहूनहि सुबोध करणारा एकादा सिद्धहस्त कवि निघेल, नाही असें नाहीं. परंतु या मूळ काव्यांतल्या सौंदर्यावरील प्रेम आणि तें सौंदर्य सामान्य रसिकाच्या अंतःकरणापर्यंत पोचावें याविषयीं वाटणारी तळमळ यांत मात्र मी कुणाला हार जाणार नाहीं. या अनुवादात जर कांही जिवंतपणा व लालित्य आलें असेल तर तें याचमुळें.

## अर्नोल्ड कोण होते ?

Light of Asia या जगविख्यात काव्याचे जनक सर एडविन् अर्नोल्ड हे एक सुविद्य, साक्षेपी, व सात्त्विक गृहस्थ होते. भारतांतील प्राचीन धर्म आणि संस्कृती यांकडे आकर्षित झालेले पाश्चात्य विद्वान् व साधक पुष्कळच होऊन गेले. त्यांची संख्या वाढतच आहे. बौद्धधर्माला तर हें वैभव फारच मोठ्या प्रमाणांत लाभलें. अशोकाचे शिलालेख प्रथम वाचणाऱ्या प्रिन्सेप्-पासून बौद्धवाङ्मयाचें संशोधन, भाषांतर, प्रकाशन करणाऱ्या ओल्डेनबर्ग, ऱ्हीस डेव्हीडस् दंपती यांच्यापर्यंत अनेक पाश्चात्य पंडितांनीं या प्राचीन भारतीय धर्माला आपलें सर्वस्व वाहिलें आहे. पण हें संशोधनात्मक कार्य कितीहि महत्त्वाचें असलें तरी त्याचें आवाहन फक्त वरच्या दर्जाच्या सुशिक्षित जिज्ञासूंपर्यंत पोचलें. एडविन् अर्नोल्ड यांचें वैशिष्ट्य असें कीं त्यांनीं बुद्धाचें चरित्र व त्याचा उपदेश यांचा सखोल अभ्यास करून Light of Asia सारखी स्वतंत्र, सुरस अशी ललित कृति निर्माण केली. त्यामुळें बुद्धदेवाची ओळख भारताबाहेर विशेषतः पाश्चात्य जगांत अगदीं सामान्य सुशिक्षितालाहि झाली. अर्नोल्डसाहेबांच्या या काव्यामुळेच आपणांला बुद्ध-चरित्राचा प्रथम परिचय झाला असें सांगणारे लक्षावधि लोक जगांत होते आणि आजहि आहेत. हें काव्य १८७९ सालीं प्रथम प्रसिद्ध झालें. आणि त्याच्या इंग्लंडमध्यें ६० आणि अमेरिकेंत ८० इतक्या आवृत्त्या निघाल्या ! यावरूनच त्याची लोकप्रियता दिसून येते. अर्नोल्डच्या पूर्वींच्या पाश्चात्त्य जगाला बुद्धाची फारच थोडी माहिती होती. एकतृतीयांश मानवतेचा हा धर्म पाश्चात्य जगांत एकापरीनें अज्ञातच होता. परंतु अर्नोल्डसारख्यांच्या प्रतिभेमुळें बुद्धाचें दिव्य चरित्र आणि अमर उपदेश पाश्चात्यांना कळला.

" हें काव्य घाईगर्दीत मिळणाऱ्या अल्पस्वल्प रिकाम्या वेळांत रचलें गेलें. पूर्व आणि पश्चिम यांना एकमेकाविषयींचें ज्ञान होण्यास मदत व्हावी ही उत्कट इच्छाच या काव्याची मूळ स्फूर्ति आहे. " अर्नोल्डनी काव्यास जोडलेल्या आपल्या प्रस्तावनेंत हे उद्गार काढले आहेत. अर्नोल्डचा हेतु त्यांच्या अपेक्षेपेक्षांहि यशस्वी झाला असें कुणीहि म्हणेल.

ऑक्सफोर्ड येथें उच्च शिक्षण घेतल्यानंतर एडविन् अर्नोल्ड हे १८५६

साली भारतांत आले आणि पुणें येथील डेक्कन कॉलेजचे प्राचार्य झाले. पुण्यासारखें विद्येचें व संस्कृतीचें माहेरघर आणि डेक्कन कॉलेजसारख्या प्रख्यात शिक्षणसंस्थेचें प्राचार्यपद यामुळें अर्नोल्डना विद्याव्यासंगाला फार अनुकूल वातावरण मिळालें. मुंबई विद्यापीठाचे ते फेलो झाले आणि देशी वाङ्मयाचीं भाषांतरें करण्यांत त्यांनीं खूपच नांव केलें. परंतु 'Light of Asia' हे त्यांचें जगविख्यात काव्य मात्र त्यांनीं विलायतेस परत गेल्यावर रचिलें. त्यावेळीं डेली टेलिग्राफचे ते संपादक होते. हें काव्य प्रसिद्ध होतांच जगन्मान्य झालें हें वर आलेंच आहे.

एडविन् अर्नोल्डनीं गीतगोविंद, भगवद्‌गीता, हितोपदेश इ० अनेक संस्कृत ग्रंथांची इंग्रजींत भाषांतरें केलीं. Light of the world या नांवाचें खिस्त-जीवनावर एक प्रदीर्घ काव्य त्यांनीं रचिलें. हीं सारींच पुस्तकें आपापल्या परीनें सुंदर आहेत. परंतु Light of Asia ची सर त्यापैकीं कुठल्याहि पुस्तकाला आली नाहीं. पौर्वात्य संस्कृति आणि धर्म यांत रमून गेलेल्या या विद्वानानें आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस जपानमध्यें घालविले. त्यांची तिसरी पत्नी जपानी होती. १८९१-९२ साली त्यांनीं Seas and Lands आणि Japonica अशीं दोन पुस्तकें प्रसिद्ध करून जपानी जीवनाचें यथार्थ दर्शन जगाला घडविलें. १८८८ मध्यें के. सी. आय्. ई. ही बहुमानाची पदवी त्यांना ब्रिटिश सरकारनें दिली. अशा रीतीनें सारा जन्म धर्म तत्त्वज्ञान यांचें अध्ययन आणि उच्च वाङ्मयाची निर्मिति करण्यांत घालून ता. २४ मार्च १९०४ रोजीं हा थोर पुरुष खिस्तवासी झाला.

अर्नोल्डच्या Light of Asia नें गांधीजींसारखा लोकोत्तर पुरुष मुग्ध होऊन गेला. "भगवद्‌गीतेपेक्षांहि अधिक आस्थेनें हें पुस्तक मीं वाचलें आणि एकदा तें वाचायला घेतलें तें संपवूनच खालीं ठेविलें." असें गांधीजींनीं सांगितलें आहे. पं. नेहरू आपल्या अत्यंत आवडत्या पुस्तकांत याची गणना करतात. रे० व्होम्स् तर म्हणतात कीं, "या पुस्तकांतील दिव्यतेची फक्त बायबलशीं तुलना करतां येईल. यांत विविधता आहे. कुठें यथार्थ चित्रण, कुठें भावकल्लोळ, कुठें कारुण्य अशा स्वरूपाचें हें काव्य माणसाला विचाराच्या आणि ध्येयाच्या परमोदात्त क्षेत्रांत घेऊन जातें." धर्मानंद कोसंबी, ऱ्हीस् डेव्हीडस् इ० त्रिखंडकीर्ति बौद्ध पंडितांनीं या काव्याचा सादर

उल्लेख केला आहे. चिकित्सक मनाचें जें समाधान करतें आणि साध्या रसिकाला जें संतोष देतें तें आदर्श काव्य होय अशी व्याख्या एकानें केली. या व्याख्येंत प्रस्तुत काव्य शंभर टक्के बसेल यांत शंकाच नाहीं.

निवेदन संपलें. हा अनुवाद जरी तीन दशकांवर गर्भावस्थेंत होता तरी तो पूर्णपणें गुप्त होत राहिला असें मात्र नाहीं. निकटच्या प्रिय व्यक्तींना झालेला भाग दाखवावा आणि त्यांच्या मुद्रेवरील संतोषानें हर्षित होऊन पुढें अनुवादरचनेंत गढून असें चाललेंच होतें. माझे ज्येष्ठ स्नेही व गुरु अत्रे. कानेटकर यांनी क्रमिक पुस्तकांत वरच्या वर्गासाठीं बुद्धजन्मावरील उतारा घेतला. अनेक प्रसिद्ध नियतकालिकांनीं या काव्यांतले कांहीं भाग सचित्र प्रसिद्ध केले. आकाशवाणीवर ‘ बुद्धजन्म ’ ‘ सिद्धार्थ आणि राजहंस, ‘ सुजाता ’ हे यांतील कथाभाग संगीतिकांच्या रूपानें ध्वनिक्षेपित झाले. कांहीं वर्षांपूर्वी फर्ग्युसन् महाविद्यालयांतील साहित्य मंडळापुढें आणि यंदा बुद्धपूर्णिमेच्या दिवशीं महाराष्ट्र साहित्य परिषदेंत काव्याचा कांहीं भाग वाचून दाखविला. रसिक युवक आणि प्रतिष्ठित साहित्यिक यांनीं सारख्याच समाधानानें माना डोलविल्या. गोगलगायीच्या गतीनें कां होईना हें कार्य सतत प्रगत होत राहिलें याला हें उत्तेजन, कौतुक, प्रसिद्धि कारण होय. हें कृतज्ञतापूर्वक नमूद करावेंसें वाटतें.

माझे परममित्र प्रसिद्ध विमर्शक प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर हे माझे प्रेमळ चहाते आणि कडक टीकाकार. माझ्या अनुभूतीच्या सामर्थ्याबद्दल त्यांना जितका विश्वास तितकाच आविष्कारांत मी कांहींसा ढिला आहे हा त्यांचा राग. त्यांचें दैवत स्वामी विवेकानंद यांच्याप्रमाणे क्षीरसागर बुद्धाला मानणारे पण बौद्धमताचा तिरस्कार करणारे ! अशा स्थितींत हें काव्य आणि प्रस्तावना न कंटाळतां ऐकून त्यांनीं एकदम पसंत असा शेरा मारला तेव्हा मला फारच धन्यता वाटली.

माझे बंधुतुल्य मित्र आनंद मुद्रणालयाचे मालक यशवंतराव जोशी हे नुसतेच मुद्रणतज्ञ नाहींत तर चांगले साहित्यमर्मज्ञ आहेत. त्यांनीं आणि माधवराव जोशी यांनीं ही माझी कलाकृति सुंदर स्वरूपांत आणण्याचें आस्थेनें

मनावर घेतलें. याचा साभार नव्हे तर सकौतुक उल्लेख करावासा वाटतो. चित्रकार सालकरांनीं तत्परतेनें चित्रें काढून दिली याबद्दल आभार.

बुद्धचरित्र हेंच एक महाकाव्य आहे. त्यांतलें सौंदर्य आणि सामर्थ्य रसिकांना कळायला या 'बुद्धायना'चा थोडाफार उपयोग झाला तर गेल्या कित्येक वर्षांच्या माझ्या साधनेचें सार्थक झाल्यासारखें वाटेल. नमो बुद्धाय !

२९–११–६६<br>
नातू बाग, पुणें २.

—गोपीनाथ तळवलकर

उल्लेख केला आहे. चिकित्सक मनाचें जें समाधान करतें आणि साध्या रसिकाला जें संतोष देतें तें आदर्श काव्य होय अशी व्याख्या एकानें केली. या व्याख्येंत प्रस्तुत काव्य शंभर टक्के बसेल यांत शंकाच नाहीं.

निवेदन संपलें. हा अनुवाद जरी तीन दशकांवर गर्भावस्थेंत होता तरी तो पूर्णपणें गुप्त होत राहिला असें मात्र नाहीं. निकटच्या प्रिय व्यक्तींना झालेला भाग दाखवावा आणि त्यांच्या मुद्रेवरील संतोषानें हर्षित होऊन पुढें अनुवादरचनेंत गढून असें चाललेंच होतें. माझे ज्येष्ठ स्नेही व गुरु अत्रे. कानेटकर यांनी क्रमिक पुस्तकांत वरच्या वर्गासाठीं बुद्धजन्मावरील उतारा घेतला. अनेक प्रसिद्ध नियतकालिकांनीं या काव्यांतले कांहीं भाग सचित्र प्रसिद्ध केले. आकाशवाणीवर 'बुद्धजन्म' 'सिद्धार्थ आणि राजहंस, 'सुजाता' हे यांतील कथाभाग संगीतिकांच्या रूपानें ध्वनिक्षेपित झाले. कांहीं वर्षांपूर्वी फर्ग्युसन् महाविद्यालयांतील साहित्य मंडळापुढें आणि यंदा बुद्धपूर्णिमेच्या दिवशीं महाराष्ट्र साहित्य परिषदेंत काव्याचा कांहीं भाग वाचून दाखविला. रसिक युवक आणि प्रतिष्ठित साहित्यिक यांनीं सारख्याच समाधानानें माना डोलविल्या. गोगलगायीच्या गतीनें कां होईना हें कार्य सतत प्रगत होत राहिलें याला हें उत्तेजन, कौतुक, प्रसिद्धि कारण होय. हें कृतज्ञतापूर्वक नमूद करावेंसें वाटतें.

माझे परममित्र प्रसिद्ध विमर्शक प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर हे माझे प्रेमळ चहाते आणि कडक टीकाकार. माझ्या अनुभूतीच्या सामर्थ्याबद्दल त्यांना जितका विश्वास तितकाच आविष्कारांत मी कांहींसा ढिला आहे हा त्यांचा राग. त्यांचें दैवत स्वामी विवेकानंद यांच्याप्रमाणे क्षीरसागर बुद्धाला मानणारे पण बौद्धमताचा तिरस्कार करणारे ! अशा स्थितींत हें काव्य आणि प्रस्तावना न कंटाळतां ऐकून त्यांनीं एकदम पसंत असा शेरा मारला तेव्हा मला फारच धन्यता वाटली.

माझे बंधुतुल्य मित्र आनंद मुद्रणालयाचे मालक यशवंतराव जोशी हे नुसतेच मुद्रणतज्ज्ञ नाहींत तर चांगले साहित्यमर्मज्ञ आहेत. त्यांनीं आणि माधवराव जोशी यांनीं ही माझी कलाकृति सुंदर स्वरूपांत आणण्याचें आस्थेनें

मनावर घेतलें. याचा साभार नव्हे तर सकौतुक उल्लेख करावासा वाटतो. चित्रकार सालकरांनीं तत्परतेनें चित्रें काढून दिली याबद्दल आभार.

बुद्धचरित्र हेंच एक महाकाव्य आहे. त्यांतलें सौंदर्य आणि सामर्थ्य रसिकांना कळायला या ‘ बुद्धायना ’चा थोडाफार उपयोग झाला तर गेल्या कित्येक वर्षांच्या माझ्या साधनेचें सार्थक झाल्यासारखें वाटेल. नमो बुद्धाय !

२९–११–६६<br>नातू बाग, पुणें २.

—गोपीनाथ तळवलकर

अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| सर्ग पहिला | .... | १ |
| सर्ग दुसरा | ... | १६ |
| सर्ग तिसरा | .... | ३४ |
| सर्ग चौथा | .... | ५४ |
| सर्ग पाचवा | ... | ७१ |
| सर्ग सहावा | .... | ८९ |
| सर्ग सातवा | .... | ११३ |
| सर्ग आठवा | .... | १३३ |


—o—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९५५८७


# सर्ग १ ला

( जाति–दोहा )


भवतारक रचिता झाला महान् धर्मग्रंथ
बुद्धदेव–विश्रुत भुवनीं राजकुमर सिद्धार्थ
अनन्य साधारण ठरला स्वभूपाताळांत
सर्वमान्य, श्रेष्ठ ज्ञानी करुणासागर संत.
दिव्य मुनी तो अध्यापी धर्मशास्त्र निर्वाण
असा पुनरपी अवतरला लोकास्तव भगवान्

( जाति–सूर्यकांत )

उंच उंच भुवनामधिं चौघे लोकपाल बैसुनी
जगताचीं या सूत्रें अपुल्या हालवितीं तेथुनी
तिथें निकट परि उंच दिवंगत पुण्यात्मे तिष्ठती
तीन अयुत संपतांच वर्षें पुनर्जन्म पावती.
रहात असतां बुद्ध महात्मा तिथें नभोमंडलीं
अवताराचीं पांच लक्षणें आम्हांस्तव प्रकटलीं
तीं निरखोनी अंतर्ज्ञानी देव बोलले तदा
जगास व्हाया सहाय जाइल बुद्ध पुनः एकदा.
" होय " वदे प्रभु " अवतरतों मी अतां जगद्रक्षणा
अखेरची ही वेळ, भूतलीं अवतरेन ना पुन्हा.
जन्ममृत्यु-चक्रांतुन आतां कायमची मुक्तता
लाभणार मजपरी माझिया भक्तांना तत्वतां.

जाइन आतां हिमाचलाच्या खालीं दक्षिणतळीं
जनता धार्मिक नृपाळ न्यायी शाक्यांच्या सत्कुळीं."

( जाति–भूपति )



त्या रात्रीं इकडे शुद्धोदननृपजाया
पतिसंनिध निद्रित असतां राणी माया.
पाहती जाहली स्वप्न विलक्षण कांहीं
कीं ढळुन नभांतुन दैवी तारक येई.
आरुणी मौक्तिकापरी दिव्य तत्कांति
तो कामधेनुच्या दुधापरी षड्दंती.
तो शिरला उदरीं – मायाहृदयीं मोद
जो मत्य जननिला अलभ्य परमानन्द.
उदयाचलशिखरीं सविता येण्यापूर्वीं
स्वर्गीय कांतिनें झळके अर्धी उर्वी.
थरथरले गिरिवर, लहरी कंपित झाल्या
माध्यान्हि फुलाव्या तशा कमलिनी फुलल्या.
ये कुंद वनाला प्रसन्नता रविकिरणीं

आनंद जननिचा पसरे वातावरणीं.
आणखी भोवतीं सप्त सागरांतूनी
अस्पष्ट चहुकडे घुमली दैवी वाणी.

( वृत्त–देवप्रिया )

" बुद्ध या लोकीं उदेला या चला सारे उठा
चेतना येई मृतांना, जीव ये जीवन्मृता.
व्हा झणीं जागे नि ऐका, वाळगा आशा नवी
येउनी हा बुद्ध आतां भूतलाला भूषवी. "

( जाति–भूपति )

पसरली शांतता असंख्य कारागारीं
वाढलें जगाच्या हृदयीं स्पंदन भारी
पसरीत टवटवी अपूर्व जीवनदायी
भूजलनिधिवरुनी वायू हिंडत राही.
आणि दे उषा मग तिमिरजाल झोकोनी
बोलले वृद्ध ते स्वप्नज्ञाते कोणी —
" हें स्वप्न सुमंगल कर्क मिळे सूर्याला
येणार राज्ञिच्या उदरीं सुत जन्माला.
तो सुधी अलौकिक धार्मिक आणि सुशील
अज्ञान जनांचें नाशुन त्या तारील
वा असेल इच्छा तर शासील जगास. "
ये बुद्ध महात्मा ऐशा शुभ समयास.

तिष्ठली दुपारीं माया राजमहालीं
संतुष्टलोचना पलाशवृक्षाखालीं
दरवळला परिमळ वृक्षराज डौलांत
शिखरापरि शोभे घालुन पर्णकिरीट.
जाणुनी समीपचि आली मंगलवेला

( हें ज्ञात होतसे अखिल वस्तुजाताला )
अवनम्र करी निजशाखा तो तरुराज
जणुं मायेवरती विरची सुंदर कुंज.
गालिचा फुलाचा पसरी वसुधा राणी
स्फटिकासम निर्मळ जल फुटलें पाषाणीं.
हो अखेर अनघप्रसवा मायादेवी
बत्तीसलक्षणी कुमार जन्मा येई.

( वृत्त–सवाई )

राजगृहीं शुभ वृत्त कळे आणि येइ सुसज्जित पालखि न्याया
मेरु नगाधिप सोडुनि धावति पालक चारहि वाहक व्हाया
अक्षरबद्ध सदा करिती क्रियमाण जगांतिल मर्त्य जनांचें
होति अहा ! अजि तेचि पहा परिवाहक सादर बुद्धविभूचे.

घेउनिया निज मौक्तिकभूषित सज्ज चमू रजतांबरवेषी
पूर्वदिशेहुनि चालत ये प्रभुदूत सवेगचि भारतदेशीं.
दक्षिणचा प्रभुदूतहि नील तुरंगदलासह दौडत आला
ये अपरेहुनि अंतर तोडित पालक घेउनि लाल रिसाला.

उत्तर पालक हेमसुरंजित यक्षगणांसह ये उतरोनी
ते धरिती नररूप म्हणूनचि तें सुरवैभव ये न दिसोनी
ज्ञात नरा नच भाग्य अहा ! मनुजामधिं येउनि देव मिळाले
स्वर्ग धरेवर तुष्ट खरोखर कीं भगवान् धरणीवर आले.

( जाति–भूपति )

शुद्धोदन नृपती होउनिया संतुष्ट
'साजरा महोत्सव करा' म्हणे 'नगरांत'
शिंपिले जनांनीं गुलाबपाणी मार्गीं
ध्वजदीप लाविले तरुवर जागोजागीं.

क्रीडेंत रंगली जनता प्रमुदित सारी
चहुकडे गारुडी, जादुगार, डोंबारी.
कंचनी सुवेषा नादताल निर्मीती
स्मिततरंग उठवित चंचल चरणाभवतीं.
कातडी मुखवटे चढवुन दाविति खेळ
ते मल्ल उठविती मैदानीं कल्लोळ.
पातले दूरचे व्यापारी धनवंत
प्रभुजन्म हो असें कळतां मंगलवृत्त.
नजराणे घेउनि कांचनपात्रीं रम्य
सामान चंदनी, पांच, सुवासिक द्रव्य.
रमणीय दुकूलें सांध्यनभोरंगी तीं
मढविलीं जयावर भारी माणिकमोतीं.
अवगुंठन केलें जरि बारा पदरांचें
तरि दर्शन होई मुग्ध सलज्ज मुखाचें.
या तलम देणग्या समर्पिल्या प्रभुपायीं
धाडिल्या आणखी नाना मांडलिकांहीं
बोलले नृपसुता वैभवशील समर्थ
‘ सर्वार्थसिद्ध तूं ’ संक्षेपें ‘ सिद्धार्थ ’

त्या जनसंमर्दी वृद्ध तपस्वी कोणी
भवनाद जयाच्या कधीं न गेले श्रवणीं
अश्वत्थतरुतळीं सहज तयें ध्यानस्थ
ऐकिलें सुरांचें बुद्धजन्मसंगीत
तडक तो तापसी आला राजगृहाला
तत्तेज देखुनी शुद्धोदन नत झाला
—आणि ती कृतार्था माता मायादेवी
निज पुत्र तयाच्या पावन चरणीं ठेवी
परि असित मुनी तो पाही शिशुच्या वदनीं
तात्काळ ‘ नको ! छे देवि ! ’ असें ओरडुनी

नतशीर्ष आठदां लावुनि धूळ कपाळां
बोलला, ‘ वंदितों तूंच असासि तो वाळा.
हें स्वस्तिक कुरळें, कांति दिव्य आरक्त
बत्तीस लक्षणें, पदतलचिन्हें स्पष्ट
दुसऱ्याहि खुणा या आठ नीट निरखोनी
तूं बुद्धचि साक्षात् सहज येइ हें कळुनी,
हे बुद्धा ! देशिल जगता धर्मज्ञान
जें शिकता मानव मिळवितील निर्वाण.
परि नसेन बघण्या तें जगतावर या मी !
वांछितों अंत मी, त्वरित निघे निजधामीं !
परि धन्य विभो ! मी दर्शनमात्रें तुझिया
मम वचन जाणुनी घे शुद्धोदनराया.
हा बहर नृपाला ! मानवतातरुवरला
जो युगायुगानें कधीं दिसे मोहरला.
स्वर्गीय कमल हें राजकुलीं तव उमले
आनंदभुवन हें अहा ! राजगृह झालें.
आनंद परंतू पूर्ण न हा टिकणार
हे राज्ञि ! असिलता तव हृदयीं शिरणार.
देऊन जन्म तूं धन्य बुद्ध भगवाना
झालीस सती प्रिय सर्व देवमनुजांना
झालीस यापुढें राणी ! दु:खातीत
परि जीवन म्हणजे दुःख असे हें सत्य
म्हणुनीच तुला गे ! आतां सप्तदिनान्तीं
लाभेल सुखानें दुःखांतुन चिरशान्ति.”

सातव्या दिनीं ती सायंकाळीं माता
उठली न एकदा सस्मित झोपीं जातां.
ती दिव्य जन्मदा सेव्य अमित अमरांना
पोचली अखेरीं परम उच्च सुरभुवना.

नृप इकडे ठेवी शिशु संगोपनकाजा
कुणि महाप्रजावति धात्री ती नृपकुलजा.
जी भिजवी स्तन्यें बाळाचे अधरोष्ठ
करणार गांजल्या जिवास जे संतुष्ट.

आठवें लागलें वर्ष राजकुमराला
आणि तो भूपती मनीं चिंतिता झाला
बाळाचें व्हावें असें अध्ययन नामी
जें सहज तया ये राजपदाच्या कामीं
अध्यापक ठरले सद्गुरु विश्वामित्र
शुभदिनीं बैसले घेउनि अपुला छात्र
हातांत चंदनी धूळपाटि मोलाची
बसविलीं चौकटीवरती रत्नें साचीं
विनयानें होतीं अर्धोन्मीलित नेत्र
शिष्यास म्हणाले गुरुजी विश्वामित्र—
" घे मंत्र लिहूनी गायत्रीचा बाळा
अधिकार जयाचा मात्र उच्च कुलजाला."
तो धूळपाटिवर काढी सुंदर चित्रें
करि चकित गुरूला आणिक लिपिवैचित्र्यें
जलदांचे बिंदू, तारे आकाशींचे
वा हवेंतले ते असंख्य कण धूळीचे.
सिद्धार्थ मोजुनी सहज गुरुला दावी
शतयोजन बुद्धी गुरूपुढें ती जावी
सानंद पराजित झालेले गुरुवर्य
बोलले, " बुद्धि ही जगिंचें महदाश्चर्य
तूं गुरू गुरूचा, शिष्य मीच तव बाळा "
परि तडा न गेला या स्तुतिनें विनयाला.

आदरी गुरूंना ज्ञानी जरि गुरुहून

आर्जवी वाणिनें प्रबुद्ध जरि भगवान
ऐश्वर्य नृपाचें, परि मृदु शिष्टाचार
कोवळें हृदय परि अंगीं शौर्य अपार.
मृगयेंत वाजिला सर्वांपुढती काढी
त्यापुढें कुणाची सारथ्यांत धडाडी!
मग कधीं मृगाला तसेंच जाऊं द्यावें
स्पर्धेंत कितिकदां मागें रेंगाळावें.
तो द्रवे पाहुनी जनावराची धाप
हरणार सवंगडी हीहि गोष्ट दे ताप.
कीं कसलीं न कळें स्वप्नें गूढ विचित्र
येऊन तयाचें व्याकुळ करिती चित्त.
रोपांतुन वाढे उंच तरू प्रच्छाय
तशि दयाशीलता प्रभुची वाढत जाय
नामेंच विदित त्या अश्रू, दुःख क्लेश
विश्वास असा कीं नृपा न यांचा लेश.

ऋतु वसंतकाळीं राजोद्यानावरुनी
चालली मानसा सुंदर हंसश्रेणी.
हिमशुभ्र आपुल्या मालेंतून सुरेख
ते सभोवतालीं करिती कलरवंसेक.
मारिती पंख ते प्रेमप्रेरित सारे
आतूर गांठण्या हिमाद्रितील अगारें.
तों गौतमबंधू देवदत्त खालून
शर तीक्ष्ण सोडता झाला नेम धरून.
लागला बाण तो हाय! हंसनेत्याला
मग अशक्य जाणें नीलपथांतुन त्याला
कोसळे भूमिवर होउनिया घायाळ
आणि तीं मनोहर पिसें रक्तबंबाळ!
सिद्धार्थ धाउनी प्रेमें त्याला उचली

घे मांडीवरती स्नेहानें कुरवाळी
घालून आपुलें बुद्धासन सिद्धार्थ
त्या दीन विहंगा झटे कराया स्वस्थ.
थांबविली त्यानें धडधड खगहृदयाची
अन् तशीच फडफड घाबरल्या पंखांची.
त्या विद्ध जाहल्या सान पाखरावरूनी
कर कदलीदल मृदु फिरवी प्रेमें दोन्ही.
शर काढुनि करितो राजकुमर उपचार
मधु सिंचुनि कवळीं पानें बांधी चार.
जाणीव अल्प परि दुःखाची त्या बाळा
घे टोचुनि सायक अपुल्या मणिबंधाला.
कळतांच वेदना आलें नयनीं पाणी
लागला खगाच्या शुश्रूषेस फिरूनी.
तो येउन अनुचर कुणी गौतमा वदला
' द्या पक्षी अमुच्या कुंवरजींनीं वधिला.
तो पडे वरूनी गुलाबवृक्षामाजीं
मज धनी सांगती आणाया तो द्या, जी."
" छे " वदे उसळुनी झणीं बुद्ध भगवान,
" करणार नाहिं हा विहग तुझ्या स्वाधीन.
जरि दुर्दैवानें गतप्राण हा होता.
तरि राजबंधुला सहजच्चि दिधला असता.
हा सजीव आहे, वायुतुल्य गति मात्र
मद्बंधुशरानें झाली आहे नष्ट."

( वृत्त–पंचचामर )

तोंचि येइ देवदत्त गौतमास बोलला
" पक्षि हा असो नसो गतासु, दे परी मला.
मेघडंबरीं धनी कुणीच या न गौतमा,
मीच आणिला धरेस, देइ आमुचा अम्हा. "

( वृत्त–स्वागता )

ऐकुनी वचन हें सुहृदाचें
पालटे न मन शांतिधनाचें
लावुनी विहग तो निजगाला
प्रेमसागर सवेग म्हणाला,

( जाती–चंद्रकला )

" प्रेमाचा अधिकार    दयेचा हक्कहि गाजविणार
आणि जीव ते लाखकरोडों संपादन करणार.
त्यांतिल हा पहिला    विहंगम सानुकला माझा
अशक्य होणें हा करांतुन दूर बंधुराजा.
मूक जगाची या    होतसे स्थिति केविलवाणी
म्हणुनी मी सजलों तयाला फोडाया वाणी.
कळे मला आतां    अंतरीं होई साक्षात्कार
— आणि मीच आतां दयेचा मंत्र जगा देणार.
पूर आटवाया    जगांतिल झटेन दुःखाचा
सिद्ध परंतू मी घ्यावया निर्णय सुजनांचा. "

( वृत्त–मधुवाहिनी )

नृपमंदिरीं बुध बैसले करण्यास निर्णय येउनी
पहिल्यास दे कुणि मान्यता दुसराच पक्ष धरी कुणी.
प्रकटे अखेर अनोळखी मुनि बोलला वच निश्चयी,
" नच अंतकास जिवावरी प्रभुता असे लवमात्रही
अति दुष्ट अंतक सर्वदा झटतो विनाश करावया
परि वृद्धि रक्षक साधतो वितरूनि भूमिवरी दया.
म्हणुनी दयार्द्र कुमार जो खगरक्षणा सरसावला
ठरणार मालक तोच द्या बुधहो ! विहंगम त्याजला. "

( वृत्त–स्वागता )

" साधु ! साधु ! " बुध सर्व म्हणाले
गौरवार्थ मुनिच्या नृप चाले.
तो अदृश्य परि होय तपस्वी
जाहले चकित सर्व मनस्वी.
पाहिल्या परि सभेंतच्चि कोणी
होय एक फणि लुप्त तिथोनी.
रूप घेउनि असे भुविं येती
ही प्रसिद्ध जगतीं सुररीति.

( जाति–भूपति )

यापरी रक्षुनी विहंगमाचे प्राण
अवतारकार्य निज आरंभी भगवान
नच दुःख दुजें या हंसावाचुन ठावें
क्षत भरून येतां पक्षी तोहि सुखावे.
एक दिन बोलला नृप निघतां बाहेरीं
" मजसवें कराया प्रिय तनया ! चल फेरी
फलपुष्पसंपदा पृथ्वी देवो अंतीं
म्हणुनिया तिला जन खुलविति रम्य वसंतीं.
जें माझ्या मागुन तुझ्याकडे येणार
सुखवुनी प्रजा जें भरितें नृपभांडार
तें राज्य पहाया जाऊं. बघ सृष्टींत
पालवी, हरित तृण, आणिक कृषिवलगीत. "
तात्काल मान्यता कुमार गौतम देई
आणि ते निघाले घोड्यावर दोघेही.

जलपूर्ण विहिरी, बागा ठायीं ठायी
खपतात चहुकडे शेतकरी निजकार्यी.

रोवून खूर ते कडक उन्हानें तप्त
बलिवर्द ओढती नांगर ते शेतांत.
लोपते कठिनता हळूंहळूं भूमीची
सर्वत्र पसरल्या दिसती विस्तृत वीची
बाजुला बहरली आंबेराई दाट
झुळझूळ तींतुनी वहात जाई पाट.
आणखी सृष्टीनें प्रमुदित अंतःकरणें
त्या जलप्रवाहा दिधलीं हिरवीं वसनें.
पेरणी दूरवर चालविली कृषिकांनीं
रंगली गायनीं स्मितवदना वनराणी.
झुडुपांत चहुकडे सळसळ गुंजन चाले
सरडे नि भृंग ते वसंतागमें धाले.
पद एक उचलुनी स्तब्ध उभा करकोचा
बैसला गोधनीं शुभ्र थवा बगळ्यांचा
नभिं सुवर्णरंजित प्रदक्षिणा करि घार
देवालयशिखरीं करितो मोर पुकार.
डौलांत तरुशिरीं ती मैनेची स्वारी
पळण्यांत खारिची लगबग दिसते भारी
विहिरींत गोजिरीं निळीं कबुतरें फिरतीं
अन् कुहूँकुहूँची स्वरमाला गुणगुणतीं.
हो दूर साजरा विवाह खेड्यामध्यें
म्हणुनि तीं मनोहर झडतीं मंगलवाद्यें.
ही अशी पाहुनी सृष्टी वैभवशाली
मति सिद्धार्थाची प्रसन्न हो तात्कालीं

— परि खोल पाहतां सहजचि दिसले त्यातें
पसरले कितीतरि जीवनपुष्पीं कांटे!
भडकल्या दिनाच्या ऐन दुपारीं ज्वाला
आणि तो जुंपला शेतकरी कामाला.

किती घाम बिचारा पोटासाठीं गाळी !
मखमली पाठिवर वृषभांच्या जूं घाली.
जगतात कसे ते मुंग्यावरती सरडे !
परि साप येउनी धरतो त्यांचें नरडें !
उडविते घार त्या अंतीं भुजंगमास
पळवितो ससाणा करकोच्याचा घास
धरि फूलपाखरें रत्नजडित बुल्बुल तो
परि त्यासहि वैरी भक्ष्य म्हणोनी गिळतो.
हरएक धावुनी हंतकास निर्दाळी
आणि ये अखेरीं तीच त्यावरी पाळी.
या सुभग समुज्ज्वल बाह्य जगाच्या मागें
किति भयद राक्षसी घटना दिसण्या लागे.
कीटकांपासुनी उन्नत मानव जात
अन्योन्यकंदनीं गढलेली दिनरात.
तो कृषिक भुकेला ! वृषभहि तो हैराण —
जूं अवजड घासुनि झिजली ज्याची मान.
हा जीवनसंगर पिळी प्राणिजातास
सिद्धार्थ बोलला सोडुनिया निश्वास.

( वृत्त–स्रग्विणी )

" हीच का सौख्यसंपन्न सृष्टी मला
दाखवाया तुम्ही आणिलें या स्थळा ?
कर्षकाची दशा काय हो जाहली !
भाकरी अश्रुबिंदूंत खारावली-

पुंगवांच्या न या दुःखकष्टा मिती
दुर्बळा शक्तिनें श्रेष्ठ संहारिती
थोरसानामधें झुंज हो भूवरी
कारवाई तशी चालली अंबरीं.

नाहिं गाण्यांतही दुर्बळा आसरा
जीवसंग्राम हा क्रूर भारी खरा.
दूर जा एकटें राहु द्या मन्मना
या सभोंतालच्या दृश्यसंचिंतना. ”

( जाति–भूपति )

बोलून बैसला पद्मासन घालून
प्रभु जंबुतरुतळीं ध्यानमग्न होऊन
जीवना भयंकर रोग असे जो जडला —
तन्मूल कोणतें ? — उपाय त्यावर कसला ?
या चिंतनामध्यें असतां गौतम चूर
ये दयार्द्रतेचा अंतःकरणीं पूर.
अंतरीं प्रेम मग भरे प्राणिजाताचें
अन् भरतें येइ दुःखसान्त्वना साचें.
हो आत्मविस्मृती झाल्या नष्ट उपाधि.
त्या राजमनाची लागे सहज समाधि.
— आणि त्या मिळालें तेव्हां श्रेष्ठ ‘ज्ञान’
जी प्रथम पायरी गांठाया ‘निर्वाण’.

( वृत्त–मालिनी )

वरुनि गगनिं होते चालले देवदूत
विटपशिखरिं पख आपुलीं हालवीत.
द्युतिवलय सभोतीं रंगला चिंतनांत
परम शुचि अशा ते बुद्धदेवा पहात

मिटवुनि निजपंखें नम्र झाले समोर
स्तविति मधुर गीतें शाक्यपुत्रास थोर
परम शुभ सुरा हें सांगण्या वर्तमान
करिति मग क्षणीं ते देवदूत प्रयाण.

( जाति–भूपति )

नृपसेवक येती शोधाया बुद्धाला
परि कुमर अजुनि तो चिंतनांत गढलेला.
माध्यान्ह संपली सरकत जाती छाया
लागला दिनमणी अस्तगिरीवर जाया.
सावली स्थिर परी जंबुतरूची राही.
जणूं ऊन विभूला नच लागो चिंता ही.
पाहिला जयानें अनुपम हा देखावा
त्या गुलाबकुंजीं शब्द येति ऐकाया—
" सावली जोंवरी नृपसुतहृदया ग्रासी
तोंवरती माझी छाया पुरविन त्यासी."



# सर्ग २ रा

( जाति–पादाकुलक )

वयास वर्षें झालीं अठरा
    कुमार गौतम सोडुनि शिशुपण
    यौवनामधें करी पदार्पण
    आज्ञापी दासा शुद्धोदन,
“ सुंदर इमले बांधा कुमरा.
एक असा–मजबूत बांधणी
    तुळया भक्कम, ऊब पुरेशी
    हिवाळयांत हो सुखकर ऐशी
    दुसरा हटविल जो ग्रीष्मासीं
संगमवरवरी ज्यास कमानी.
लाल विटांचा तिसरा मोहक
    निळी सजावट ज्या कौलांची
    आणि बांधणी ज्या डौलाची
    जेथे वसती सुखकर साची
    पेरणि होतां, फुलता चंपक.
‘ शुभ ‘ सुरम्य ’ अन् ‘ भव्य ’ अशीं तीं
    प्रासादांची ठरलीं नांवें
    भवतीं उपवन तें फोफावें
    फुललेल्या कुंजांतुन वाहे
गात गात जळ मंजुळ गीति.

अशी तयारी सत्त्वर झाली.
महाल भवती, कुरणें हिरवीं
बुद्ध कांति निज त्यांत पसरवी
क्षणोक्षणीं सुख नवें अनुभवी
अमूप यौवनधन त्या कालीं.
परी रुपेरी सरोवरावर
छाया करिती कधिं फिरते ढग
सिद्धार्थाची होई तगमग
विचार मागिल आठवुनी मग
ध्यानावस्थित त्याचें अंतर.
बघुनि वदे हें नृपती सचिवा
" वदति भविष्यज्ञाते मुनिवर
होइल हा शत्रुघ्न भूपवर
हेंचि मला प्रिय असें खरोखर
प्राणाधिक हा पुत्र मम जिवा.
मंत्रिजनांनो ! अथवा घेइल
गौतम खडतर मार्ग तपाचा
निवृत्तीचा अन् कष्टाचा
अंत शेवटीं सर्वस्वाचा
होतां काय अखेरीं राहिल ?
त्याच पथावर मंदिरांतुनी
साभिलाष तो कटाक्ष टाकी
अहो ! सुधींनो ! मज सांगा कीं
कसा प्रतापी होइल लोकीं
राज्यशकट स्वेच्छया हाकुनी."
यावर बोले प्रधानमंत्री—
" प्रेमचि औषध या लहरीवर
भावतंतु ललनेचे सुंदर
विणितां त्याचें उदास अंतर

प्रसन्न होइल ही मज खात्री
लावण्याचें रहस्य अजुनी
   कळलें कोठें सिद्धार्थातें ?
   स्वर्ग विसरवी नेत्रयुगुल ते
   रसायनापरि ओठ तरल ते
प्रत्यय याचा दिधला न कुणी.
द्या राजेश्वर ! आतां त्यासी
   नयनमनोहर कोमल बाला
   तोडुन टाकी लोहशृंखला—
   अशी प्रबळ ती विचारमाला
सहज फसे रमणीकचपाशीं, ”
मसलत ही पटली सर्वांना
   परि बोले शुद्धोदन राजा
   “ मधुर आणिल्या प्रमदा समजा
   निवड कराया गौतमभाजा
प्रेममार्ग परि विचित्र जाणा.
सौंदर्याचें उपवन भवतें
   गुच्छ कोणता घ्यावा अनुपम
   अशा संभ्रमीं पडेल गौतम
   सोडुनि देइल सुख स्वर्गोपम
अननुभूत अद्यापि तया तें. ”
अमात्य दुसरा वदता झाला.
   “ शर हृदयावर बसे तोंवरी
   हरिण अरण्यीं संचार करी
   फिरतां फिरतां अशी कधितरी
सिद्धार्थाला पटेल बाला.
दिसेल नंदनवन तद्‌वदनीं
   जगत्प्रबोधिनि उपेक्षून ती
   गमेल त्यातें मनोज्ञ युवती

म्हणुन नृपा ! ही ऐका विनती
करा महोत्सव राजपट्टणीं.
सदैव रुचती शाक्य जनांना
उत्सव ते यौवनमत्तेचे
ज्यांत प्रदर्शन सुंदरतेचें
हरखतील मन पौरजनांचें
रूपवती राज्यांतिल नाना.
–आणि यशस्वी रमणिजना त्या
पदकें द्यावीं कुमराकडुनी
सन्मुख येतां रम्य विजयिनी
एकदोन खचितची त्यांतुनी
हरितिल सिद्धार्थाच्या हृदया.
मृदु गालीं औदास्य तयाच्या
जाइल विलया कटाक्षपातें
प्रेमदृष्टि शोधी प्रेमातें
फसवुन आणूं सिद्धार्थातें
नकळत नंदनवनीं सुखाच्या."
एक दिनीं मग राजमंदिरीं
सौंदर्योत्सव भरे अलौकिक
ललकारिति मोठ्यानें सेवक
कपिलवस्तुच्या अगणित मोहक
उत्साहें प्रगटती सुंदरी.
पारितोषिकें सर्व मुलींना
मिळतिल सिद्धार्थाच्या हातें
प्रसिद्ध ऐसें झालें होतें
पहिला परि उपहार तियेतें
ठरेल जी कुणि निस्तुल ललना.

( जाति–लीलारति )

त्या तारुण्याच्या खनी अहा ! बालिका
नुकत्याच नाहल्या होत्या नीलालका
ती दिसे सुशोभित कुंतलरचना किती !
लोचनीं प्रफुल्लित सुरमा त्या घालिती.

करचरणीं कोमल मेंदीचा रक्तिमा
झगझगीत तारे खुलवितात कुंकुमा
पोषाख रेशमी शाली अंगांवरी
झळकती गजगती अशा तरुण सुंदरी.

वाढली त्यांचिया धडधड पेलव मनीं
सरके न भयानें वर सुंदर पापणी
उपहार घेउनी अधोमुखी लाजल्या
त्या त्वरें किशोरी स्वस्थानीं परतल्या.
आणखी त्यामधें कुणी अधिक देखणी
निज सौंदर्यें स्मित खुलवी भूपाननीं
स्फूर्तिनें सभाजन करिती तत्स्वागता
कोंडल्या मृगापरि होय सभय ती लता.

सिद्धार्थ-करा ती स्पर्शाया घाबरे
थरथरत येउनी सखीजनामधिं शिरे
तो दिसे असा प्रभु दिव्य तपस्व्यापरी
जगताहुनि तिच्चिया उच्च गमे कितितरी.

( वृत्त–उपजाति )

किती मुली यापरि रम्य येती
सौंदर्यरत्नें नगरांतलीं तीं
ये एक अंतीं कमनीयबाला
प्रकाश फेकीत दहा दिशांला

उमाच ती मूर्तिमती किशोरी
स्वर्गीय ये रूप भरास भारी
डोळे सुरेख प्रणयी मृगीचे
अवर्ण्य आकर्षण आननींचें.

दिसे समीपस्थ सुहृज्जनाला
सिद्धार्थ अस्वस्थ मनांत झाला
धिटाइनें ठेवुनि हात वक्षीं.
बुद्धाकडे पाहत ती मृगाक्षी.

शंखापरी उन्नत ताठ मान
बुद्धास बोले रमणी हसून
" कांहीं उरे का उपहार मातें ? "
सिद्धार्थ तात्काळ वदे तियेतें

" देऊन झाले सखि, सर्व कांहीं.
स्वीकार साधी परि देणगी ही
खरोखरी भूषण तूं पुराला. "
सिद्धार्थ अर्पी निज रत्नमाला.

( वृत्त–व. ति. )

त्या रेशमी मृदुल श्यामल रम्य कंठीं
रत्नें अनर्घ्य हिरवीं किति शोभलीं तीं.
डोळे भरून बघतांच परस्परांनीं
घे प्रीति जन्म पहिल्याच कटाक्षबाणीं.

( जाति–पादाकुलक )

—आणि महोत्सव समाप्त झाला
सहज गौतमा वदले कोणी

दा. क्र. ९५५८९

शाक्य सुतेच्या प्रथम दर्शनीं
कशी भडकली अंतःकरणीं
सात्विक अनुरागाची ज्वाला.
यावर कथिलें सिद्धार्थानें
" मुळींच नव्हतों आम्ही परके
आज लोटलीं कितीक शतकें
असें व्याधसुत मी जो भटके
वन्य मुलीसह स्वच्छंदानें
यमुना नंदादेवीजवळीं
रम्य स्थळिं ज्या उगम पावली
तेथें आम्ही सकल मंडळी
( यशोधरेसह ) रमलों खेळीं
ससे बागडति जसे वर्तुळीं.
मुकुट फुलांचे, तुरे पिसांचे
घालुनि गेल्या धांवत पोरी
जिंकण्यांमधें शर्यत थोरी
परि जी मागें राहि किशोरी
तीच भुलवि मन शाक्यसुताचें.
देइ प्रीतिची तिला देणगी
अन् शशशावक एक गोडसें
वनीं राहतीं तीं बहु हर्षें
सुखांत गेलीं अनेक वर्षें
सवेंच जाई युग्म स्वर्गी.
—आणि संपतां अहा ! अवर्षण
बीज जेविं ये फोफावूनी
पुण्य, पाप, सुख, दुःखहि दोन्ही
जीं जीं कर्में करती प्राणी
त्यांस लाभतें पुनश्च जीवन.
हिरवीं अथवा काळीं पानें

प्रेमभावना अथवा मत्सर
पुनः उमलतो मिळता अवसर
जन्ममृत्युचें चक्र निरंतर
फिरतें अव्याहत नेमानें.
तो व्याधाचा सुत मी प्रियकर
यशोधरा ती रमणी वन्या
आज इथें ये नागरकन्या
अद्यापिहि ती प्रीति अनन्या
वसे आमुच्या हृदयीं सुस्थिर."
कळून चुकले सर्व जनाला
यशोधरा सुप्रबुद्ध तनया
कशी हलविते गौतमहृदया
बघती प्रेमें ते अन्योन्या
शुद्धोदन आनंदित झाला.

(वृत्त–शालिनी)

हासोनी तो भूप वात्सल्यमूर्ति
बोले आतां, सापडे जाल हातीं
त्याच्या साह्यें आणुं या पक्षि खालीं
वेगें जाई दूर जो अंतराळीं.

कार्यारंभीं जाणत्यांना विचारा
दूता धाडा कन्यकेच्या अगारा
कांता व्हाया योग्य ही गौतमाची
सांगा इच्छा सुप्रबुद्धास माझी."

घेऊनी हा जाति संदेश दूत
त्यांना बोले नम्र होउनी तात
"सांगावें त्या श्रेष्ठ शुद्धोधना कीं
केली यांचा कन्यकेची अनेकीं

त्या सर्वांना कौशल्यें हारवोनी
खड्गानें वा कार्मुका वाकवोनी
किंवा अश्वारोहणाच्या कलेंत
मागें टाकी आर्जवी राजपुत्र

झालें ऐसें – धन्य तो आणि आम्ही
अर्पू त्यातें आमुची कन्यका ही
होणें कैसें सर्व हें शक्य मात्र ?
सिद्धार्थांचे मार्ग सारे विचित्र !"

या संदेशें भूप अस्वस्थ झाला
लाभे बाला केंवि ती आत्मजाला ?
बुद्धानेंही भावना व्यक्त केली
"व्हावी कांता तीच माझी मराळी."

व्हावें कैसें हें परी हाय ! शक्य
युद्धामध्यें नंद होता अजिंक्य
तेजी वारू अर्जुनें आवरावें
ज्या ओढी तो देवदत्त प्रभावें

किंचित् हासे आणि बोले कुमार
विद्यांचा मीं पाहिला याहि पार,
वार्ता आतां जाऊं द्या सर्व राज्यीं
स्पर्धेसाठीं सिद्धता पूर्ण माझी

वाटे मातें आत्मविश्वास फार
प्रीतीचा मी सामना जिंकणार."
जे जे कोणी आपणा तुल्य योद्धे
त्या सर्वांना बुद्ध आमंत्रणें दे

( जाति–पादाकुलक )

उजाडला तो दिवस सातवा
   गर्दी ही उसळे मैदानी !
   नगरांतुनि अन् खेड्यामधुनी
   प्रेक्षक येती चहुबाजूंनीं,
शाक्यांचा तर मोठाच थवा
आप्त आपुले घेउनि संगें
   यशोधराही गांठी तें स्थळ
   सवें वाजती वाद्यें मंगळ
   थाट वधूचा – झळकति उज्ज्वल
बलिवर्दांचीं सुवर्णशृंगें
देवदत्त तो राजकुलोद्‌भव
   अभिजातचि ते नंद नि अर्जुन
   जमले जें मैदानी यौवन
   त्यांत शोभती हे दोघेजण
बहार जणुं त्यांतला नवोतव
शुभ्र हयावर गौतम येई
   नांव जयाचें सुंदर कंटक
   येतां भवती पाही टकमक
   खिंकाळे, हो चकित अचानक
बघतां भवतींची नवलाई
सूक्ष्मपणानें गौतम निरखे
   जमलेला तो समाज सारा
   राजकुलाहुन गरिब बिचारा
   अपुरा ज्यातें अन्न निवारा
असेल परि सुखदुःख सारखें
परी पाहतां यशोधरेतें
   स्मित तरंग ये उज्ज्वल वदनीं

लगाम ते रेशमी खेचुनी
गौतम उतरे घोड्यावरुनी
उच्च रवें बोलें सर्वांतें—
" सर्वोत्तम वर असेल त्यानें
या कन्यारत्ना मिळवावें
श्रेष्ठत्वा निज सिद्ध करावें "
यावर नंद वदे उत्साहें
" कौशल दावूं शरसंधानें "
देवदत्त अन् नंद नि अर्जुन
यांनीं अपुलें लक्ष विंधिलें
जयध्वनी चहुकडे निघाले
गौतमाकडे नेत्र लागले
हरणारचि का हा अपुला पण — ?
– आणिक कातर यशोधरेनें
प्रियतम सिद्धार्थाचें अपयश
पाहण्यास नच येई मानस
अंतरांत होउनि कासाविस
— त्वरित झाकलीं भीत लोचनें
गौतम ये सरसावुन नंतर
धरी आपुलें चाप समोरी
सहज लीलया चढवी दोरी
म्हणे हसुनि ही क्रीडा सारी
' प्रेमास्तव द्या धनू श्रेष्ठतर '
— आणि बोलले कोणी जवळ ?
' धनू मंदिरीं एक पुरातन
कुणी शकेना चढवाया गुण '
' आणा तर तें सत्वर जाउन '
सिद्धार्थानें आज्ञा दिधली
लोहाचें तें चाप भयंकर

त्यावरती सोन्याची नक्षी
एकवार तें गौतम लक्षी
बोले बंधुंना प्रतिपक्षी
‘ चढवा,...चढवा रे गुण यावर ’
कुणास येई गुण न चढवितां
गौतम विजयी होइ अखेरीं
प्रत्यंचा वाजवुनी भारी
स्थिर हातानें सायक मारी
लक्ष्य वेध करि बघतां बघतां
अवघड यापरि इतर शर्यती
दुसऱ्यांना हरवूनी आतां
जिंकी सहजी बुद्ध विजेता
गौतम – विजयें प्रमुदित जनता
‘ जय जय गौतम ’ झाली वदती

( वृत्त-उपजाति )

वधूपिता यावर गौतमाला
आलिंगुनी प्रेमभरें म्हणाला
“ प्रियोत्तमा, तूंच खरा अतुल्य
व्हावास हें मन्मनिं खास ध्येय

तूं स्वप्नसृष्टीमधिं हिंडणारा
फुलांतुनी वावरसी उदारा
ही शस्त्रविद्या शिकलास केव्हां ?
आश्चर्य हें वाटतसें जना या

हें जिंकिलें रत्न निज प्रभावें
तुझेंच हें स्वीकृत तूं करावें. ”
ऐकूनिया भाषण हें पित्याचें
उल्लोललें अंतर कन्यकेचें

सारून किंचित् अवगुंठनाला
घेऊन हातीं नवपुष्पमाला
यशोधरा बुद्धसमीप होई
करद्वया तच्चरणास लावी

" मी आपुली आर्य, पहा " वदे ती
माला त्वरें घालुनि बुद्धकंठीं
अश्वावरी ठेवुनि एक हात
सिद्धार्थ सानंद तिला पहात

( जाति–पादाकुलक )

— आणिक एका सुमुहूर्तावर
विवाहमंगल होय साजरें
मंडप शोभा डोळयांत भरे
दरवळताती मधुर अत्तरें
विवाहहोमीं मग्न वधूवर
सप्तपदीं अन् ' नाति चरामि '
वधूपिता मग वदता झाला
अश्रु आवरुनि जामाताला
" स्वीकारी प्रियतम कन्येला
जिला आजवर जोजविलें मी'
मिळुनि जाइ ती तुझ्या जीवनीं
प्रेमें वागवि तिज पूजार्हा "
निघे पतिगृहा रमणी भार्या
मंगलवाद्यांच्या ललकाऱ्या
प्रेमपुर ये वातावरणीं
परी पिताजी अधिक जाणते
विसंबति न प्रेमावर केवळ
विरचिति लीला – हर्म्य समुज्ज्वल

जगीं ठरावा अनुपम, निस्तुल
प्रीतीचें कारागारचि तें
मधेंच क्रीडाशैलाखालीं
हिमनगतनया नदी रोहिणी
गात गात मधुमोहक गाणीं
डौलांत निघे मंद पदांनीं
उडी घ्यावया गंगा – सलिलीं
दक्षिणेस संभार तरूंचा.
झाकुनि टाकी दुनिया शहरी
क्वचित् उमटला कोलाहल जरि
सौम्य होऊनी ये वाऱ्यावरि
वाटे गुंजारव भ्रमरांचा
उत्तरेस गिरिराजी मोठी
हिरवीं वसनें अंगीं लेवुन
डोक्यावर हिमकिरीट घालुन
कल्पकतेला फुलवुन चढवुन
जणुं देवाशीं करि गुणगोष्टी
ढगाळलेल्या शिखरावरुनी
उड्या स्फटिकवत् घेती निर्झर
गुलाब फुलले कुठें दूरवर
कुठें नादतो व्याघ्राचा स्वर
शेतकऱ्यांची कुठें लावणी
खिल्लारांचा कुठें पायरव
उंच नभीं घे गरुड भरारी
हिरवळ खालीं पसरे गहिरी
सिद्धार्थाचा प्रासाद वरी
घुमटाचें लखलखतें वैभव
भव्य मनोहर महाद्वार तें
गजाननाची त्यावर मूर्ति

ज्ञान धनाची केवळ पूर्ति
प्रासादाच्या भिंतीवरती
राधाकृष्णकथेचीं चित्रें
दगडावरती आरस्पानी
शिरा गुलाबी दिसती मोहक
दारांचें चंदन उन्मादक
जागोजागीं फुलें सुवासिक
कारंजाचें नाचे पाणी
फळाफळावर धावति रावे
बलाकमाला दुग्धधवल ती
न्याहाळीते मयूरपंक्ति
सान विटुकली खार चपळ ती
खाद्य करांतुन घ्याया धावे
शांतीचें साम्राज्य त्या स्थळीं
बागडती निर्भय मृगबाळें
नागहि रविकिरणांत झळाळे
करीत हिंडे नाना चाळे
कृष्णमुखी ती वानरटोळी
दासदासिजन मधुर आर्जवी
मोहरलें सौंदर्य चहुकडे
जो तो सुखवायास धडपडे
श्रवणिं मंजुवच सर्वत्र पडे
आज्ञा अभिमान-विषय व्हावी.
जणूं फुलांच्या ताटव्यांतुनी
धुंद, शांत ती नदी चालली
जीवनसरणी तशी तेथली
त्या अद्‌भुत दरबारामधली
यशोधरा सुंदर सम्राज्ञी.
अंतर्गृह तर अधिक सुशोभित


मनावरी टाकण्या मोहिनी
कौशल्याची अजोड करणी
चौकामध्यें ती पुष्करिणी
स्फटिक शिलांची सुबक सजावट
ग्रीष्म ऋतूंतहि हो न कहाली
रविकर येतां दारामधूनी
सौम्य रुपेरी जाती बनुनी
सांध्य माधुरी ये माध्यान्हीं
प्रीति शांतता कुंजाखालीं.
तेज दिव्यांतुन सुगंधि येई
बिछायतीवरती सोनेरी
झगमगतो पडदा जरतारी
नाजुक ज्याची रेशिमदोरी
प्रियतम जीवा प्रवेश देई.
दिनरजनीचें भानच न उरे
उषेपरी द्युति जिथें सदाची
तींत कोवळिक सायंतनिंची
करीत वृष्टी उत्साहाची
वातावरणीं सदैव पसरे
मध्यरात्रिंची गभीर शांति
प्रभातची अनमोल रुचिरता
पक्वान्नांची तिथें विपुलता
उंची पेयें सुखविति चित्ता
चषकामधुनी हस्तीदंती.
अहोरात्र नाचती कंचनी
सदैव रुमझुम करिती पैंजण
तालसुरावर चाले नर्तन
सुलोचना घालितात विंझण
सिद्धार्थाच्या मिटल्या नयनीं.

जागृत होता विचार त्याचे
पुनः गुंतती नृत्यस्वप्नीं
प्रेमाचीं उत्तेजक गाणीं
यशोधरा झुलवी फुलराणीं
असें सौख्यमय जग बुद्धाचें.
शुद्धोदन आज्ञापी सर्वां
" परिसरांत त्या प्रासादाच्या
धरा आवरुन अभद्र वाचा
जरा, मृत्यु, दुःखव्याधीचा
उल्लेखहि ना कुणी करावा. "
म्लान कुणी जर दिसली बाला
अपराध तिचा नसता कांहीं
हद्दपार तिज केलें जाई
कारण कीं दक्षता असे ही
दुःख तिचें न दिसो बुद्धाला.
कडक तेथले होतें नियमन
कोणी बाहेरिल जगताची
चिताग्निची वा भवमृत्यूची
करुण कहाणी सांगे साची
निवेदका त्या होई शासन
भल्या पहाटेपूर्वी परिजन
शुष्क जाहलीं गुलाब सुमनें
जीर्ण जाहलीं सारीं पर्णे
झाडावरुनी तत्परतेनें
दृष्टिआड देतात झुगारुन.
आणि बोलला नृप शुद्धोदन
" लागो तन्मन कधिं न परत्रीं
पूर्ण रमावें तयें अरत्रीं
शासावी ही सर्व धरत्री

कुमरें राजाधिराज होउन."
सुंदर कारागार असे तें
  प्रीति जेथली हो अधिकारी
  सौख्याचे गज कठीण भारी
  उंच चढविल्या भिंती चारी
दूर ठेवण्या संसारातें.
कडक बसविला नृपें पहारा
  "बाहेरी न कुणा सोडावें
  असेंच जग हें अलग रहावें
  मत्पुत्रासहि अनुशासन हें":
रक्षकास हा सक्त इषारा !

# सर्ग ३ रा

( जाति–जलधरमाला )



सुखप्रीतिच्या त्या रम्य प्रासादीं
जरा, मरण वा नव्हत्या आधि, व्याधी.
स्वप्नसागरीं जाती दूर फिराया
तेच आणिती कधींमधीं ही माया
वास्तवांत परि लेशहि त्याचा नाहीं
तेथे भगवान् आनंदानें राही.
यशोधरेच्या वक्षावर शिर ठेवी

प्रसन्न करण्या येई निद्रादेवी
मृदुल करें ती तन्नयना कुरवाळी
मधेंच उठुनी बुद्ध देइ आरोळी.
" कळलें ! मजला आयकिलें मी जगतां
थांव तुजकडे येतों सत्वर आतां."
सभय होउनी पुसते आयतनेत्रा
" काय जाहलें सांगा जीवितनाथा ?"
अपार करुणा गौतममुद्रेवरती
रूपावर ये दिव्यत्वाची कांति
प्रभु मग हसुनी प्रियतमेस समजावी
वीणावादन तिला कराया लावी
—आणि एकदां कुठुनी कैसें नकळे
गान अनाहत वीणेवरती उठले

इतरां वाटे वायुलहरिची लीला
स्तोत्र गूढ परि ऐकू ये बुद्धाला.

( वृत्त–देवप्रिया )

" हिंडणाऱ्या मारुताचे नाद आम्ही गौतमा
हिंडतों विश्रांतिसाठीं तीच लाभेना अम्हा
हाय रे ! वाऱ्यापरी हें मर्त्य लोकींचें जिणं
हुंदके, अश्रू, उसासे, वादळें, आक्रंदनें.

कोठुनी आलों नि कोठें जायचें हे नाकळे
जीवनाचें मूळ तैसा अंतही न आढळे
व्यक्त सृष्टीमागुती तुम्हांपरी आलों अम्ही
कोणता आनंद देई दुःख नानाविग्रही !

वैभवाचा या कशाचा मोद तूझ्या अंतरीं
अक्षय प्रीती जरी ती सौख्यदा होती तरी

छे ! अरे वाऱ्यापरी हें चाललेलें जीवन
वस्तु या तारांवरी कीं काढले क्षीण स्वन

हिंडतों सर्वत्र आम्ही भूवरीं मायासुता
यामुळें आक्रंदतों – उल्हास नाहीं तत्त्वतां
दुःखराशी सर्वदेशीं साश्रु लाखों लोचन
चोळती लाखों हजारों हात दुर्भागी जन

तूं परी उद्धारकर्ता ये तुझी आतां घडी
तिष्ठते दुःखी धरित्री, हात देईं तातडी
लोक अज्ञानांध झाले वेदनांच्या वर्तुळीं
ऊठ हे माया – सुपुत्रा ! सोड निद्रा आपुली

हिंडणाऱ्या मारुताचे नाद आम्ही गौतमा
हिंड तूंही राजपुत्रा, शांतिच्या संशोधना
प्रीतिचे कोणी चहाते प्रीति त्यांना लाभुं दे
मोक्ष–साक्षात्कार व्हाया ये झणीं दुःखाकडे

सोडतों निश्वास आम्ही रम्य या तारांवरी
कीं नसे वस्तुस्थितीचें ज्ञान तूझ्या अंतरीं !
दूर जातांना विचारूं इच्छितों सिद्धार्थ, हे
व्यर्थ कां तूं क्रीडतोसी या अशा छायांसवें ! ”

( जाति–ज. ध. मा. )

एके दिवशीं सुंदर संध्याकाळीं
यशोधरेसह प्रभुची स्वारी बसली
या युग्माच्या जीवा रिझवायासी
अद्‌भुत गोष्टी सांगे चित्रादासी
चमत्कारमय जग, जादूचा घोडा,
पडला जेथें प्रेमिजनांचा वेढा

रात्रीं जेथें अथांग सागरसलिलीं
बुडी घेउनी लोपे मरीचिमालीं
— परि या कल्पित कंटाळुन विश्वास
बुद्ध बोलला सोडुनिया निश्वास —

( गीत )

" प्रियतमे ! जाऊं त्या जगतांत !
लाख करोडों अपणाऐशीं हृदयें जेथ रहात ॥ ध्रु०
राजपथीं ये रवि सोनेरी
वाटे धरुनी त्याची दोरी
जगतावर मारावी फेरी
पीडित जनतेवरी करावी प्रेमाची बरसात
तुझ्या मृदुल अधरेंहि न जाई
अशी वेदना भरली हृदयीं
पंखें असतीं तर मी देवी
अफाट दुनिया हिमाद्रिवरुनी बसतों दूर पहात
लोहमय द्वारांबाहेरीं
सांगा सृष्टी काय असे तरि
अजून मजला कां न तिजवरी
दृष्टिक्षेपहि मिळे कराया साऱ्या आयुष्यांत ?

( जाति–ज. ध. मा. )

उत्तर कुमरा दिधलें मग एकानें
" शहर पलिकडे, बागा देवायतनें
पुढें कुवरजी, वनें शेकडों कोस
बिंबिसार नृपतीचा नंतर देश
अशा सुविस्तृत सृष्टीच्या मैदानीं
जीवन जगती कोटी मनुजप्राणी "
बुद्ध वदे " आणि सिद्ध करा रथ माझा

छन्नाला ही मम आज्ञा सांगा जा ”
भृत्यमंडळी राजमंदिरीं गेली
शुद्धोदन राजाला वार्ता दिधली
“ कुमार म्हणती रथ जोडुनि आणया
इच्छा त्याची जनसंमर्द पहावा
यावर आपली काय अनुज्ञा होती ? ”
विचार करुनी बोले सावध नृपती--

( झंपा )

“ पाहण्या जाउं द्या जग कुमारा
मात्र नगरीं करा हा पुकारा ॥ ध्रु० ॥
राजरस्त्यांतुनी रोषनाई करा
हीन दृश्यें कुठें ना दिसावी जरा
अंध, पंगू, जराग्रस्त ऐशा नर
येउं द्यावें मुळीं ना पुढारा
आज येई अतां योग्य ही पर्वणी
न्याहळूं द्या तया सर्व ही मेदिनी
मात्र मार्गीं न त्या दाखवावा कुणी
दुःखदैन्यादिकांचा पसारा ”

( जाति–ज. ध. मा. )

राजपथावर मग संमार्जन करुनी
घरें सजविलीं अपुलीं नागरिकांनीं
भिंतींवरच्या अंधुक चित्रांवरती
सुबक कुंचले नवी रोशनी करती
मंगल पर्णें, त्यांत देवतामूर्ति
दिसूं लागल्या चौकाचौकावरती
तुळशीवृंदावनें येउनी दारीं
दिसूं लागली ती जादूची नगरी

आणि वाजवुनि झांजा, ढोल तुताऱ्या
दिल्या नृपगणीं चहूकडे ललकाऱ्या --

( जाति–बालानंद )

" ऐका हो ! ऐका सारे
बाल, तरुण अन् म्हातारे
रात्र पडेपर्यंत पथीं
दृश्यें हीन दिसोत न तीं
अंध पंगु वा वृद्ध कुणी
जावें ना रस्त्यामधुनी
आजारी, कुष्टी, दुबळे
मागें आज रहा सगळे
मृतासही दिवसा कोणी
न्यावें ना द्याया अग्नि
ही राजाची आज्ञा रे
ऐका ! हो ! ऐका सारे "

( जाति–ज. ध. मा. )

आणि पुरामधिं येई राजकुमार
होइ दुतर्फा गर्दी तर अनिवार
शृंगारित रथ जूं तें नक्षीदार
भव्य हयांची कांचे पुष्ट मदार
थयथय करती ते हिमशुभ्र तुरंग
किती मनोहर भासे ग्रीवाभंग
सिद्धार्थाला बघुनि हरखले लोक
त्यासहि सुखवी नवीन हा आलोक
जीवन सुखमय वाटे सर्वा आतां
अशी सुवसना रंगुनि गेली जनता
घेत सुखाच्या लहरीवर हिंदोळे
उत्साहानें गौतम ऐसें बोले —

( गीत )

“ अहा ! किति आकर्षक दुनिया ही
प्रेमाचा वर्षाव करिति हे मजवर भाऊ ताई ॥ ध्रु०
श्रमजीवी हे, राजदंड ना सत्ता हातीं कांहीं
यांच्यासाठीं आजवरी मी अल्पहि झटलों नाहीं
कळे न कैशी मत्प्रेमाची खूण जाणली यांहीं
शाक्य पुत्र हा फुलें उधळतो – हा तर माझा भाई
आणा ! आणा ! त्यास रथावर मजजवळीं लवलाही
साधें जीवन कसें फुलवितें आनंदाची राई
कशास मग तें माझें वैभव उगाच राजेशाही !
असाच ते रथ छत्ना ! यांची प्रीती मजसि मिळावी ”

( वृत्त–उपजाति )

ा। टाकिति पुष्पमाला
कुर्वाळिसी शुभ्र तुरंगमाला
मिष्टान्न त्यांना कुणि अर्पितात
‘ सिद्धार्थ की जय् ’ म्हणती समस्त

आनंद वातावरणांत सारा
होता नृपाचाच तसा इषारा
त्या राजमार्गावर एक वारीं
ये झोंपडींतून कुणी भिकारी

तो वृद्ध, विद्रूप दिसावयाला
दिसे उन्हानें करपून गेला
तनूवरी अल्पहि नाहिं मास
चर्मांत हाडें दिसती भकास

ओझें शिरीं वाहुनिया वयाचें
शरीर खालीं लवलें तयाचें

गाळून अश्रू नित दीर्घकाल
झाले किती लोचन शुष्क लाल

आनंदलेल्या बघुनी समूहा
ये कंप त्या वार्धकजीर्ण देहा
भयाण तें दंतविहीन तोंड
थरारतें गाळत स्वादुपिंड

एका करें क्षीण धरून काठी
दुज्या करें सावरि अंगयष्टी
कष्टेंच हो स्पंदन अंतरांत
छातीवरी ठेवित वामहस्त

" हें सज्जनांनों ! मज भीक घाला
नसेन भूमीवर मी उद्यांला "
होई कफानें जरि रुद्ध कंठ
भिक्षा तरि मागत तो रहात

धावूनि संरक्षक जाति सारे
" फेकूं भिकाऱ्यास दुरी चला रे !
गलिच्छ कांहीं न पथीं दिसावें
ऐशी नृपाज्ञा, तिजला जपावें. "

ते बोलती, " देख कुमार आले
भिकारड्या ! जा कर तोंड काळें "
त्यांना परी आवरुनी दयार्द्र
छन्ना पुसे गौतम दोन शब्द

( वृत्त-स्रग्विणी )

" कोण छन्ना ! पुढें प्राणि हा सांग ना
वाकलेला दिसे, सोसतो वेदना

माणसें कांहिं का जन्मतः हीं अशीं ?
हा म्हणे कां ' उद्यां ' मृत्यु येई मशीं ?
अन्नही याजला कां मिळूं ना शके ?
काय याची दशा ! काय हीं हाडकें
काय याला तरीं दुःख झालें बरें
जाहलें काय छन्ना ! मला सांग रे ! "

( जाति–जलधरमाला )

वदे सारथी, " प्रियतम राजकुमारा
सामान्य असे हा कोणी म्हातारा
होता सुंदर ऐशीं वर्षांपूर्वी
ताठ तनुलता, नेत्र गोल तेजस्वी
तनुबुद्धीचें याचें बळ परि सारें
पूर्ण शोषिलें, दुष्ट चोरट्या काळें
तेल संपलें; उरली काळी वात
क्षीण ज्योती बघे मृत्युची वाट
काय पाहतां त्याला ? कुमर कशाला ? "
सिद्धार्थ पुसे कुतुकानें छन्नाला
" अशीच होते काय दशा सर्वांची ?
खास कथा कीं केवळ या जरठाची ? "
" कुणाहि इतकें लाभे आयुर्मान
पर्यायचि तो कुंवरजी, दुसरा न "
" छन्ना ! " बोले गौतम चिंतनशीळ
" मी जगलों तर स्थिति अशीच होईल
यशोधरा ये ऐशीच्याच घराला
पडेल तिजवर काय जरेचा घाला ?
मालन, हरिणी, गंगा, गौतमि साऱ्या
अंतीं होतिल अशाच का म्हाताऱ्या ? "
वदे सारथी सहजीं " होय कुमारा "

कुमार गर्जे वेगें " चल माघारा "
गौतम येई अपुल्या प्रासादास
होइ अंतरीं कष्टी आणि उदास
बाजुस सारी पक्वानांचें ताट
बघे न करि जें राजनर्तकी नृत्य
यशोधरेनें बसुनी गौतमचरणीं
अश्रू ढाळित आळविलें मधुवचनीं
" शांति न नाथा ! माझ्याही अनुरागें ! "
गौतम अपुली हृदयव्याधी सांगे

( जाति–उद्धव )

" प्रिय यशोधरे ! सुख सारें
जाणारचि हें विलयास
असेल आपणा अंतीं
वृद्धत्व विकलता खास
ओठांत जीवनप्रीति
गुंफून ठेवितों नित्य
श्वासांत आपुले श्वास
वाहति मिळुनि दिनरात
परि कधींतरी यामध्यें
तो घुसेल काल कराल
लावण्य तुझें अन् माझें
बल हिरावुनी नेईल
त्या पर्वतशिखरांवरतीं
जो दिसे गुलाबी रंग
तो रात्र टाकिते पुसुनी
हो सर्वस्वाचा भंग
हें कठोर सत्य कळूनी
मन जाय काळवंडूनी

सोडिलें विचारें एका
मज भारी भंडावूनी
त्या संहारक काळाच्या
तोडुनी प्रबल पाशासीं
राहील सुरक्षित अपुल्या
प्रीतिची मधुरता कैसी ? ''

( जाति– न. ध. मा. )

रात्र अलोचन जागरणांमधिं सरली
सिद्धार्थाच्या हृदयीं शांति न उरली
आणिक इकडे शुद्धोदन राजानें
सात पाहिलीं रात्रीं भयद स्वप्नें
एक पताका इंद्रांकित सोनेरी
प्रबळ वायुनें छिन्न होउनी पडली
आणि आकृती जमुनीं काळ्या काळ्या
नेति उचलुनी तिजला पूर्व दिशेला
दहा मतंगज दक्षिण पथिं मोठाले
नमवित भूमी डुलत ऐटीनें आले
भव्य विनीच्या गजावरी दरबारीं
युवराजाची शोभत होती स्वारी
दिसला रथ त्या तिसऱ्या स्वप्नामाजीं
चार जोडले डौलदार ज्या वाजी
अग्निशिखा त्या अश्वाच्या श्वासांत
रथांत बसला राजपुत्र सिद्धार्थ
आणिक चौथ्या स्वप्नीं दिसलें एक
गरगर गरगर फिरणारें तें चक्र
आसावरती हिरे, माणकें मोतीं
धावेवरतीं गूढ अक्षरें होतीं
त्या धावेच्या गोलाकार गर्तीत

प्रकट होतसे अग्नि आणि संगीत
शहर आणखी गिरि यांच्या मध्याला
दिसे नगारा प्रचंड एक नृपाला
त्यावर टिपरी मारितांच बुद्धानें
नाद वादळी निघून घुमलीं भुवनें
भव्य मनोरा एक दिसे भूपासीं
उंच उंच तो चढत जाइ आकाशीं
मेघांनाही भेदुनी जाई वरती
वरी विराजे सिद्धार्थाची मूर्ति
तेथुन दोन्हीं हातांनीं सिद्धार्थ
अगणित रत्नें भूवरती वितरीत
तीं वेचाया चहूकडुन बेबंद
अफाट लोटत होता जनसंमर्द
आणि सातवें होतें स्वप्न विचित्र
सहा माणसें दिसलीं शोकग्रस्त
तोंडावरती मारित अपुले हात
आक्रंदत तीं जाती चावित दांत
उदास होई, नृपाळ या स्वप्नांनीं
गूढ अर्थ तो सांगु शकेना कोणी
तोंच अचानक येई एक तपस्वी
मृगाजीनधर विरक्त अन् तेजस्वी
थेट येऊनी सांगे दरबारांत
शाक्य नृपाला त्या स्वप्नांचा अर्थ

( वृत्त-शा. वि. )

" चिन्हें ही शुभ सर्व शाक्य नृपते ! सोडून दे संभ्रम
प्रासादांतुन याच तेज उदया ये कोटिसूर्यासम
सारीं धर्ममतें पुरातन लया जाणार याच्यापुढें
सांगे हेंच भविष्य जी तव नृपा ! स्वप्नीं पताका पडे

बेती गर्जत कापवीत धरणी ते थोर ऐरावत
ज्ञानाचीं अवनींत लावतिल तीं मुक्ताफळें शोभत
सत्यें चार अपूर्व तीं सुचविती घोडे नवे फाकडे
ज्या योगें जगतास गौतम नव्या नेणार धर्माकडे.
तें उर्जस्वल धर्मचक्र फिरवी सिद्धार्थ आतां भुवि
धर्मज्ञान घुमेल तें त्रिभुवनीं हें दुंदुभी सूचवी
त्याचा धर्म चढेल नित्य वरती सांगे मनोरा पहा !
होतीं निष्प्रभ दर्शनं कथिति हें त्यांचीं प्रतीकें सहा "

( जाति—ज. ध. मा. )

सांगुन इतकें अभिनंदुन भूपाला
तडक तपस्वी दूर निघोनी गेला
भृत्य जाति त्या शोधाया धावूनी
परत येउनी कथिती अजब कहाणी
" मंदिरांत तो शिरतांना गोसावी
धनी ! पाहिला या डोळ्यांनीं आम्ही
परी शोधितां आंत न दिसलें कोणी
एक उडाला विहग पंख फडफडुनी "
आश्चर्याला नुरला पारावार
वाढविला परि भूपे सुखसंभार
सिद्धार्थाच्या विशाल त्या प्रासादीं
सुखमोहांची अधिकचि हो आबादी
पुनः जनांच्या जावें अंतर्यामी
अशी गौतमा येइ भयंकर उर्मि
आणि मनोगत पित्यास कथिलें तनयें
बोले शुद्धोदनास गौतम विनयें—

( जाति–मुद्रिका )

" एकदा जाउं द्या मला राजपट्टणीं

त्या साध्या नागरिकांची पाहु दे मला राहणी
त्या कथिलें होतें महाराज ! आपण
' हा येतां सारें ठेवा दुःख अन् दैन्य झाकुन '
परि कळून चुकलें मज त्या सहलीमधीं
नच वाहे संसाराची सुरळीत संथ वा नदी
येणार मजकडे राज्याचा वारसा
अनभिज्ञ प्रजेविषयीं मी हे पितया, राहूं कसा ?
म्हणुनीच जाऊं द्या मला सडा एकला
लोकांना नच समजावें कीं राजपुत्र पातला "

( जाति–ज. ध. मा. )

नृपास वाटे कीं दुसऱ्या फेरींत
पहिलीमधली होइल चूक दुरुस्त
म्हणून त्यानें दिली सुतास अनुज्ञा
सज्ज जाहले गौतम आणिक छन्ना
गौतम चढवी वाण्याचा पोशाख
छन्ना साधा दिसे कारकुन एक !
पहात फिरती दुःख आणि आनंद
नव्हता त्यांच्यावरि कसला निर्बंध

( वृत्त–भुजंगप्रयात )

कुठें गर्जती पाठशाला दुपारीं
दुकानामधें धान्य जोखी भुसारी
पहाती कुणी धोतरें आणि साड्या
कुठें संथशा चालल्या बैलगाड्या

शिरीं आपुल्या घेउनी खूप माल
कुठें घाम गाळीत जाती हमाल
कुठें संघसंगीत तें ऐकु येई
त्वरें पालख्या घेउनी जाति भोई.

कुठें मस्तकीं कुंभ घेऊनी नाना
किती सुस्तनी शोभती शाक्यकन्या
कुठें पिंजणीचें घुमे जोड गान
मदारीवरी डोलतो कारवान.

करीं खड्ग वा घेउनी लांब भाले
कुठें चिल्खती वीर होते निघाले.
निघाल्या कुठें मंदिरा पुत्रकामा
फुलें, वायनें घेउनी त्या सुरामा

कुठें छान शृंगारलेला तुरंग
पुढें वाजताती तुताऱ्या मृदंग
नटूनी सजूनी वरा आणण्याला
वधू-सोयऱ्यांचा निघे एक मेळा

( जाति-ज. ध. मा. )

गजबजलेल्या ऐशा देखाव्यांत
गौतम छन्ना जाती बघत मजेंत
तो बाजूला रोगग्रस्त प्राणी
कण्हत आपुली सांगे करुण कहाणी—
" भल्या जनांनो ! या काया उचला ही
मरेन ना तर घरीं पोचण्यापूर्वीं ! "
धुळींत होतें शरीर कांपत त्याचें
भाळावरती ढग जमले घामाचे
किती त्वचेवर डाग जांभळे, काळे
दुःख आंतलें नेत्रीं क्षीण खळाळे
गवत धरूनी उठावया तो पाही
अर्ध्यावरती तोल तयाचा जाई
—आणि कोसळुन तसाच ये धरणीला

किंचाळुन तो दीनपणानें वदला—
" मेलों ! मेलों ! द्या मज अपुला हात "
तोंच धावुनी जाय पुढें सिद्धार्थ
अभाग्यास त्या उचली मृदुल करांनीं
सावरि त्याचें शिर अपुल्या गुडघ्यांनीं
सिद्धार्थाच्या प्रेमळ हस्ताधारें
मंद जाहले व्याधीचे फणकारे
बुद्ध बोलला त्या मनुजास अपंग
" बंधो, तुजला दुःख कशाचें सांग
असह्य कसली अशी वेदना होई ?
कां न उठाया नीट तुला बा ! येई ?
छन्ना; बघ ते केविलवाणे श्वास !
किंचाळे कां ? काय जाहलें यास ? "
वदे सारथी, " ऐकावें युवराज
दुर्धर यातें व्याधि पोळते आज
प्राण पोचले येउनिया कंठांत
उसळे, तापे देहीं रक्तस्रोत
अकुशल वादक जसा वाजवी ढोल
हो हृदयाचें स्पंदन तें बेताल
भग्न जाहल्या जणुं धनूची दोरी
नाड्या याच्या होती शिथिल शरीरीं
कणा मोडला, कंठ होइ बेबंद
मानव्याचा डौल न वा आनंद
पहा, कसा तो चावित आहे दांत
दुःखावरती झटे कराया मात
कोंडे धूमासमचि श्वास तयाचा
येइल आतां क्षण सत्वर अंतींचा
जाइल संवेदनाच अस्थीमधुनी
तुटतिल नाड्या कुचक्या दोरीवाणी

प्रथम निकामी होतिल मज्जातंतू
मागुन येइल कवळायाला मृत्यू
कुंवरजी, व्हा दूर सोडुनी त्यास
जडेल नातर ही व्याधी अपणास ''
समजावित तरि मरणोन्मुख मनुजाला
सचिंत गौतम पुसे सूतपुत्राला

( जाति–केशवकरणी )

" अशींच का रे इतर माणसें रोगानें खंगतीं ?
कीं असे मलाच याची मिती ? "
" महाराज, ये व्याधि घेउनी रूपें नानापरी
जिवांना सर्वंच ती पोखरीं
शूळ, कुष्ट ते ज्वर अन् जखमा पक्षघात आणखी
ग्रासती नरदेहा घातकी "
" नकळत शिरती का हे ? " " हो तर भुजंगमासारखे
करिति हे चैतन्या पारखे "
" तर मग जगतीं काय भ्रमाच्या छायेमधिं माणसें ? "
" हो धनी, जग हें आहे असें ! "
" रात्रीं निजलों उद्यां उठेनच नच का खातरजमा ? "
" हेरिलें सत्य तुम्हीं गौतमा. "
" भग्न देह मन खिन्न हीच का रोगाची परिणति ? "
" होय जर आयु लाभलें अति "
" असह्य झाल्या जरी वेदना वय गेलें वाढत
मृत्यु हा सर्वांचा शेवट "
' मृत्यु ? " " होय कुणि अल्पायुषि, कुणि रोगानें गांजती
थोडके वृद्धत्वा पोचती
परि न कोणा चुकवाया ये मृत्यूचे सांकडें
कुमारा मृत्युच हा ये पुढें "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ............ दि: ..................
क्रमांक नोंद दि ..........



( जाति–ज. ध. मा. ).

सिद्धार्थाच्या दिसली विस्मित नेत्रा
एक समोरीं येतां स्मशानयात्रा
ताटीवरतीं घालुनिया प्रेतास
करिती बांधव ' राम् बोलो ' चा घोष
मिरवणूक ती गेली नदिच्या कांठीं
सरणावर तें चढे कलेवर अंतीं
ज्वालामध्यें होय जळूनी खाक
उरे मूठभर त्या देहाची राख
" असाच कां रे प्रत्येकाचा अंत ! "
मधेंच बोले गौतम करुणावंत
छन्ना सांगे " हाच धनी हो हाचि
शेवट साऱ्या जिवंत प्राण्यांचाचि
आजवरी हा मृत नर आयुष्यांत
जगला, रमला, नाना व्यवसायांत
असेल केलें त्यानें प्रबळ प्रेम
असेल केला पुष्कळ ऐषाराम
परी होऊनी शैल्य, लागुनी ठेच
सर्पदंश वा कारण कांहिं असेंच
अथवा पडुनी डोक्यावर पाषाण
अखेर हो हा प्राणी विगतप्राण
या ओठांचें चुंबन आतां घेतां
गोड शिरशिरी येइल कैशी प्रेता !
क्षुधा, तृषा, सुखदुःख उरेना कांहीं
भाजे याचें अंग न या ज्वालांही
ऋणानुबंधी याचा करिती शोक
कधींतरी पण जातिल हेही लोक
उच्च, नीच वा भल्याबुऱ्यास कुणाही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४५८९

मृत्यूचा नच घाव चुकवितां येई
पुनः कुठेंतरि वाढे जीवनतंतू
पुनः वेदना, वियोग आणिक मृत्यू
नरजन्माची हीच उदास कहाणी ''
छन्ना सांगे गहिवरल्या शब्दांनीं

( वृत्त–मंदाक्रान्ता )

ऐकूनी हें सकल हृदयीं आर्त सिद्धार्थ झाला
दैवी अश्रू अहह ! करिती आर्द्र तल्लोचनांला
कारुण्याची द्युति चमकली अंबरीं दृष्टि लावी
न्याहाळूनी मग पुनरपी भोंवतीं सृष्टि पाही

एकान्तीं घे व्यथित मन तें दूर कोठें भरारी
शोधायाला जणुं हरपलें श्रेय कल्याणकारी
कांहीं आशा अभिनव फुटे, भावकांती झळाळे
आवेगानें त्वरित करुणामूर्ति तो बुद्ध बोले

( जाति–प्रणयप्रभा )

" पाहिलें सर्व मी–पुरें पुरें ।
ने छन्ना ! रथ निज सदना रे ॥ ध्रु ॥

मृत्यु-वेदना यांच्या जाळीं
दुनिया सारी बद्ध जहाली
माझ्या रक्ताचीं हीं सगळीं
तडफडति जीवनीं क्लेशभरें १

अथांग तर यातनाच केवळ
सुख वाटे तें सारें मृगजळ
उच्च दिसे ती थट्टा सोज्ज्वळ
खालतीं चहुकडे दुःखभरें २

होइ सुखाचा शेवट दुःखीं
यौवन सरते जरेंत शेखीं
प्रेम संपतें नाशांतचि कीं ।
अन् जीवन मृत्युदरींत शिरे ३
निधनानंतर ये जन्मान्तर
खोटया सौख्याच्या चक्रांवर
फिरत राहतो पुनः पुनः नर
वेदना फक्त ती सत्य ठरे ४
मलाहि होतें हें संमोहन
निर्झरापरीं गमलें जीवन
हिरवळींतुनी करीत नर्तन
जो क्षारसागरी रिघे त्वरें ५
जग निर्मुनि त्या दुःखी ठेवी
ब्रह्म असें हें सहृदय काई ?
दुःखविनाशा नसेल बलही
मग भव्य दिव्य तें कसें ठरें ? ६
आज लोचनीं पडलें अंजन
अवलंबून जे माझ्यावरि जन
करीन त्यांचें मी अघभंजन
कर्तव्य याविना दुजें नुरें" ७

प्रकार शुद्धोदनास कळला सारा
दारावरचा झाला कडक पहारा
बाहेर कुणा तेथुन जाणें बंद
बुद्धहि नच या नियमनास अपवाद ८



# सर्ग ४ था

( जाति–चंद्रकान्त )




अखेर मंगलदिन मुक्तीचा वर उगवे डोई
प्रजा नि राजा जरी बुडाले दुःखाच्या डोहीं
जरी देशभर पडली दारुण दुःखाची छाया
सद्धर्माचा प्रकाश यांतुन लागे झळकाया
प्रभू आपुला निघे सोडुनी गृह-सुत-धन-दारा
आधिव्याधींमधुनि कराया मुक्त लोक सारा
वसंत आला खुले चांदणी रात्र विभवशाली
अशोक बहरे, आम्रफळांवर चढे नवी लाली

समीप आला श्रीरामाचा मंगल जन्मदिन
आनंदाच्या रसांत न्हालें शहर आणि रान
प्रासादांवर गिरिशिखरांवर चढुनी डौलानें
सरितेच्या लहरीवर खेळति चंद्राचीं किरणें
गाढ झोपल्या त्या दुनियेला स्पर्शुन हळुवार
वहात होता पर्वतवारा मंदमधुर गार.
रानीं कोल्हेकुई चालली पडे क्वचित् कानीं
रानकिड्यांची अखंड किरकिर चाले उद्यानीं
मधेंच सावध दरवानाची घुमते ललकारी
बाकी नीरव निद्रित होती ती दुनिया सारी.
बघे गवाक्षांतुनी महालीं शशि डोकावून
खुलति हिरण्मय भिंती, संगमरवरी पाषाण
त्याच चांदण्यामधें अलौकिक शोभतात बाला
नंदनवनिंच्या जणू अप्सरा दिसति झोंपलेल्या
सुखनिद्रारत त्या युवतींचें अपूर्व लावण्य
म्हणाल बघुनी प्रत्येकीला, "हीच अग्रगण्य !"
सिद्धार्थाच्या क्रीडागृहिंच्या त्या अनुपम रमणी
एकाहुन तीं एक मनोहर सृष्टीची करणी
एकीच्या मुखकांतीनें जो हरपावें भान
तोंच रम्यतर सौंदर्याची दिसे दुजी खाण
संकोचाची बाधा नव्हती, डौल शानदार
अर्धावृत तीं श्यामल अंगें दिसती सुकुमार
सुममालांचा वा सोन्याचा घेउनि आधार
सुढाळ मानेवरी लोळती ते कुंतलभार
सुखश्रमानें दिवसभरी त्या होत्या शिणलेल्या
—आणि झोपतां मधुर स्वप्नीं सर्व दंग झाल्या
चहुबाजूंला कर चंद्राचे स्निग्ध पसरलेले
तेवत होते दीप रुपेरी वरी टांगलेले
मिश्र मधुरशा प्रकाशांत त्या होति अभिव्यक्त

सौंदर्याच्या सीमारेषा सुंदर अन् स्पष्ट.
मंद श्वासें खालींवर मृदु वक्षस्थल होई
करकमलावर मेंदीची ती रम्य रोषणाई
धनुष्याकृती भुवया देती शोभा गालांला
किलग जाहल्या अधरीं झळके दंतरत्नमाला.
करीं कंकणें पायीं पैंजण स्त्रति डौलदार
कुणी बदलतां कुशी होतसे मंद झणत्कार
युवराजांनीं अपुल्या नृत्या दिधला उपहार
अशा गोडशा स्वप्नाची मग झणीं तुटे तार !

[ वृत्त : देवप्रिया ]

एक होती झोंपलेली घेउनी वीणा उशाला
एक घेई बाहुपाशीं गोजिऱ्या छोट्या मृगाला
मोगऱ्याची माळ हातीं गुंफनां ठेवून तैशी
मैत्रिणी आलिंगनी त्या दोन गेल्या स्वप्नदेशीं

रत्नमालेची अपूरी गुंफणी ठेवून कोणी
पुष्पशय्या अंथरोनी झोपली सौंदर्यखाणी
सर्व निद्रामग्न कलिका वाट पाहाती उषेची
सूर्यतेजा रोषनाई आगळी द्याया स्वतःची

अन् गुलाबी नील पडदा मखमलीचा टांगलेला
सोनियाच्या सूक्ष्म तारा लाविलेल्या झालरीला
चौकटीच्या चंदनाचा गंज जाई दर्वळूनी
प्रेमगेहा रक्षिती त्या दक्ष दासी मुख्य दोन्ही.

मुख्य त्या अंतःपुरींच्या दालनीं ऐश्वर्य भारी
मौक्तिकाचीं गूढ चित्रें शोभती बाजूस चारी
गोल नक्षीच्या छताला झुंबरें अन् दीपमाला
चांदणें अन् वायुवीची आंत पाही यावयाला

त्याहुनी सौंदर्य तेथें फांकलेलें त्या ठिकाणीं
बुद्ध अन् त्याची प्रिया ती झोंपली लावण्यराणी
काय झालें ना कळे !—ती घाबरोनी होय जागी
चुंबुनी त्याच्या करातें बोलुं लागे कोमलांगी

( गीत )

" उठा, व्हा जागे जीवितनाथ.
दुःस्वप्नांनीं मम हृदयावर केला वज्राघात ॥ ध्रु० ॥

गर्भवती मी, मोहरलें मन
चाले दो हृदयांचें स्पंदन
प्रेमानंदें मिटले लोचन
तोंच पाहिला वृषभराज ये पुढें महाद्वारांत... १

रंग पांढरा, एक शिरावरि—
तारा चमके नागमण्यापरि
उठे राउळांतुनी वैखरी
'अडवा त्याला नातर जाइल नगरी काळोखांत...' २

मिठी मारुनी त्या वृषभाला
रोखायाचा प्रयत्न केला
परी तोडुनी मम करमाला
द्वाररक्षका तुडवुन झाला अदृश्य तो निमिषांत... ३

दुसऱ्या स्वप्नीं येति अचानक
मेरूहुन चौघे दिक्पालक
सरंजाम तो करतो लखलख
पडे अकस्मात् इंद्रपताका खालीं धूलिकणांत... ४

ध्वज दुसरा ये फडकत वरती
त्यांतुन किरणें शब्दहि निवतीं
पाहुन ऐकुन लोक हरखती
अपूर्व वरुनी झाली भूवर पुष्पांची बरसात... ५

मत्प्राणा ! मम जीवज्योति !
विन सुरकुतल्या शय्येवरतीं
वस्त्राभरणें तुमचीं दिसतीं—
तुमच्या वांचुन हाय ! पाहिली मी तिसऱ्या स्वप्नांत— ६
मौक्तिकमाला भुजंग झाली !
आणि कंकणें गळलीं खालीं
पुष्पें शिरिंचीं कोमुन गेलीं
वृषभाचा स्वर पडे दुरूनी येउनिया श्रवणांत.. ७
" समय नजिक तो आला आला "
घुमति शब्द हे दहादिशांला
काय स्वप्न हें ? वदा दयाळा !
मृत्यू किंवा त्याहुन कटुतर लिहिलें अदृष्टांत..." ८

( जाति—मोहिनी )

" भीति सोडुनी हो कांते ! शांत या क्षणाला
मम प्रीतिच्या विश्वासें शांतवी मनाला... ॥ध्रु०॥
तुझीं सर्व सूचक स्वप्नें बोलकीं असोत
देव आसनीं गडबडुनी आपुल्या बसोत
मोक्ष मार्ग गवसो नच वा, मेघ कोसळोत
राहणार प्रियतम माझी यशोधरा बाला... १
अनोळखी जीवास्तव मी पाखडतों जीव
दुःख पाहुनी इतरांचें कष्टतों सदैव
परी स्वैर भिरभिरणारे सर्व मनोभाव
इथें जिवलगांच्या—तूझ्या येति आश्रयाला... २
फुलविणार तूं ना माझी त्वरित वंशवेली ?
तूंच रूपसौजन्याची मूस ओतलेली
पक्षिणी परी मम दृष्टी वरुनि अंतराळीं
कोटरांतल्या ती अपुल्या पाहते पिलाला.. ३

दुःखमुक्त होइल कैसी पूर्णही धरित्री ?
याच चिंतनी घालविल्या किती अहोरात्री
वेदना मधूनिच अपुल्या काय सखे अंतीं—
गवसणार उद्धाराचा मार्ग या जगाला... ४

करी जीव मात्रावर मी प्रेम सारखेंच
म्हणुनि तुझ्यावरची प्रीती अमर्याद साच
ओंठ टेकवुनी मम वदनीं दूर करीं पेंच
झोंप शांत, राहुनि जागा करिन चिंतनाला "... ५

( जाति–चंद्रकांत )

साश्रुलोचना झोंपी गेली यशोधरा बाला
स्वप्नामधल्या आदेशाचा भास पुनः झाला
" आली ती बघ घटिका " ऐसे शब्द पुनः घुमले
बुद्ध बघे तो कर्क राशिंतुन चंद्र नभीं चाले
तारामंडळ तोंच इषारा पूर्वीचा देई
" पहा पहा ही आज गौतमा ! तीच रात्र येई
राजांचा हो राजा अथवा होउन अनिकेत
त्रस्त जगाला कल्याणाचा दाव नवा पंथ
यांतुन निर्णय एक कांहिं घे आतां सिद्धार्थ "
पुनः नादले तेच अनाहत वीणेवर गीत
तारांवरती बसे लावुनी बुद्धदेव हा दृष्टि
बुद्धा न्याहाळिते वरूनी स्वर्गाची सृष्टी

( जाति–पादाकुलक )

" आला तो क्षण ! आला तो क्षण
सोडुनि जातों गृहदाराधन... ॥ध्रु०॥
कोमल अधरें तव ये स्फूर्ति
जाण्या सखये ! कल्याणपथीं

मूक नभाच्या फलकावरती
दिव्य वाचतों मी आवाहन... १

तलवारीच्या धारेसाठीं
हपापलेलें जे दिनरातीं
पाठ फिरवितों मी त्यावरती
नको मला तें नृपसिंहासन... २

विजया मागुन विजया मिळवित
धांवति रथचक्रें रक्तांकित
यश मम राहिल रक्तें लांछित
मला न वाटे त्यांचें भूषण... ३

मद् आणि निष्कलंक चरणीं
हिंडावी ही सारी धरणी
धुळींत तीच्या रात्र काढुनी
जोडावे ते दीन दलित जन... ४

गुहेंत वा विजनांत रहावें
अस्पृष्टांचे कपडे ल्यावें
भिक्षा मागुन जें मिळवावें
तेंच रोजचें माझें भोजन... ५

रुग्ण जगाची ये आरोळी
करुणेनें मम वृत्ति भारली
ये कानीं चाले भवतालीं
संसाराचें क्रंदन भीषण... ६

सर्वस्वाचा होम करूनी
निघेल कांहीं तोड यांतुनी
पीडित जगता आश्वासूनी
करीन त्यांचें दुःखविमोचन "... ७

( जाति–चंद्रकांत )

असें बोलुनी गढे चिंतनीं बुद्ध पुसे हृदयीं
कुणी देखिले ल्हान मोटे देव आणि देवी
निज भक्तांना सावरण्यास्तव काय तयीं केलें ?
उपायनांनीं अन् यज्ञांनीं साध्य काय झालें ?
समाराधना मंत्रोच्चारण, पशुचें बलिदान
स्तुति, लाचारी भीती यांची करी मात्र वीण
ताप, वृद्धता, अन् फणकारे प्रेमवियोगाचे
यापासुन का झालें रक्षण माझ्या सुहृदाचें ?
नवा लाभतां जन्म पुनरपी नव्या नव्या तृष्णा
जुनीच फसगत अखेर त्यांच्या नशिबीं येते ना !
तुळशीवृंदावनाभोंवतीं प्रदक्षिणा करिती
करुनी नाना व्रतें आपुल्या देहा कष्टविती—
त्या भगिनींना माझ्या कसला महालाभ होई ?
प्रसववेदना झाल्या त्यांच्या काय कमी कांहीं ?
असतिल थोडे देव चांगले, परंतु ते दुबळे
जन्ममृत्युच्या चक्रावरती भिरभिरती सगळे
कीटक, मुंगी, पशू, विहंगम, नर, राक्षस, देव
शास्त्रें वदती या सर्वांची रीत एकमेव
म्हणुनी आपण सारे प्राणी आहों समदुःखी
उद्धाराचा पथ सर्वांचा निघेल एकच कीं,
जगा करीं जें सर्द भीतिनें भीषण अज्ञान
क्रौर्याच्या क्रीडेंत भयंकर हो जें रममाण—
मिळावया त्या अज्ञानांतुन अखेरची मुक्ति
झटता कोणी जातिल मानव खासच त्यांपाठीं.
कुणी आसरा, कुणी निवारा, कुणितरि आधार—
असल्याविण या जगताचा ना होइल उद्धार
थंडीच्या खाईंत माणसें कुडकुडुनी गेलीं

दुबळीं त्यांतिल लाख करोडों पिचलीं अन् मेलीं.
अखेर एका कल्पक मनुजा मिळे गारगोटी
अग्नीची संजीवक शक्ती निघे तिच्यापोटीं—
हिंस्र लांडग्यासम आदी जन मांसांवर जगती
परी कुणाला पुढें गवसली पेरणिची युक्ति
धान्याची मग डोलुं लागलीं वाऱ्यावर शेतें
पशुकोटीहुन मानव आला उच्च भूमिकेतें
अर्धे बोबडया ध्वनिंनीं करिती मानव व्यवहार
कुशल करें कुणि करी अक्षरीं भाषा–विस्तार
संशोधन, संघर्ष आणखी प्रेममय त्याग
यामुळेंच ना महान् सुखाचा दिसे जना मार्ग ?
मग जो कोणी असेल कुल–धन–यौवन संपन्न
मनीं आणितां भूप नृपांचा बसेल होऊन
अजुनि लागली जीवनमार्गीं नच ज्याला धाप
उल्हासे जो बघुनि उषेचें प्रकाशमय रूप
राजहंस जो चाखित आला प्रीतिकमल कंद
अतृप्त राहुन अजुन चाखतो त्यांचा आनंद
अजून भेसुर उदासीनता ज्याला नच शिवली
अजून ज्याची त्वचा दिसेना लवही सुरकुतली
जगताच्या दुःखांत मिसळलें भव्य दिव्य कांहीं
तें पाहुन तात्काळ उल्हसित जो हृदयीं होई
सृष्टीमधली निवडक सुंदर चीजवस्तु खाशीं
पडली आहे ज्या सुभगाच्या येउनि पायाशीं
—असा माझिया सम जो कोणी ज्या न दुःख दैन्य
परदुःखानें परदैन्यानें मात्र होइ खिन्न.
करील जर तो जगतासाठीं सर्वस्व त्याग
धरील एकच जर सत्याचा उत्कट अनुराग
पाताळीं वा स्वर्गीं कोठें रहस्य मुक्तीचें
काढण्यास तें शोधुनि अपुलें बल वेचिल साचें

गूढपणाचा पडदा जाइल केव्हांतरि वरती
प्रज्ञाचक्षू बघतिल त्याचें मूळ वस्तु पुढती
शिणले त्याचे पाय लागतिल स्वहिताच्या वाटे
ज्याच्यास्तव जग सोडुनि दिधलें मिळेल तें त्यातें;
मृत्यूवरती खासच त्याची होइल मग मात
यापुढती मी धरणारचि हा मोक्षाचा पंथ.
किती हजारों हृदयें ज्यांवर मी करतों प्रीति
आणिक असतिल लाख करोडो अशींच भूवरतीं
ज्ञान आणि अज्ञान अशा या स्पंदन हृदयांचें
त्या तालावर अंतर माझें अहोरात्र नाचे
धडधडणाऱ्या या सर्वांना लाभाया शांति
आत्मदान मम अवश्य आहे ही पटली खात्री

( जाति–परिलीना )

हे ताऱ्यांनो ! उमजे तुमचें मला निमंत्रण
पीडित पृथिवी, करिन तुझें मी दुःखविमोचन
माझें यौवन सोन्याचे दिन नृपसिंहासन
माझें सुंदर वैभवशाली राजनिकेतन
सोडिन सारें तुझ्या लेकरांस्तव हे धरणी !
अन् तोडाया या सर्वांहुन बिकट जीवनीं
अशी माझिया प्रिय राज्ञीची ही करमाला
जगास द्याया सुखशांती मी करिन बाजुला,
परी जिवलगे ! साऱ्यासंगें सुखविन तुजला
तव गर्भांतिल मधुर आपुल्या प्रीतिफुलाला
जर तिष्ठत मी त्याला द्याया आशिर्वादा
माझ्या मंगल संकल्पाला जडेल बाधा
बाळा ! दयिते ! बाबा ! जनहो ! या माझ्यावर
या शुभकालीं घाला अपुली मायापांखर

येइल उद्या सद्धर्माचा प्रकाश नूतन
अन् जीवांना घडेल कांहीं नवीन दर्शन
ठरलें आतां तें दिसल्याविण फिरुनी कांहीं
माझें पाउल पडायचें या पुनः न गेहीं "

( वृत्त–उपजाति )

यशोधरेच्या मृदु पादपद्मा
प्रेमादरें स्पर्शुन सोनिशाणा
निरोप घे मूक मुखांबुजाचा
अद्यापि जेथें थर आसवांचा

ठेवून वक्षावर हात दोन
प्रदक्षिणा घालित बुद्ध तीन
यशोधरेची मृदु उंच गादी
बुद्धास वाटे जणु यज्ञवेदी

" या मंचकीं मी फिरुनी कधींही
आराम आतां करणार नाहीं "
बोलून ऐसें पुढतीच जाई
अन् तीन वेळां परतून येई

असें तिचें तें रमणीय रूप
त्याचें असें प्रेम असे अमूप.
अखेर तीच्यावर शाल घाली
घे मखमलीचा पडदाहि खालीं

पुष्पापरी पेलव चारुगात्री
निद्रिस्त त्या नीरव रम्य रात्रीं
दृश्यावरी त्या फिरवून डोळे
उद्देशुनी गौतम त्यांस बोले—

( जाति-मुद्रिका )

" हे प्रिय सखयांनो ! निरोप द्या या क्षणीं
मुक्तिचा मार्ग शोधाया चाललों सर्व सोडुनी॥
जे वाऱ्यावर डोलतें
तें सुमही कोमेजतें
जातसे तयाचें गंधरूप लोपुनी ॥ १ ॥
संपतां तेल आंतलें
ती ज्योत क्षणीं मावळे
तुमचीहि चारुता सुकेल अंत्य क्षणीं ॥ २ ॥
हे सदय रजनि, माउली
मोहिनी घाल आपुली
या मधुबालांच्या अधरीं अन् लोचनीं ॥ ३
म्हणजे न अश्रु एकही
वा प्रेमवचन आर्जवी
ओढील मला या संकल्पापासुनी ॥ ४ ॥
यांनींच बाग फुलविला
मम भावजीवनांतला
परि सारे आपण नश्वरतेचे धनी ॥ ५ ॥
जोमांत वाढती तरु
ऋतुचक्र लागतें फिरूं
कोसळति परी ते सुकुनि, घाव बैसुनी ॥ ६
मी होइन या वेगळा
स्वस्थता मिळेना मला
अज्ञान-तमामधिं जन पडले गुंतुनी " ॥ ७ ॥

( जाति- चंद्रकांत )

पहात होते प्रेमें भरुनी जागरूक तारे
सिद्धार्थाच्या उडत्या वसना चुंबितात वारे

मिटलेल्या रेशमी पाकळ्या उघडुन फुलवंती
गंध उधळुनी धुंद करी जग सिद्धार्थाभवती
हिमाद्रिपासुनि महासिंधुच्या मध्यापर्यंत
चमकुन गेली एक अचानक थरथरती लाट
जणुं कांहींतरि अपूर्व ऐशी आशा अज्ञात
दुःखभग्न या वसुंधरेला स्पर्शुनिया जात
चार दिशांना यक्ष–सुरांचा मेळावा जमला
संगीतानें त्याच्या सारा त्रिलोक दुमदुमला
अनर्घ्य रत्नें घेउनि हातीं चौघे दिक्पाल
अदृश्य ज्यांच्या अक्षौहिणींनीं कापति ग्रहगोल
सादर भावें राजकुमारा करती ते प्रणती
शून्य लोचनें लावुन पाही तो ताऱ्यावरती
बुद्धाच्या मौनांत साठली अमर्याद करुणा
मानवतेच्या दुःखानें ये पाणी तन्नयना
उदासीन तो गौतम जाई पुढें महाद्वारीं
"चल रे छन्ना आण कंटका" ऐसे हाकारी
"महाराज. या ऐशा वेळीं निघे कुठें स्वारी
बुजून गेल्या तमाम वाटा भीषण अंधारीं"

( गीत )

"बोल हळू रे छन्ना ।
अश्व घेउनी ये ना ॥
निघण्याचा हाच समय
शोधाया परम सत्य
आतुरलें निघत हृदय
त्यजुनि बंदिखाना"
"हाय ! काय हा निर्णय कुमरा" छन्ना मग बोले
हेंच काय हो सुज्ञ जनांनीं नृपास सांगितलें ?
सम्राटाचा होइल नेता हा सुयोग्य कालें

हेंच नसे का अपुल्याविषयीं भविष्य वर्तविलें ।
ऐश्वर्याला डावलुनी का आपण जाणार ?
घेउन भिक्षापात्र चहुकडे करीत संचार ?
तुमच्या योगें वैभव इथलें नंदनवनतुल्य
सुकून जाइल होइल त्याचें अखेर निर्माल्य "

" छन्ना ! सिंहासनास्तव न मी आलों या लोकीं
झुरतों मी ज्या राज्यासाठीं तें तर निरतुल कीं
मर्त्य जगाहुन साम्राज्याहुन शतपट तें थोर
आण कंटका छन्ना ! मजला होऊं दे स्वार "
वदे सारथी, " ज्यांचे आपण मान्यवरा ! प्राण
त्यांना कसलें साह्य अशानें होइल, उमजे न ! "
" मित्रा, स्वार्थी हेतूनें जी लोंबकळे प्रीति
जना कधीं ना उद्धारी ती साफ असे खोटी
अगाध माझें प्रेम वेगळें, ज्यांना मी मानी
उद्धाराया त्यांना सोडिन स्वमुखावर पाणी
तदर्थ मज ना अडवायाला कसलेही पाश
जा जा छन्ना ! त्वरित घेउनी येइ कंटकास

( जाति–दिंडी )

" महाराजा ! आपुली जशी आज्ञा "
व्यथित हृदयानें वदे दास छन्ना
तडक गाठी जाऊन अश्वशाळा
हिरे मोत्यांनीं सजवि कंटकाला

येइ घेऊनी त्यास महाद्वारीं
तोंच प्रभुची कंटका दिसे स्वारी
मुदें विस्फारुनि नाकपुड्या लाल
अश्व खिंकाळुनि नाचला खुशाल

पंख अपुलाले तदा सुरगणांनीं
निद्रितांच्या पसरुनी दिले कानीं
म्हणुनि कळला ना तो ध्वनी कुणाला
कुणि न आलें आडवें गौतमाला

( गीत )

" हे शुभ्र कंटका अश्ववरा
आनंद आवरुनि थांब जरा ॥ ध्रु० ॥
निघणार आज मी दूरवरी
हो सहाय मातें तूंच खरा – १
ही अपूर्व यात्रा सत्याची
सरणार कधीं ना कळत जरा – २
परि ध्येय साध्य झाल्याविण मी
फिरणार नाहिं या परत घरा – ३
हो धीट, चपळ कंटकराजा
हो अग्निशिखा, वादळवारा – ४
येवोत कुंपणें कांटेरी
उल्लंघ सर्व तीं करुनि त्वरा – ५
हो माझा नैष्टिक सहकारी
करण्यास मुक्त या चराचरा – ६
ना आसक्ति कसली, चल सखया
ने धन्यास अपुल्या दिगंतरा " – ७

आणि अखेरी निघे मारुनी कंटकास टाच
धर्माचें संशोधन करण्या बुद्ध एकटाच
देवांनीं मार्गांत पसरली पुष्पांची रास
यक्षांनीं मखमली गालिचा अंथरला खास
म्हणूनीच त्या तुरंगमाच्या टपटपत्या टापा
कुणि न ऐकल्या, मोडल्या न अन् कोणाच्या झोपा
नगराच्या वेशींत पोंचतां बंद दिसे द्वार

परंतु घडुनी काय अहो, तो येइ चमत्कार !
द्वारपाल शत अवश्य होते उघडायाला जे
सताड उघडे वेशीचे ते झाले दरवाजे
दोन कोस ज्या बिजागिऱ्यांचा ध्वनि गर्जत जाय
त्या झाल्या निःशब्द जणूं कीं मुंगीचे पाय
एक परीच्या गंधें भरल्या वाऱ्याच्या लहरी
रखवालांना गुंगी आणित फिरती दूरवरी
त्यायोगें हो सिद्धार्थाचा प्रवास निर्विघ्न
जाइ रात्रभर किति मैलांचें अंतर चालून
सकाळ झाली, प्रभात तारा क्षितिजीं चमचमला
उषादेविनें चैतन्याचा सडाच शिंपियला
मग बुद्धानें दिले हयाचे लगाम सोडून
खालीं उतरुन अश्व-मस्तका करी अवघ्राण
प्रवास सरला म्हणुनी गौतम आनंदें डोले
मागोमागचि आलेल्या तो छन्नाला बोले

( जाति-सूर्यकांत लीलारति )

" छन्ना ! मित्रा ! परतुन जा हा कंटक घेउनि घरीं
धन्य सख्या तूं तुझ्या कृतीनें मुक्ति मिळे सत्वरीं
हा उतर साज तूं मोल्याचा लौकरीं
हा कंबरपट्टा हिरे जडित स्वीकरी
तलवार ही तुझ्या हातीं शोभे बरी
माझे काळे कुरळे कुंतल मुंडन त्यांचें करी — १
तूं प्रणामपूर्वक तातांना सांगणें
कीं सिद्धार्थाला कांहिं काल विसरणें
फेडील तपाचें जेव्हां तो पारणें
येइल परतुन दिव्य ज्ञानें चढुनी शिखरावरी — २
तो करीत राहिल संशोधन एकला
उजळील झगडुनी तो ज्ञानज्योतिला

होतांच यशस्वी जिंकिल तो भूतला
प्रेमानें सेवेनें होइल माझी धरणी खरी — ३

नर हीच नराची आशा या जीवनीं
या मार्गावरतीं अजुनि न गेलें कुणी
तें धाडस केलें मीं सारें जाणुनी
जग ताराया उदक सोडुनी आलों जगतावरीं " — ४



# सर्ग ५ वा



( जाति-सूर्यकांत )

ये पांथस्था ! हो अनवाणी शिर अपुलें वाकवी
या स्थानाहुन पवित्र सुंदर स्थान दुजें ना भुवि
भीषण ग्रीष्मीं, भयाण शिशिरीं पावसांत वादळी
सिद्धार्थानें जगतासाठीं तप केलें या स्थळीं
बिंबिसार नृप गाजत होता सुविख्यात अधिपति
पांच मनोहर डोंगर त्याचें राजनगर रक्षिती
सरस्वतीच्या निर्मळ सलिलीं दिसती काळे कडे
जाई पाउलवाट घेउनी वळणें वळणें पुढें

आंब्याच्या राईवर झुलती वेळुवनाचे तुरे
रानफुलांचा सुगंध मादक वातावरणीं भरे
दुग्धशुभ्र शोभतात रेषा काळ्या खडकावरी
डगर कुठें तर – कुठें पठारें – हिरवळलेली दरी
एक गुहेवर करित साउली शोभे औदुंबर
स्थान हेंच तें – जिथें प्रभूनें तप केले खडतर
भगवानाच्या गुहेभोवतीं अपरात्रीं केधवां
घालित कोल्हेकुई जातसे जंबूकांचा थवा
कधीं जवळच्या दाट माजल्या हिरव्या झुडुपांतुनी
भक्ष्याच्या शोधार्थ भुकेला वाघच ये खवळुनी
विश्ववंद्य तो मुनी सर्वदा ध्यानमग्न राहुन
मौनाच्या डोहांत जाउनी करी सत्यशोधन
खडकापरि तो शांत, अचंचल, बाहेरीं अंतरीं
खार धिटुकली खुशाल हिंडे त्याच्या चरणावरी !
भित्री गोगलगाय संथ तीं ओलांडित पाउलें
निळीं कबुतरें दाणे टिपिती भिक्षापात्रांतले
ऊन रणरणे, तीव्र उष्णता कापविते मंदिरा
परंतु चिंतनमग्न विभूच्या स्पर्शी ना अंतरा
क्षितिजाला टेकलें अखेरी सूर्यबिंब तांबडें
मृदुल धरेवर लाल जांभळे संध्या घाली सडे
घुमे चौघडा आणिक सनई जवळ राजपट्टणीं
चमकूं लागे एक एक नभिं तारा तेजस्विनी
सामसूम मग हळूहळू हो, मध्यरात्र जाहली
घुबडांचे धूत्कार नादुनी शांति जरा भंगली
जैसे कामक्रोध हिंडती मनुज्याच्या अंतरीं
तशीं श्वापदें फिरति भयंकर घोर वनाभीतरीं
असे चालले वातावरणीं बदल जरी भोवतीं
ध्याना स्थित तो अचल प्रभुची मूर्ती मेधावती
आत्मबुद्धिचा घेत चालला मागोवा दुर्गम

जन्ममृत्युचा अन्वय लावी रात्रंदिन गौतम
दशांश उरता प्रवास विधुचा वरी नभःसागरीं
निद्रेसाठीं बुद्ध जरासा पहुडे शय्येवरी
परंतु आणी त्यास जागृती उषावात शीतळ
गौतम राही उभा पाहुनी एक भव्य कातळ
करुणामय ती दृष्टि टाकुनी सृष्टीवर झोपल्या
लाखकरोडो जीवा भेटे हृदयें ओथंबल्या

( वृत्त-उपजाति )

अजून रेंगाळत रात्र राणी
न ये उषेची कुजबूज कानीं
तों कोंबडा आरवला वनींचा
खळाळला पूर नभीं रुप्याचा

सुवर्ण, आरक्त छटा उदंड
रंगून गेले नव मेघखंड
आनंद विश्वांत भरून गेला
आत्मा जगाचा सविता उदेला

ऋषीपरी वंदुनि भास्कराला
भिक्षाटना बुद्ध निघे पुराला
पाऊलवाटेंतुनि नागमोडी
तो वेगवेगें निजमार्ग काढी

रस्त्यांतुनी तो नगरांत जातां
गेहांतुनी धावति त्या सुमाता
ठेवून सिद्धार्थ – पदीं मुलांना
सश्रद्ध त्या वंदिति शाक्यराणा

"घ्या घ्या महाराज" म्हणून येती
उपायनें लोक समर्पिताती
भरे शिगोशीग सर्वच पात्र
जाई असा हिंडत लोकमित्र

ते नेत्र, ती सात्विक योगमुद्रा
उधाण आणी जनतासमुद्रा
प्रभू दिसे चिंतनमग्न कांहीं
समस्त जीवांस्तव काळजी ही

स्वप्नांतला राजकुमार आला
कुणी असे चिंतित रम्य बाला
साश्चर्य काळे, रमणीय, भोळे
प्रभूवरी ती स्थिरवीत डोळे

परंतु जाई स्थिरधी पुढारा
गिरींतल्या त्या अपुल्या अगारा
हो धर्मचर्चेत फिरून मग्न
सत्यावरी एकवटून प्राण

( जाति–सूर्यकांत )

रत्नगिरीच्या मध्यें विजनीं किती तडीतापसी
आत्मलाभ व्हावया दंडिती देहाला दिननिशीं
कोणी धरिती संतत वरती उभे हात आपुले
रक्त गोठलें आणि खराटे शरिरांचे जाहले
भस्म फासुनी बसले कोणी कांटयांच्या आसनीं
कुणी डागती वक्ष, भाल ते अग्नी प्रज्वाळुनीं
नखें कुणाची वाढुन जाळीं तळहातीं जाहली
कुणी मृतांचीं वसनें अपुल्या कटीस गुंडाळलीं

घार-गिधाडें मृतमांसास्तव जेथें झेपावती
स्मशानभूमी अशी निवडुनी कुणी बैसले यती
शिवनामाचा जप कोणाचा अखंड तर चालला
सर्प भयंकर वेढुनि घेती काळवंडल्या गळां
कडुलिंबावर करिति गुजारा कुणी तपस्वीजन
मातीमधले कुणी धान्यकण वेचुन करि भोजन
श्रवणदर्शना आचवलेला एक अभागी नर
आत्मसुखास्तव एकाकी व्रत आचरितो खडतर
दुःख निर्मिले ज्यांनीं ते सुर व्हावें करुणान्वित
दुःख सोसण्या समर्थ व्हावें यास्तव ते कष्टत
हठयोग्यांचा, भिक्षुगणांचा विचित्र मेळा असा
पाहुनि भारी क्लेश जाहले बुद्धाच्या मानसा
अखेर करुणा-कटाक्ष टाकुनि एक दिनीं गौतम
तापसांतल्या प्रमुखा वदला, " सांगा, मुनिसत्तम
गिरिवरती या सत्यशोधनीं चिंतनांत कातळीं
चंद्राचे उदयास्त पाहिले अनेक मी या स्थळीं
आपण आणिक माझे येथिल हे सारे बांधव
जीवनांत कां क्लेश ओतितां आधिंच जें दुःसह ? "

( वृत्त–वंशस्थ )

वदे मुनी शाक्यसुताच तेधया
" असेंच शास्त्रांत निवेदिलें महा
महातमें जो करि देहदंडन
करील मृत्यूवर मात जिंकुन

विशुद्ध आत्मा अधमुक्त होउनी
निघेल पंखें कमनीय लावुनी
न पोचते बुद्धिच जेथ मानवी
बघेल क्षेत्रें द्युतिमान् अशीं नवीं. "

( वृत्त–उपजाति )

तात्काल दे उत्तर त्यास बुद्ध
" पहा, सुवर्णांकित हे पयोद
हे वादळी वारिनिधीमधून
जन्मास आले जल साठवून

तिथेंच जाणें परि त्या फिरून
ओढे, नद्या, सागर यांमधून
चालायचें चक्र असें सदैव
स्थायी नसे कांहिंच त्यास भाव

रक्ताचिया मोबदल्यांत कोणा
लाभेल केव्हां सुरलोक जाणा
परी न तोही चिरकाल साचा
कालांतरें हातुन जावयाचा "

( वृत्त–वंशस्थ )

मुनी वदे, " एकच जाणतों अम्ही
निशा सरे तें उदयास ये रवी
तपांत आहेत अनंत वेदना
परंतु लाभे मग शांतता मना

शरीर आत्म्यास निबद्ध जें करी
घृणा तयाची अनिवार अंतरीं
देवास तें दान म्हणून अर्पितों
सुखें मिळाया परमोच्च कष्टतों "

( वृत्त–उपजाति )

सिद्धार्थ तात्काळ पुसे " सुखें हीं
किती युगें हो ! असणार स्थायीं

केव्हांतरी तीं सरणार खास
पुनश्च जन्मान्तर, मृत्यु, क्लेश !

पुढें गती कोणति वाट पाहे ?
देवा तरी कां अमरत्व आहे ? "
अधोमुखें तो वदला तपस्वी
" ब्रह्माविणा शाश्वत ना कुणीही "

( जाति–सूर्यकांत )

नम्रपणानें बोले गौतम तया प्रेमळ स्वरें
" पवित्र तुमचें जीवन, तुमचें मन धीराचें खरें
उच्च सुखें जीं तुम्ही समजतां तीं स्वप्नें नश्वर
तीं मिळवाया कशासि कायाक्लेश असे खडतर
आत्म्याच्या प्रेमास्तव करतां देहाचें दंडन
परी देह हें गेह असे ना आत्म्याचें पावन
ऊर फुटेतों घोड्यावरतीं कां ओझें लादतां ?
प्रवास सरण्यापूर्वीं त्याला कां मारुनि टाकतां ?
मिळे प्राक्तनें नरतनु अपणा हे उदास सज्जन !
जिच्या गवाक्षांतून अंतरीं येती तेजःकण
केव्हां पुंजाळेल उषेचें तेज कळे त्यामुळें
कुठल्या मार्गावरी नेटक्या टाकावीं पाउलें ?
आत्म्यांचें हें सदन मनोहर करतां कां निर्जन ?
भुईस कां आणिता तयाला घाव बळें घालुन "
—प्रश्न असे विनतोड ऐकुनी गोंधळले ते मुनी
ओरडले, " रे ! राहुं दे अम्हा या अमुच्या साधनीं
काढ शोधुनी मार्ग उच्चतर हे शुद्धोदनसुता
सुखें येथुनी जा, तुज लाभो धर्म, तेज, शांतता "
मनीं होउनी श्रमी गिरींतिल सोडुन तो आश्रम
मंद पदांनीं वाट चालतां बोले हें गौतम

( दोहा )

“ हाय ! माणसें मरणाला  किति हीं घाबरतात !
भीतिमुळें मृत्यूचा ते  पाठलाग करतात
जिवंत राहावें याचा  इतका या हव्यास
जीवनावरी प्रेम कधीं  करतां ये ना त्यास
तृप्त कराया देवांना  कष्टविती देहास
मनुजांना सुख लाभावें  सुरां न वाटे खास !
मृत्यूनंतर नरक नको  म्हणून या जन्मांत
नरक निर्मिती नरच स्वतः  करुनि सुखाचा घात
काय म्हणावें या वेडा !  कसला हा अविचार !
देह जाळुनी आत्म्याचा  हो का साक्षात्कार ?
हें पुष्पांनो ! मधु वदनें  रवीकडे फिरवून
हसतां रंजित मोलाचीं  आभरणें चढवून
कृतज्ञतेनें चालति हे  गंधित तुमचे श्वास
जीवनरस चाखायाचा  किती तुम्हा उल्हास
तुमच्यापैकीं कोणीही  अपुल्या सुंदरतेस
कळाहीन ना करी कधीं  कधीं न मळवी वेष
हे वृक्षांनो ! उंच वरी  घुसतां आकाशांत
मुकुट तुम्यांचे चढवूनी  सूर्यस्तोत्रें गात
मलयानिल आकंठ तुम्ही  पिउनी होतां धुंद
गूढ कोणतें देइ तुम्हा  सदा कदा आनंद ?
वृक्षावरच्या पक्ष्यांनो !  सुंदर तुमची झेप
सुखोपभोगा दिधला ना  कधीं तुम्ही संक्षेप
उच्च सुखें मिळवायाचा  ठेवुनिया उद्देश
अपुल्या कोमल शरिरांना  दिले तुम्ही ना क्लेश
परी शहाणा मानव जो  करी तुम्हांला ठार
आत्मक्लेशाचा नसता  माजवितो बडिवार ”

( जाति–सूर्यकांत )

याच विचारीं गौतम असतां धूळ उठे भोवती
उतरत होती कैक मेंढरें शिखराहुन खालतीं
गवत कुठें तर कुठें जलाशय त्यांच्या दृष्टी पडे
जाई अस्ताव्यस्त कळप तो वेगें मग त्याकडे
कधिं आरोळ्या मारुनि केव्हां चालवुनी दंडुकीं
मेंढपाळ ती चमू अजागळ आवरती सारखी
एक बिचारी मेषमाउली रेंगाळे मागुती
ढवळीं पिवळीं दोन पाडसें घेउनिया संगती

एक त्यांतलें जखमी झालें होतें वाटेवरी
असह्य होती कष्ट तयाला, संतत तळमळ करी
चुकेल दोघांतलें कुणी या माय ग्रासली भयें
तोंच पाहिलें सहज तयाना प्रभुनें करुणामयें

दृश्य पाहुनी उचंबळे तो करुणेचा सागर
जखमी पाडस त्वरित उचलुनी घेई पाठीवर
" भिऊं नको माउली, तुझा मी होइन संरक्षक
जाशिल तेथें तुझें सदोदित नेइन मी बालक

तपोनिधींच्या संगें करणें मोक्षाची साधना
श्रेष्ठ याहुनी एका पशुची थांबविणें वेदना
मेंढपाळ हो ! कुठें निघाला कडक दुपारीं तुम्ही
गांठाया मुक्काम नेहमी निघतां सायंतनीं. "

" महाराज ! हें समोर दिसतें नगर तिथें आजला
रात्रीं ठरला असें व्हायचा यज्ञाचा सोहळा
बळी द्यावया घेउनि यावें अजापुत्र शंभर
राजाज्ञा ही म्हणुनि कापतों वाट अम्ही भरभर "

" मीही येतों " असें बोलुनी बुद्ध निघे त्यासवें
कडेस पाडस, मेषमाउली बोले व्याकुळ रवें

( वृत्त–शा. वि. )

सारे ते पशु आणि रक्षग पुढें आले नदीच्या तटीं
येई तोंच समोर साश्रुनयना बाला कुणी गोमटी
बुद्धाला प्रणती करून विनयें बोले किसा गौतमी
" रात्रीं काल अभागिनीस सदया ! आश्वासिलें हो तुम्ही

माझें पोर मळ्यांत खेळत पडे–दुर्दैव तो ओढवे
आला एक अही उभारुनि फणा बाळास वेढूं बघे
घाली पोर अजाण हात अपुला तोंडांत सर्पाचिया
तों प्राणांतिक दंश तत्क्षणिं करी—त्याला कशाची दया ?

खेळेना, स्तनपान ना करि, पडे निश्चेष्ट तें बालक
' त्याचा अंत नजीक येइ ' वदले ते जाणते प्रेक्षक
कोणी देऊनि धीर सांगति मला, ' शेजारच्या जा वनीं
आहे तेथ कुणी मुनी, तव सुता देईल संजीवनी '

आलें मी तुमच्याकडे, निरविलें बाळास पायावरी
देवा ! शिंपडल्या त्वदीय चरणीं दुःखासवांच्या सरी
किंचित् वस्त्र करून दूर शिशुच्या तोंडावरूनी तुम्ही
मानें हे करुणानिधान ! वदला मंजुस्वरें आर्जवी

' माते ! आवर शोक, पुत्र करतों जीवंत तूझा क्षणीं
तूतें मागत एक वस्तु परि ती देई मला आणुनी
ज्या गेहांत दगावलें न कुणिही जाऊन ऐशा घरीं
त्या गेहांतुन मोहऱ्या मुठभरी घेऊन ये सत्वरीं, "

" हो ! हो ! आठवते असेंच तुजला मी बोललों कांहिंसें
झालें काय पुढें बरें ? " सदय तो त्या माउलीला पुसे

राही स्तब्ध जरा परंतु मनिंचा आवेग होतां कमी
बुद्धाला अपुली कथा सकल ती सांगे किसा गौतमी

( गीत )

" चहुकडे गेलें करित पुकार
धरुनी गोळा हा हृदयाशीं फिरलें दारोदार ॥ ध्रु ॥
' मुठभर द्या हो मला मोहऱ्या '
सिद्ध कुणीही मज द्यायाला
साह्य गरिब हो नित गरिबाला
परंतु माझी ऐकतांच अट घेती ते माघार ॥ १ ॥

' जरि या सदनीं मृत्यु एकही
नसेल झाला तर भिक्षा ही
घेइन ' वदतां कथिलें त्याहीं
' कसें शक्य हें ? जिवंत थोडे मृतसंख्येस न पार ! "
" गुलाम येथें निवर्तला गे ! "
" निष्प्राण इथें हो छकुला गे ! "
" इथें हरपली सुममृदुला गे ! "
" बीज पेरिलें त्यावर हाणीं मृत्यु एक दिन वार "

प्रभो ! सर्वदिन केली वणवण
असें धाम मज मिळालें न पण
सांगा आतां कांहीं आपण
अखेर आलें तव चरणांचा घ्याया मी आधार "

( वृत्त-वियोगिनी )

तिज शाक्यमुनीन्द्र बोलला, " तुजला अंजन देत तीव्र मी
जग शोक करी तुझ्यासवें मग कां दुःख न हो तुझें कमी ?
तुझिया हृदयींच काल जें भगिनी ! बालक शांत झोपलें
उचलून तयास मृत्युनें निज पाशांतचि आज घेतलें

नगरांत अजाण कोकरें — वलिदाना नर नेति हे पहा
फुलवी फुलबाग रम्य ती — ठरते प्रीति अखेर दुःसहा
उकलेल रहस्य हें कसें ? — करितों यास्तव धर्मशोधन
तव थांबविण्यास आसवें — रुधिराचेंहि करीन सिंचन
भगिनी ! सुतशोक आवरी — शिशुच्या अंत्यविधीस सिद्ध हो
तुज शक्ति मिळो—पुढें चला — नगराला झणिं मेंढपाळ हो ! ”

( जाति—सूर्यकांत )

मेंढपाळ ते पशुसह जेव्हां पुरानजिक पोचले
तैं संध्येची दिसूं लागलीं मंदमधुर पाउलें
लाल रवीनें रंगविलेली खालीं वाहे नदी
खडे पहारेकरी नृपाचे कडवे वेशीमधीं
बुद्धविभूच्या खांद्यावरती पाहुनि तें कोंकरूं
दरवानांचा ताठा लागे क्षणार्धांत ओसरूं
सर्व खरेदी—विक्री थांबे, जन झाले निश्चळ
मंडईतला बंद जाहला शब्दांचा गोंधळ
लोहाराच्या हातामधला हातोडा विरमला
उभा आडवा मागावरला धोटाही थांबला
पै—पैशाची चुकूं लागली धनकोची मोजणी
सांडुं लागलें दूध चहुकडे गवळ्यांच्या हातुनी
लीन दिव्य तें सिद्धार्थाचें असामान्य दर्शन
खिळुनि राहिले सर्व जनाचे त्याच्यावर लोचन
दारामधुनी प्रेमळ गृहिणी भक्तीनें पाहती
“ कोण बाइ ग ! शांतिनिधी हा कांति पहा तर किती !
कुठल्या बाई हा वर्णाचा ? कुठें राहतो बरें ?
तेजस्वी डोळ्यांवर याच्या दृष्टि न अपुली ठरे.
शक्रराज कीं स्वर्गामधुनी आला हा भूवर ”
कुणी सांगती, “ राहि जवळच्या गिरींत हा मुनिवर ”
बुद्धदेव परि मग्न चिंतनीं चाले रस्त्यांतुनी

" हाय ! माझिया मेषांना या पालक नाहीं कुणी
निर्नायक ही तमांत फिरती काढित तार स्वर
सुरा मृत्युचा पडावयाचा यांच्या मानेवर. "

प्रासादापर्यंत पोचली तोंवर ही बातमी
यज्ञपशूंच्या संगें आला कुणी चतुर्थाश्रमी
यज्ञवेदिच्या जवळ उभा नृप राही भाविकपणें
पेटे स्थंडिल, प्रकट होय तो अग्निदेव चंदनें
तूपतांदुळा पोटीं घेती धगधगणाऱ्या शिखा
सोमरसाचा लाभ यामुळें होत असे भाविका
वेदीच्या जवळून, धुराच्या वातावरणांतुनी
रुधिराचा तो ओहळ वाहत लुप्त वालुका-कणीं
यज्ञास्तव बलिदान पशूंचें चालतसे त्या स्थळीं
मुंजतृणानें एक बांधला मेष द्यावयां बळी
बिंबिसार नृपतीस मिळावें स्वर्गाचें वैभव
सारे ब्राह्मण करीत होते वेदघोष यास्तव
मुख्याच्या हातामधिं तळपे पाजळलेला सुरा
क्षणांत जो करणार अज्याच्या अलग धडांतुन शिरा.

( वृत्त–उपजाति )

" वधूं नका त्या दुबळ्या जिवांस "
बोले असे गौतम मंजुभाष
वेगें अज्याला करि बंधमुक्त
तेजें तयाच्या दिपले समस्त

वंदूनि सांगे सकल द्विजातें
" स्वप्राण जीवास अमोल वाटे
करूं शकेना कुणि जीवदान
घेतां कशाला मग व्यर्थ प्राण ?

आनंद आश्चर्य भरे धरेंत
सतेज तीतें करुणा करीत.
तिनेंच पृथ्वी मृदु दुर्बलास
उदास तैशी बलपुत्रकास "

सिद्धार्थ बोले अजपालकांना
" पहा, दया याचिति जे सुरांना—
दया स्वतःची बुजवून पार
ते मूक जीवा करतात ठार !

जनावरें आजवरी न कांई—
देती तुम्हा लोकर दुग्ध तेविं ?
ज्यांच्यावरी विश्वसिली अपार
ते हात त्यांना करणार ठार.

( वृत्त–शिखरिणी)

द्विजांनो ! घ्या ध्यानीं जननमरणाचा उलगडा
नव्या पापांचा कां उगिच भरतां निष्फळ घडा ?
पशूंच्या रक्ताची सदय अमरा लाच भरुनी—
स्वतःच्या पापाचें करुं शकति का मार्जन कुणी ?

इथें सत्कार्यानें मधुतम फळें खास मिळती
इथें दुष्कार्यानें मिळत मनुजा दुःखद गति.
इथें ज्याचा तोच प्रमुख जगिं उद्धारक ठरे
दिलें एका हातें परत मिळतें अन्यचि करें."

अशीं सिद्धार्थाचीं श्रवुनि करुणोदात्त वचनें
द्विजें झालीं मागें धरुनि रुधिरा रक्त वसनें
बघूनी बुद्धाची अनुपम सुमूर्ती द्युतिमति
करा जोडोनी ये सविनय पुढें तो नरपति.

( जाति–सुर्यकांत )

परंतु चाले सिद्धार्थांचें पुढेंच तें प्रवचन
" अहा ! खरोखर या धरणीचें होइल नंदनवन
प्रेम भावना याच एकल्या सूत्रामध्यें जर
गुंतुनि जाती लहान मोठे प्राणिमात्र भूवर
फळधान्याच्या सत्वान्नावर सर्वांनीं राहणें
रक्तपिपासा तोडुनि प्रेमें सदैव राहाटणें "
सिद्धार्थाच्या सौजन्याची कांति अशी पसरली
त्या विप्रांचीं हृदयें प्रभुनें क्षणार्धांत जिंकिलीं
पश्चात्तापें सारे ब्राह्मण पुढाकार घेउनी
यज्ञाची सामग्री देती निज हस्तें उधळुनी
आणि लगोलग राजाज्ञा ती चहुकडे फडकली
निनाद तीचे उमटत गेले गंगा–यमुनाजलीं.

( वृत्त–मंदारमाला )

" आतां पुढें या प्रदेशांत कोणी करावी न ती जीवहत्या कदा
लोका दिला बिंबिसारें नृपानें असा सक्त घालूनिया कायदा
एकात्मता जीवसृष्टींत साऱ्या भरूनी असे राहिली सत्य हें
दावी दया जो तयालाच लाभे दया सिद्ध हें होतसे प्रत्ययें "

( जाति–सूर्यकांत )

असेंच पूर्वीं एका जन्मीं असतांना ब्राह्मण
हिंस्र पशूस्तव सिद्धार्थानें केलें प्राणार्पण
पडे अवर्षण भयद एकदां धरेस गेले तडे
ऊन रणरणे आणि जाहल्या नद्या झरे कोरडे
खाद्य मिळविण्या सैरावैरा प्राणिमात्र तो पळे
तृणें करपलीं, पानें सुकलीं, वाळुन गेलीं फळें
ओढ्या कांठीं एका राही त्या ठायीं गौतम
एक भयंकर दृश्य त्या स्थळीं पाही विप्रोत्तम

छाव्यांना घेऊन भुकेली वखवखलेली कुणी
सामोरी वाघीण एक ये गर्द अरण्यांतुनी
कराल दंष्ट्रांतून जीभ ती सुकलेली लवथवे
डोंब भुकेचा पोटीं उठुनी जाळ लोचनांत ये
ग्लानि येउनी पडली खालीं, उभी न राहूं शके
शुष्क स्तनांना निष्फळ झटतीं तिचीं दोन बालकें
खिन्न विचारी थेंब दुधाचा मिळे न त्या जाणुनी
व्याघ्र माउली बिचव्यांना त्या समजावी चाटुनी
गरजेपेक्षां प्रेम उच्चतर याचा ये अनुभव
गुरगुरणारीं बाळें झालीं क्षणभर ती नीरव
भूक मुलांची पाहुनि होती असह्य तिज वेदना
त्या भूभागा कापविणारी वाघिण करि गर्जना
हें पाहूनी विरघळला तो दयानिधी गौतम
कसें वाचवूं शकेन यांना याचें करि चिंतन
" रानींच्या या हिंस्र श्वापदा जीवन देण्यास्तव
उपाय एकच उरला " ऐसें चिंती करुणार्णव
" हीं संध्येपर्यंत भुकेलीं जनावरें राहिलीं
खासच यांची समजा घटिका अखेरची पातली
शरीर यांना माझें मी जर भक्ष्य म्हणूनी दिलें
वांचेलचि ही व्याघ्र माउली वाचतील हीं पिलें.
मी नाहींसा होईन–तनु ही नाहींतरि नश्वर
प्रेमास्तव कुठलाहि त्याग तो ठरतो श्रेयस्कर "
आणि खडावा, दंड, कमंडलु ठेवुनिया बाजुला
सिद्धार्थानें व्याघ्रमुखीं निज देह झोकुनी दिला
" घे माते, हें मांस आणि हो तृप्त " असें बोलला
वाघिणिनें त्या देहावरती मग हल्ला चढविला.
स्वतः खुषीनें हिंस्र पशुमुखीं जाय बळी तो मुनी
पंजांचे खंजीर तीक्ष्ण ते घुसले मांसांतुनी
रक्ताचें थारोळें झालें—न लगे कालावधि

शेवटला निश्वास पशूच्या मिसळे श्वासामधीं
ऐशी प्रभुची अगाध करुणा मागें जन्मांतरीं
पुनः प्रगट ती झाली आतां येथें यज्ञांतरीं
बिंबिसार नृप वदे गौतमा भारी प्रेमादरें
" व्रत वैकल्यें कष्टविसी का राजदेह हा बरें
शोभावा ज्या हातांमध्ये राजदंड सुंदर
भिकार भिक्षापात्र वाहती तेच आजला कर
घेई युवका साह्य करी मज राज्याच्या शासनीं
माझ्या मागुन बैस सुखानें माझ्या सिंहासनीं
पुत्रहीन मी, माझा हो सुत परम प्रिय पावन
अप्सरेपरी वधू तुला मी शोधुनिया आणिन"
गहिवरलेल्या भूपालाचें ऐकुन हें भाषण
शांत आर्जवी स्वरांत देई प्रत्युत्तर गौतम

( वृत्त–पृथ्वी )

" उदार नृपते ! अरे ! सुलभ सर्व होतें मला
झुगारुनि परंतु तें निघत सत्य शोधायला
न मार्ग बदलेन मी वरुनि ये जरी पालखी
जरी मज समर्पिला अमर लोक देवादिकीं.

रचीन नव शासना, गमन मी गयेला करी
प्रकाश मम त्या स्थळीं प्रकटणार अभ्यंतरीं
कृतार्थ मग होउनी–तुजसि देत आश्वासन
सख्या ! तुजसि भेटण्या परत या इथें येईन."

( वृत्त–शालिनी )

सिद्धार्थाला वंदुनी बिंबिसार
त्याच्या भोती हिंडला तो त्रिवार

आश्वासूनी आर्जवें बुद्ध त्याला
गाठायाला ऊरुवेला निघाला

साहा वर्षं चाललेली भ्रमन्ती
साधू कोणी दर्शनें सांगताती
ब्रह्म--प्राप्ती केविं होईल याचें
जाती वायां पाठ त्या साधकांचे

सिद्धार्थाला मान्य ना देहदंड
वाटे सारें फोल तें कर्मकांड
लाभावा तो सत्य--धर्म--प्रकाश
बुद्धा लागे एवढी एक आंस



# सर्ग ६ वा



( जाति–साकी )

सद्धर्माचा प्रकाश कोठें अखेर दिसला प्रभुला
जाणायाचें असेल तर व्हा पुढतीं वायव्येला
गंगेच्या खोऱ्यांत भव्य त्या दोघी सरिता भगिनी
निरंजना मोहना मिळाल्या अन्योन्या येऊनी
फल्गूच्या पात्रांतून वाहत संगम सुंदर जाई
खडक बाजुला काळे त्यावर हिरव्या पिवळ्या राई
पात्रामधुनी तरंगताती निळीं पांढरीं कमळें
संथ कासवे, चपल मत्स्य ते, धूर्त तटावर बगळे

जवळीं खेड्यांतील घरांचीं गवती छपरें दिसती
साध्या भोळया शेतकऱ्यांची जेथें होती वसती
विजनांतील या स्थाना म्हणती त्या काळीं उरुवेला
सत्यशोधना गौतम येथे चिंतनमग्न जहाला
शास्त्रांचे सिद्धांत खरे का ? दैव करी कां खेळ ?
सुखदुःखांचा कसा जीवनीं बसावयाचा मेळ ?
अव्यक्तांतुन प्रकटुन होतें अव्यक्तांत विलीन
इंद्रधनू परि मधेंच ज्याची दिसते रम्य कमान
विरल धुक्याचा गडद ढगाचा ज्यास असे आधार
क्षणभंगुर ज्यावरती चढती रंगतरंग अपार
तें जीवन हें काय खरोखर ? काय तया गूढार्थ ?
हें शोधाया किती घालवी दिनराती सिद्धार्थ
याच चिंतनीं कधिं भिक्षेची उलटुन जाई वेळ
उन्हें उतरुनी वितरत छाया येई संध्याकाळ
भानावर ये प्रभू तेधवा पसरूं लागे रात्र
दिसे त्याजला जवळ रिकामें पडलें भिक्षापात्र.
मग धुंडाळी कुठें वनफळें भवतीं झाडाखालीं
मिळती थोडीं, पशुपक्ष्यांनीं तींहीं कुरतडलेलीं.
कशीतरी त्यावरी भागवी भूक आपुली बुद्ध
अशी न उरली पुढे तयाला निजदेहाचीं शुद्ध
आणि एक दिन वरती येतां भास्कर माध्यान्हींचा
शक्तिक्षय होऊन विभुला येइ अकस्मात् मूर्च्छा
धरणीवर निश्चेष्ट काष्ठवत् होऊन गौतम पडला
रक्त गोठलें, क्षणभर त्याचा श्वासोश्वासहि अडला
परम भाग्य परि मानवतेचें ! त्यावेळीं त्या ठायीं
मेंढपाळ कुणि तरुण सहजची त्या वाटेनें जाई
डोळे मिटूनी पडलेल्या त्या सिद्धार्थाला पाही
दुःख अनामिक बुद्ध मुखावर दिसलें त्याला कांहीं
सर्वेच तोडुन तयें आणिल्ल्या फांद्या हिरव्यागार

सिद्धार्थाच्या वदना भवतीं केला कुंज तयार
पावन देहा विटाळ अपुला नको करून विचार
शेळीचे स्तन पिळुनि विभुमुखीं धरी दुधाची धार
शापभ्रष्टाचि देव कुणी हा भूमीवरती आला
अशा भक्तिनें मेंढपाळ तो पाही सिद्धार्थाला
धार दुधाची जाता कंठीं ये शुद्धीवर बुद्ध
" दुग्ध कलश दे तुझा " वदे हे त्या तरुणाला शब्द

( छंद–अभंग )

" नको महाराज, मी तो हीनजाति कसा देऊं हातीं, दुग्धकुंभ
आपणांस आम्हीं दुरून सद्भावें वंदावें पूजावें हेंच योग्य. "
यावर हासूनी, जगन्मान्य मुनि, बोले आश्वासुनी, युवकाला
" गरज अन् दया, या एक सूत्रात, सारे प्राणिमात्र, एक होती
साऱ्याच रक्ताची, साऱ्या आसवांची जात एक साची, जगभर
गंधविलेपन, वा यज्ञोपवित, यांसह का घेत जन्म कोणी
करील सत्कृत्यें, तोच ठरे द्विज इतर अंत्यज, जाण बापा
आण तो कलश, दूध मी प्राशीन, कल्याण साधीन, शेखीं तूझें "
आनंदला युवा झाला सद्गदित, सिद्धार्थाला देत, दुग्धकुंभ

( जाति–सूर्यकांत )

एके दिवशीं गांवामधल्या देवळांतुनी मार्गी
कांहीं नृत्यांगना प्रकटल्या नाचत गात शुभांगी
सताल त्यांचे पदन्यास ते, पैंजण रुमझुम करती
कनक कंकणें त्यांत घालती गोड सुरांची भरती
त्या रमणींना साथ कराया वादक होते तीन
एक धरी पखवाज, दुजा घे मुरली, तिसरा बीन
निज वाद्याचा इतर सुरांशीं बसवायास्तव मेळ
बीनकार तो करीत होता तारा घट्ट नि सैल

घेउनि गिरकी भिंगरीपरी नर्तननिपुणा एक
अस्मानामधिं करी मुलायम मधुर सुरांची फेक

( जाति–बालानंद )

" गात गात ग नाचू या
नाचत नाचत गाऊं या ॥
वीन नका हो ताणू फार
परंतु सोडा ढिला न पार
अधिक तया जर ताण दिला
जाइल उडुनी स्वरमाला
शैथिल्येंहि न होइल काम
स्वरमाला पावेल विराम
नीट म्हणुनि लावा तारा
नृत्यगायना साथ धरा
मग नृत्यीं बुडवूं दुनिया
गात गात नाचुनिया. "

( जाति–साकी )

गीत गात हे तालावरती जाय नर्तकी पुढती
फूलपाखरूं जसें हिंडतें सुमनासुमनावरती
होता औदुंबराखालतीं ध्यानमग्न सिद्धार्थ
त्या गीताचे शब्द रिघाले त्याच्या श्रवणपुटांत
अर्थ तयाचा घेउनि ध्यानीं बोले मुनि उल्हासें
" पहा अडाणी लोकहि केव्हां सत्य सांगती कैसें !
लोकां करिता सद्धर्माचा व्हावा साक्षात्कार
यास्तव माझ्या आयुष्याची किती ताणली तार !
डोळे झाले क्षीण – आज ये त्यांच्या पुढती सत्य
शक्ति खंगली – आजच तीची गरज असे अत्यंत.

सहाय कोणी होइल का मज झालों मरणोन्मुख मी !
मनुजांची आशा हें जीवन ना तर होइ निकामी ! ”

निरंजनेच्या कांठावरती खेडें एक लहान
त्या खेड्याचा पाटिल मोठा धार्मिक अन् धनवान्
विपुल गोधनें, जमीनजुमला, उदंड लौकिक साचा
चतुर अग्रणी, रक्षण कर्ता तो पीडित दलितांचा
त्याच्या सुंदर संसाराची स्फूर्तिच ऐशी कांता
साध्वी, सोवज्ज्ळ अन् कनवाळू ती पतिनिष्ठ सुजाता
प्रदेशांत त्या सुलोचनेच्या सौंदर्यास न तोड
औदार्याची, मधुवाणीची पुनः त्याजला जोड
प्रसन्नवदना प्रत्येका ती घेई आकर्षून
घरीं नि दारीं झळकत राही अपूर्व तें स्त्रीरत्न
परंतु ऐशा संसाराचें होतें सौख्य अपूर्ण
उणीव मोठी नव्हतें पोटीं किती दिवस संतान
करी सुजाता व्रतवैकल्यें, उपास आणिक दानें
वनदेवाला नवस करी ती भाविक अंतःकरणें
अखेर झाली सफळ तपस्या कांहीं वर्षें जातां
एका सुंदर पुत्राला ती देई जन्म सुमाता

आणि लागतां गोजिरवाण्या सुतास तिसरा मास
येइ सुजाता नवस फेडण्या वनीं घेउनी त्यास
लाल शालु तो, वदनावरचा तो सात्त्विक उल्हास
पाहुन वाटे सौंदर्याची कुणी ओतिली मूस
एका हातें हृदयिं धरी ती गृहरत्नास सुजाता
दुसऱ्या हातें डोईवरच्या सावरि सुवर्णपात्रा
आधींची करण्यास तयारी गेली राधा दासी
नाचत आली धनिणीला शुभ वार्ता सांगायासी.

( जाति – मेनका )

" काय हा चमत्कार बाई !
मनुष्यरूपें वनदेवचि तो प्रकट आज होई.
तरुतळीं आहे ध्यानस्थ
पद्मासन घालून तयाची बसलेली मूर्त
कोवळी काय वानुं कांति !
तेजोवलयें झगमगतीं त्या शांत मुखाभवतीं
केवढी अपुली पुण्याई
स्वीकाराया नवस अपुला साक्षात प्रभु येई ! "

( जाति – साकी )

ही रोमांचित जाइ सुजाता आनंदानें पुढती
बुद्धाला वनदेव समजुनी करी भक्तिनें प्रणती

( जाति – अवनी )

" धन्य धन्य ही दासी जाहली सुजाता
पुण्य किती जन्मींचें सफल होय आता ॥ ध्रु. ॥
ही सुवर्णपात्रीं मी
खीर आणिली नामी
स्वीकारुनि मज कृतार्थ करा लोकनाथा ॥ १ ॥
आपल्या कृपेमुळेंच
संसारीं सुटति पेच
सुलभ सुखद मनुजाला हो जीवनयात्रा " ॥ २ ॥

मग बुद्धाच्या ओंजळींत ती अत्तर थोडें शिंपी
सुवर्णपात्रामधलें पायस त्याला प्रेमें अर्पी
शब्द एकही बोलतां न तो प्राशी सारी खीर
रमणीच्या डोळयांत साठलें कृतज्ञतेचें नीर

त्या अन्नाचा प्रभाव ऐसा अद्‌भुत देहावरती
बुद्धाला नवजीवन लाभे नवशक्ती, नवकांति
उपवासाचे दिवस आणखी त्या चिंतातुर रात्रीं
वाटुं लागल्या जणूं कालच्या स्वप्नापरि निमिषांतीं
उजाड देशावरुनि पाखरूं जातां हो हैराण
दृष्टीच्या टप्प्यांत न येई कुठें आश्रयस्थान
तोंच दिसावें क्षितिजावरती त्याला एक तडाग
ज्यांत उतरतां जावा थकवा अन् तनुवरचे डाग
झिजलेलीं गळलेलीं सारीं पिसें फिरुन फुटावीं
शेपुट, पंखें, तुरा यांवरी नवी टवटवी यावी
तसे प्रभूच्या मुद्रेवरती नवीन चढलें तेज
द्युतिमय नयनें आणि जाहला उंच मधुर आवाज.

( वृत्त—आनंद कंद )

| | |
|---|---|
| " रुचला तुम्हांस का हा | नैवेद्य अर्पिलेला ? |
| मानून घ्याल ना ही | सेवा तुम्ही दयाळा ? ' |
| " आकंठ पेय प्यालों | बल आणि तेज आलें |
| पेयांत काय जादू तूं | ओतलीस बाले ? " |
| " मीं धेनुच्याच दुग्धें | धेनूस पोषियेलें |
| त्यांच्या पिळून धारा | पय हें तयार केलें. |
| मोत्यापरीस दाणे | वेचून तांदळाचे |
| दुग्धांत घातलें मी | बारीक पीठ त्यांचें, |
| लावून केशराचा | त्याला प्रभो ! सुवास |
| ही खीर आणिली | मी अर्पावया तुम्हांस, |
| येतांच पुत्रपोटीं | येईन या स्थळास |
| नैवेद्य भक्तिभावें | अर्पीन या तरूस |
| नवस प्रभो ! असा मी | वनदेवतेस केला |
| तो फेडण्यास आलें | घेऊन बालकाला |

आला मनुष्यरूपें वरती तुम्हीच देवा !
या नम्र बालिकेचा करितील सर्व हेवा.
सौभाग्य, संपदा अन् हें पुत्ररत्न साचें
याहून काय लोकीं उरलें मिळावयाचें ?"

( गीत )

"शतायु होवो बाळ तुझें हें ।
जीवन नच त्या अवजड व्हावें ॥ ध्रु. ॥

सहाय ज्याला झालिस भगिनीं
संकट काळीं भयाण विपिनीं
तो स्वर्गीचा देव न कोणी
तुझाच बंधू त्या समजावें ॥ १ ॥

आजवरी नृपसुत होतों मी
मग्न राहिलों ऐषारामीं
परंतु आतां चतुर्थाश्रमीं
होउन भुवनीं हिंडत आहें ॥ २ ॥

कठिण सहा वर्षें घालविलीं
कीं मनुजांना धनांधकारीं
ज्योत दिसावी उजळविणारी
शोध घेत हा उत्कट भावें ॥ ३ ॥

खीर तुझी अमृतोपम घेतां
पूर्ण हरपली सर्व विकलता
सुभगे ! बल ये नवीन गात्रा
धर्मतत्व मिळवीन निश्चयें ॥ ४ ॥

प्रिय भगिनी ! मज सांग परंतू
सुखी जीवनीं अससी कां तू ?
प्रेम हाच का जीवितहेतू—"
सारें ज्यावर सुख स्थिरावे ? ॥ ५ ॥

( जाति – परिलिना )

| | | |
|---|---|---|
| " सर वर्षाची | भिजवुं शकेना | तप्त धरेला |
| महाभाग परि | तिनें फुलाचा | भरतो पेला |
| लहान हृदयीं | अल्प सौख्यही | पडतें कामा |
| पतिची मुद्रा | हास्य शिशूचें | ही सुखसीमा |
| प्रातःकाळीं | उठुनि खुडावीं | तुळसीपत्रें |
| घ्यावें प्रभुचे | नाम नि गावीं | संत चरित्रें |
| दासिजनांना | कामें सगळीं | वाटुनि द्यावीं |
| तोंच दुपारीं | पतिदेवाची | स्वारी यावी |
| झोप घेति ते | टेकवुनी शिर | मम अंकावर |
| वारा घालित | गुणगुणतें मी | ओव्या सुंदर |
| सायंकाळीं | उद्योगाचा | सरल्यावर दिन |
| जवळ उभी मी | राहुन त्यांना | वाढी जेवण |
| प्रभुदर्शन अन् | गोष्टी कांहीं | मित्रांसंगें |
| तोंच अंबरीं | तारा मंडळ | चमकूं लागे |
| सौख्य सागरीं | बालचिमुकलें | येइ अतां हें |
| सांगा स्वामी ! | दुःख कशाला | मग डोकावें ? |
| असेल कोठें | याहुन दुसरें | मधु नंदनवन ? |
| प्रेमानें अन् | कर्तव्यानें | सुफलित जीवन. " |

आणि सुजाता सांगी गोष्टी सिद्धार्थास महान
कथापुराणें ऐकुन ज्यांचें झालें तिजला ज्ञान

लोभ, वासना, हिंसा वाढवि विषवेलीची ताटी
सत्कार्यानें प्रेमळतेनें बहरा ये सुखशांति

मळे सुखाचे विपुल भोवतीं नाचत डोलत असतां
शोकांताची जाणिव ठेवी विवेकशील सुजाता

( जाति – उद्धव )

“ समजतें प्रभो ! मज पुरतें
सुख नसे सदाचें साथी
टेकीस तितिक्षा येते
होतांच सुखाची माती
जरि होऊं नये तें झालें
कधिं काळीं या बाळाचें
राहीन पाय धरुनी मी
माझिया जीवितेशाचे
माझ्या जर दुर्दैवानें
सौभाग्य हरपलें देवा !
मी चितेवरी आनंदें
जाईन चढूनी तेव्हां
लागतां चुडाच्या ज्वाळा
चढतील उंच आकाशीं
घेतील आपुल्या उदरीं
क्षणभंगुर या देहासीं
मी माझ्या हृदयामधुनी
हद्दपार केली भीति
जें योग्य दिसे तें करणें
हीच एक जीवनरीति
होणार उद्यां जें कांहीं
त्याच्यास्तव राहुन सिद्ध
भोगतें आज आलेलें
वाट्यास सौख्य सानंद ”

( गीत )

“ जा सुलोचने ! तूं धन्य धन्य
उपदेश खचित गे ! तव अनन्य ॥ ध्रु० ॥

साधेंभोळें तुझें निवेदन
ज्ञात्यांनाही दे नवदर्शन
काढिलास तूं स्वयेंच शोधुन
आनंद परम कर्तव्यजन्य १

माध्यान्हींच्या सत्य रवीची
झळ नच तुजला सोसायाची
छायेंतच गे वाढायाची
ही तुझी कोवळी वेल वन्य २

अजाणतां तूं प्रेमातिशयें
ज्ञान मिळविलें निर्मलहृदये !
सहज विहग घरट्यास जसा ये
मी तुझा भक्त, तूं मज शरण्य ३

अखंड तुज ही लाभो शांति
हीच मिळविण्या झटेन पुढती
तूं जगताची आशा स्फूर्ती
उपकार तुझे मजवरी अगण्य " ४

( जाति – साकी )

' सफल साधना होवो अपुली ' ऐसें वदुन सुजाता
बुद्धापुढती धरी चिमुकल्या बाळा जातां जातां
हसत करी तें पुढें चिमुकले अपुले चिमणे हात
जणुं मातेच्या आशिर्वादा मूक मनें दे साथ
तळमळणाऱ्या जगता ! आतां सोड आपुली चिंता
पहा उगवला बोधिवृक्ष हा पावन बुद्धाकरितां
दुःख सागरामधून कैसें मिळवावें निर्वाण ?
जन्ममृत्युच्या गांठी कैशा टाकाव्या तोडून ?
या तंत्राचा प्रभूला येथें होइल साक्षात्कार
बोधिवृक्ष हा कल्पांतावर राहिल हिरवागार.

वृक्षाजवळीं जातां गौतम सत्वर त्याच्या चरणीं
करी मखमली हरित तृणाची पखरण सादर धरणी
अरण्यातल्या अन्य तरूंनीं लववुनि अपुल्या शाखा
बुद्धासाठीं शीतल छायासवें निर्मिली रेखा !
सरितेचे निःश्वास जणूं ते वाहति वारे मंद
जलदेवांनीं कमलफुलांचा दिधला ज्यांस सुगंध.
गुहा सोडुनी चित्ता येई कापवीत पशुराज
क्रौर्य विसरूनी प्रभुवर क्षणभर दृष्टी स्थिरवी आज
वाऱ्यापरि तीं चपळ चहुकडे हिंडतात मृगबाळें
धीट होऊनी बघती बुद्धा लावुनि गहिरे डोळे.
सिद्धार्थांच्या सन्मानास्तव फणा उभारी नाग
फूलपाखरें जणूं ढाळिती चौऱ्या करूनी रांग
भक्ष्य टाकुनी प्रदक्षिणेच्या वाटेवर ये घार
फांदीवरती उभी राहिली चंचल चिमणी खार
सुतार आणिक कोकिळ गाती रंगुनि मधुर स्तोत्रें
कबूतरें हीं जमलीं होउनि हर्षित दर्शनमात्रें
आज मनोमन सर्व हर्षले प्राणी थोर लहान
वायू आणि धरित्री यांनीं मिळून गाइलें गान

( वृत्त – भुजंगप्रयात )

" तरूखालतीं ये उदाशा ! सुमित्रा !
जगाचा खरा तूंच उद्धारकर्ता
अहंता, कुशंका, भय, क्रोध, काम.
दिला यांस तूं वंदनीया ! विराम

जगाला सुखाचा दिसावा सुपंथ
म्हणूनी तुवां कष्ट केले अनंत
प्रभो ! बुद्ध तूं हें कळे सत्य आम्हा
इथे ये तरूखालती शाक्यसिंहा !

युगेच्या युगें वाट ज्या रे ! उषेची
अम्ही पाहिली तीच ये आज साची !
महन्मंगलाची उदेली घडी हीं
तुला गौतमा ! त्रस्त हें विश्व पाही."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७०८९९ दि. ...
वर्ग २०१० नों. दि. ३।१२।७८

(जाति–पादाकुलक)

काळोखाची घेउनी सुरी
रात्र हळू ये पृथ्वीवरतीं
सत्याच्या शोधार्थ खोलवर
जाउनि बसला निश्चल मुनिवर
तों पापाचा निर्दय नायक
प्रकटे तेथें मार अचानक
अरति, राग, भय, मोह नि तृष्णा
क्रोध, लोभ, अज्ञान वासना
या अपुल्या भीषण दळभारें
हल्ल्याचा दे मार इषारें
खडखडाट गडगडाट होई
बुद्धावरती करिति चढाई
जणूं नभाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या
करितील विजा गडगडणाऱ्या
मुळापासुनी तरु उखडतिल
ऐसा सों सों ये प्रलयानल
कुठें प्रकटती पानांमधुनी
काममत्त त्या लावण्यखनी
ऐश्वर्याचें कुठें प्रदर्शन
प्रणयाचें कुंजांतुन कूजन
घुमे कुशंका नास्तिक वाणी
मधेंच भेसूर वातावरणीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९५५८९
ग्रं. क्र.
शाखा

दिसो प्रकाश न सद्धर्माचा
निर्वाणाचा अन् सत्याचा
यास्तव ते माराचे सैनिक
फेकिति शस्त्रें भीषण नाजुक
परंतु मेरूपरी सुनिश्चल
राही गौतम प्रशांत निर्मल
अग्निपरीक्षा हो त्या रात्रीं
बुद्ध यशस्वी होय अखेरीं.

( जाति–साकी )

महापातकें दहा पातलीं ‘ माराचे सेनानी ’
‘ अहंभावना ’ त्यांत अग्रणी आली सरसावूनी
विश्वाच्या दर्पणीं पाहतें मुख अपुलें गर्वानें
‘ सारें भंगुर मी अजरामर ’ फुलें वृथा अभिमानें
सिद्धार्थाला बोले, “ होसी बुद्ध एकटा तूं ना ?
मग अंधारीं चाचपडूं दे जगीं इतर मनुजांना ”
शांतपणें मुनि बोले, “ तूझी उथळ पापमय माया
स्वतःवरी जे प्रेम करिति त्या खुशाल जा भुलवाया ”
नंतर दुसरा महा कुटिल ये माराचा सेनानी
संशयनामा अस्फुट बोले प्रभुच्या लागुन कानीं
“ अरे, सर्व हें जग तर मृगजळ, तुला न याची वार्ता
स्वतःच्याच छायेच्या मागें धावतोस सिद्धार्था !
जन्ममृत्युच्या चक्रगतीला कधींच नाहीं अंत
सकल जगाचा तिरस्कार हा एकच उत्तम पंथ
ऊठ सोडुनी देइ तपस्या ” ऐकुन हे व्याख्यान
वदे प्रभू “ जा भयद तुझ्यापरि शत्रु न मनुजा अन्य ”
सिद्धीलाही अशीच देई घालवुनी सिद्धार्थ
तोंच पुढें ये सिद्ध होउनी कामदेव बलवंत

( जाति–मालिवाला )

सुरांवर प्रभाव जो पाडी
लीलया असुरांना छेडी
वासना प्रजा असे ज्याची
आयुधें फुला-चांदण्याचीं
असा तो प्रकटे रतिनाथ
प्रभुपुढें हासत गालांत
विषारी प्रत्यंचा ओढी
मोहमय पुष्पवाण सोडी
वेढुनी मन्मथदेवाला
नाचती सुंदर मधुबाला
गळ्यांतुन येई अव्यक्त
प्रीतीचें अनुपम संगीत
ऐकण्या ती मधुरा वाणी
थबकली जणुं निशाराणी
अंबरीं चंद्र नि ग्रहगोल
थांबले श्रवण्या ते बोल
सोडलें सुख जें बुद्धानें
प्रशंसी त्यासच तें गाणें

( जाति–केशवकरणी )

" अधिक मनोहर मदालसेच्या गंधित वक्षाहुनी
असे का कांहीं या त्रिभुवनीं ?
रेखीव तिच्या तनुवेलीच्या मधुर स्पर्शामुळें
सुखाचें महाद्वार हो खुलें
न बोलतांही असे बोलका अनुपम तो अनुभव
तळमळे अंतर ज्याच्यास्तव

मर्त्य मानवा येइ देवपण स्वर्ग मिळे भूतला
लाभ हा उत्तम लाभांतला
पुनः पुनः ये लाट नवोनव मनुज्याच्या जीवनीं
होइ तो निर्माता अन् धनी
मृदुल बाहुच्या पाशीं असता कुठलें चिंताभय ?
जगाचा एका श्वासीं लय
एका उत्कट चुंबनांत तें सर्व विश्व गवसतें
याहुनी सौख्य दुजे कोणतें ?"

( जाति – साकी )

मोहक मुद्रा करुनि करांच्या गाती रमणी गीत
स्मित आल्हादक गालांवरती आणिक नयनीं प्रीत
अर्धस्फुट वेलीवर कलिका दाविति गहिरे रंग
परी ठेविती झाकुनि जैसें अपुलें आंतर अंग
तशाच त्या रमणीय नर्तकी लागति फेर धराया
कधीं अनावृत करिति झाकिती कधीं मुलामय काया
वृंदावरती वृंद तयांचा ये डौलानें पुढती
विलास असला सौंदर्याचा कुणि न पाहिला जगतीं
एकाहुन ती एक देखणी नृत्यकलेची राणी
किंचित् लाजुन समीप येउनि बोले अस्फुट वाणी
" तुझीच रे मी, ये मम अधरीं टेकव आपुले ओठ.
पहा ! मधुरतम यौवन कैसें महा गौतमा, नीट"
अजिंक्य अजुनी गौतम म्हणुनी कुपित कामदेवानें
शेवटचें ब्रह्मास्त्र फेकिले हा ! हा ! अतुल बलानें
झाल्या बाजुस सर्व नर्तकी–पडे प्रकाश अमूप
घेउनि नृत्यांगना कुणी ये यशोधरेचें रूप
भावावेगें विशाल नयनीं हो अश्रूंची गर्दी
आक्रंदन तें कोमल. रमणी भक्तीनें कर जोडी
" माझ्या रमणा ! तुझ्या वियोगें आले कंठीं प्राण

उदास वर्षें घालविलीं मी डोळे हे सुजवून
नाथ ! रोहिणी–तीरीं आपण घालविल्या मधुरात्रीं
याहुनि कुठलें सौख्य आपणा गवसे पृथ्वीवरती ?
ये सिद्धार्था ! पंचप्राणा ! आपल्या परत घराला
तव वक्षावर टेकविण्या शिर आतुर ही बघ बाला.
पहा ! अजुनि हें लावण्याचें टवटवीत उद्यान. "
बुद्ध वदे तिज करडया शब्दें सोडितां न स्वस्थान.
" माझ्या प्रियतम पत्नीचें तूं छान सजविलें सोंग
परंतु निष्फळ या अस्त्राचा मजवर वये ! प्रयोग
साऱ्या दुनियेपरीस तूंही असशी गे ! आभास
जा विनळुन तूं निज स्वरूपा " देई शाप तियेस
एक भयंकर वातावरणीं त्या नादे किंकाळी
वितळे वाफेवरि तो रमणीवृंद तिथें तात्काळीं

( वृत्त–उपजाति )

अंधारलेल्या गगनांतुनी तीं
पापें पुढें शब्द करीत येतीं
तो ' द्वेष ' सर्पापरि बाधणारा
फूत्कार सोडीत घुसे पुढारा

' लोकेषणा ' आणिक ' रूपराग '
अशांतिचा जे रचितात मार्ग
जखीण भीतिप्रद ती ' अविद्या '
बुद्धास ध्येयच्युत ये कराया

या पापमेळ्यास करीत साथ
असंख्य दुष्टाकृति येति तेथ
बेडौल बेडूक, विचित्र रीस
असे कुणी राक्षस अन् खवीस
त्यांचे पदाघात प्रचंड होती

त्यांच्यामुळें पर्वत कापताती
कक्षा सुटूनी पडतात तारा
भुंकून हैराण करीत वारा

( वृत्त–प्रहर्षिणी )

माराची भयद अशी बलाढ्य सेना
बुद्धाला विचलित ती करूं शकेना
नीतीचे तट भवतीं अभेद्य होते
दुष्टांना लव न मिळे प्रवेश तेथें

या साऱ्या प्रलयसमान संगरांत
होता तो प्रभुपरि बोधिवृक्ष शांत
न्हालेलीं शशिकिरणांत रम्य पर्णे
स्पर्शूं ना शकति जयांस मारसैन्यें

( जाति–साकी )

अखेर गेली दहादिशाला माराची ती सेना
दुधांत न्हाउनि चराचराला टाकी शीतल ज्योत्स्ना
सिद्धार्थाला प्राप्त जाहली ' संबुद्धी ' या समयीं
अंतःचक्षू जागृत होउनि गतकाला तो पाही
प्रदेश आपुल्या बघे पंचशत जन्मांचा मागील
दृष्टि टाकितो पर्वत शिखरावरुन जसा नर खोल
तळीं सुविस्तृत दरी मेखलेसम शोभे वनराई
सिद्धार्थानें कष्ट काढले अविश्रांत ज्या ठायीं
सावरला ज्या दरडीवरती जातां जातां तोल
दिसे सुभग ती आणि अलिकडे एक पठार विशाल
कठिण चढाया मुमुक्षूस जे सहाय संतत झटले
सद्गुण ते दशशील पथावर उमे राहिले दिसले
बुद्ध विभूच्या ध्यानीं आलें जन्ममृत्युचें चक्र

गत जन्मांतुन नव जन्माचा कसा फुटे अंकूर
या हातानें द्यावें दुसऱ्या हातीं स्वीकारावें
भल्याबुऱ्यांचें त्याच तऱ्हेनें परत दान मिळवावें
गुणदोषांचा हिशेब जन्मांतरांत ठरतो चोख
दुःख मिळे पाप्याला अन् सुख मिळवी पुण्यश्लोक
स्मृति, आकांक्षा, यशें, अपयशें, कर्में आणि विचार
हेंच पुराणें संचित दे नव जन्माला आकार
प्राप्त अभिज्ञा होतां वाढे अंतर्ज्ञान अपार
अपार विश्वें दिसलीं बुद्धा-दृश्य जगाबाहेर
अथांग सागर कुठेंहि ज्यातें शेवट वा न किनारा
मधुनि रुपेरी बेटाचा ये वरती रम्य फुलोरा
चाले भरती आणि ओहटी लाटा उचंबळोनी
सागर गर्जित घुमत चहुकडे राहे कोनाकानीं
असंख्य दिसल्या सूर्यमालिका अनंत आकाशांत
स्वतंत्र राहुनि अन्योन्यांना अखंड देती साथ
तेजोगोलापरी चालले सुरगण चक्राकार
जीवनदाते त्या बलवत्तर शक्तीचा आधार
विशाल पुढती पट उघडा तो कल्प महाकल्पांचा
कसा चक्रनेमिक्रम चाले दिसे जन्ममरणाचा
कसे गणाया समग्र येतिल गंगौघाचे बिंदू ?
कसा मापण्या पुरता येइल मानव—जीवन सिंधू ?
निळी कांतिमय क्षितिजें गौतम जाई ओलांडूनी
सार्वभौम त्या विराट् शक्तिचा परिचय त्याला होई
देवाचेंही नियमन करि जी राहुन मूक अदृश्य
घडण मोडणी हेंच मुख्यतः आहे जीचें कार्य
नीति हेंच सौंदर्य आणखी मूलतत्त्व तें सत्य
हाच नियम लावून करी ती या विश्वाचें राज्य
विश्व शक्तिचे नियम पाळिती सानथोर जे प्राणी
त्यांच्या जीवनपथीं उघडती शांतिसुखाच्या खाणी

लहान कीटक थोर ससाणा जाई जो नियमानें
दंवबिंदू वा संध्यातारक चमकति समतेजानें
त्यांच्या परि जो मानव जाई तत्त्वाच्या आधारें
लहानमोठ्या पीडित जीवा सेवी सदय विचारें

त्या मनुजाचें अखेर होतें जीवन उच्च कृतार्थ
या सत्याचा प्रत्यय घेई योगीश्वर सिद्धार्थ
आणि शेवटीं गौतमास हो ज्ञान दुःख सत्याचें
चार आर्य सत्यांत असे जें प्रथम तसेंच धुरेचें

दुःख ही असे नरजन्माची केवळ भीषण छाया
जन्म, प्रगती, ऱ्हास, प्रीती तिचीच सारी माया
अविद्येंतुनी सुटे तोच नर पावे याया शक्ति
उदास सौख्यें मोहक दुःखें या जाळ्यांतुन वरती

तृष्णेचा तर प्रभाव भारी देत भयंकर पीडा
प्रीती मत्ता, लौकिक सत्ता यांचा पडतो वेढा
नकळत घडती हातुन पापें कडू आणखी गोड
उपभोगानें उलट दुणावे आसक्तीची ओढ

ज्ञानी घेई करुनि आपुली तृष्णेमधुनी सुटका
मनिं बाणवुनी संसार तिचा सारा आहे लटका
अकुशल कर्में, लोभ परिग्रह यांस तिलांजलि देई
पूर्वसंचितें वाट्याला ये शांतपणें तें साही

वासनांस दे कधी न पोषण पुरविन त्यांचे कोड
रोड होउनी अखेर मरती हो त्यांचा बीमोड
पुनः न ये त्या जन्म आणि जर आला तरीहि त्यास
मागल्यापरी आयुष्याच्या ओझ्याचा ना त्रास

जीवन पथ संपेल, मुक्तता होइल चक्रांतून
जशी जागृती येते सरता एकादें दुःस्वप्न
अवर्ण्य शांती, अवर्ण्य तृप्ती अनघ स्थिर विश्रांति
देवनराधिपदुर्लभ पावे सुख तो निर्वाणांतीं

( वृत्त-उपजाति )

अहा ! मिळाला जय गौतमास
पूर्वेकडे तोंच दिसे प्रकाश
काळीं निशेची वसनें गळालीं
उषःप्रभेची पसरे झळाळी

प्रभाततारा फिकटून गेला
कांती चढे धूसर अंबराला
अद्यापि निद्रिस्तचि भूमिगोल
लागे दिसाया रविबिंब लाल

सूर्यप्रभा ती खुलवी हसून
एकेक बागेमधलें प्रसून
नवीन चैतन्य तयास येई
हळूं हळूं पूर्ण प्रफुल्ल होई

तृणावरूनी हिरव्या सुरेख
करी करांचा रवि रम्य सेक
अश्रू निशेचे गवतावरील
झाले अहा ! मौक्तिक, पाच, नील

चढे मुलामा नत वृक्षपर्णा
तरंगिणीच्या लहरी सुवर्णा
जे भासले भीषण मध्यरात्रीं
मेघांस त्या ये नव हेमकांति

घेऊन बाळें निजले कुशींत
ते सर्व पक्षी उठुनी खुशींत

गाती, " मुलांनो ! स्तवनें म्हणाया
उठा ! उदेला नभिं सूर्यराया "

कबूतरांनीं लडिवाळ रानीं
आरंभिलेल्या प्रेमकथा फिरूनी
कोकीळ, मैना शुक अन् कपोत
गातात उद्‌बोधन वृंद गीत

( जाति–साकी )

अहो ! केवढा सांगावा त्या प्रभाव दिव्य उषेचा
धर्मज्ञानासवें जाहला उदय त्या दिनीं जीचा
भवतींच्या सदनांत अनामिक पसरे शांति अपार
व्यवहारावर जी जगताच्या सुभग करी संस्कार
सुरा अपुला खाटिक देई अडगळींत फेकोनी
लूट मालका शर्विलकानें परत दिली नेवोनी
सावकार नच द्रव्य मोजतां एकहि वगळी नाणें
कठोर हृदयें सदय जाहलीं प्रभातिच्या जादूनें,
युद्धयमान दो भूपांमध्यें मैत्रीचा तह झाला
सोडुनि शय्या रुग्ण लागले सहर्ष नाचायला.
दिसूं लागलें स्मित तें मरत्या जीवांच्याही वदनीं
कळलें सकला प्रकाश येई पूर्वेच्या पलिकडुनी.
आणिक इकडे शेजेजवळीं बुद्धाच्या बसलेली
खिन्न विरहिणी यशोधरा ती मोदें पुलकित झाली
योग्यच–दैवी दुःखाचा त्या सुखांत शेवट व्हावा
दिव्य प्रेमावरी यशाचा कळस अखेर चढावा.
लोंढा सात्विक आनंदाचा टाकी भरुनि जगातें
मंजुळ गीतें गाऊं लागलीं सारीं भूतप्रेतें.
" होय सांगता " उच्च रवानें स्वर्गी देव म्हणालें

गगन ज्योती कथी द्विजांना अपूर्व कांहीं घडलें.
जंगलांत त्या दिनीं अहिंसक मंगलवृत्ति उदेली
हरिणबालकें वाघांभवतीं प्रेमें गोळा झालीं
गिरिशिखरावर उंच कोटरीं गरुडाच्या एकांतीं
ससे बागडत आले, न ढळे गरुडाची परि शांति
फडा आपुला उंच उभारुन डुलतो नाग उन्हांत
बेडुक अथवा भक्ष्य अन्य तें जवळुन जाऊं देत
नदी किनारीं बगळा राही चिंतनामधें मग्न
पायाखालीं मासे आले तरी न घेइ टिपून.
दुबळया पक्ष्यावरी ससाणा आज न मारी चोंच
हिंस्र प्राण्या वाटुं लागला हिंसेचा संकोच.
चराचरावर प्रभाव पडला प्रभुसाक्षात्काराचा
दिवसाहुनिही अधिक कांतिमान् प्रकाश वाठे साचा.

नंतर उठला बुद्ध शांतिधन, आनंदित, आरक्त
घन गंभीर स्वरें वदे तो तें अजरामर सूक्त.

( जाति–स्रग्विणी सारखी–चाल झंपा )

“ अमित जन्मालयीं कष्ट केले ।
ते अहा ! या क्षणीं सफल झाले ॥ ध्रु० ॥
उभवुनी वासना बंदिशाळा इथें
दुःख कारागिरें निर्मियेलें १
शिल्पकारास त्या धुंडिलें कितितरी
परि न संशोधनीं यश मिळालें २
शिल्पकारा परी, येसि आतां करीं
कोण तूं पूर्ण हें मज कळालें. ३
तापमय भिंति या फिरुनि बांधावया.
तुज न सामर्थ्य रे राहिलेलें ४


मोहरूपी छतें मृण्मय स्तंभ वा
शक्य कैसें तुला बांधणें रे ? ५

जीर्ण आढें फुटे भग्न गृह हो तुझें
ज्यास मायेमुळें रूप आलें. ६

यापुढें भूवरी मी सुरक्षितपणें
प्राप्त करण्यास निर्वाण चाले ७



# सर्ग ७ वा



( जाति–लीलारति )

या इकडे अपुल्या कपिलवस्तु पट्टणीं
शुद्धोदन नृपती दुःखित होता मनीं
जरि सहा संपुनी गेलीं संवत्सरें
दिसलें न सुताचें मुखमंडल गोजिरें
आणि ती व्याकुला यशोधरा विरहिणी
आटले अश्रुंचे जलधि जिच्या लोचनीं

वैधव्य भोगिते अहेवपणिं ती सती
हो उदास जीवन नसतां पति संगतीं.
येतात कधिं कुणी व्यापारी काफले
सांगती नृपाला वृत्त कुणी त्यांतले
'पाहिला एक कुणि तरुण परिव्राजक'
राजास वाटलें हें आशादायक.
धाडिलें नृपानें त्वरें दूत त्या स्थळीं
परि निराश होउनि आली ती मंडळी
दुसराच निघाला तो कोणी तापसी
कितिकदा निराशा भूपाची हो अशी !

तें यशोधरेचें हृदयरत्न अनुपम
ती वृद्ध नृपाची आशा सर्वोत्तम
तो कपिलवस्तुच्या गादीचा वारस
तें महाप्रजापति गौतमिचें पाडस
सिद्धार्थ कुठें तो हिंडे जगतावरी
विसरला घराला कीं दुःस्वप्नापरी
कीं समूळ त्याचें पालटलें अंतर
परि आप्तजनांची आशा बलवत्तर.

ऋतुराज एकदा आला धरणीवर
बहरला चहुकडे आंब्यावर मोहर
बागेंत आपुल्या पुष्करणीच्या तटीं
बैसली विरहिणी यशोधरा एकटी
कांठावर होतीं कमलदलें उमललीं
प्रतिबिंब बघे ती अपुलें निर्मल जलीं
बिंबले अधरकर कितीकदां पतिसवें
तो यशोधरेला मधुरकाल आठवे
ते शुष्क जाहले गुलाब गालांवर

डोळ्यांत आटले अश्रूंचे सागर
दुःखांत करपली ओठांची मोहिनी
वाळली किती ती शुभ्रवसनधारिणी
पतिवचन ऐकतां येई ज्यांना गति
आरक्त पद्दळें झालीं जड मंद तीं
किति दिवस लागली कचभारा नच फणी
अंगावर नव्हता एकहि फुटका मणि
ते नंदादीप प्रीतीचे मोहक
जणुं रजनीचे हो शांतिदूत तारक
झगमगे कांति ती दिवसाची ज्यांतुनी
आज ना राहिली सुषमा त्या लोचनीं
लावून कुठेंतरि दृष्टी वेदीपिशी
बैसते एकली वियोगिनी दिननिशी
बाळगी एक ती कंबरपट्टा करीं
मौक्तिकें मढविलीं भारी ज्याच्यावरी
ती सिद्धार्थाची एक मौल्यवान् स्मृति
उरिं धरुनि बैसते अहोरात्र ती सती
ज्या रात्रीं गेला गौतम सोडुन गृहा
तिज जवळ तधींचा असे अलंकार हा

( हे कठोर रजनी! प्रसविलीस जे दिन
मांडलें तयांनीं भीषण आक्रन्दन
कीं प्रीती इतकी खरोखरी निर्दय ?
कीं जीवनासवें तीहि पावते लय ? )
धरि दुसऱ्या हाता गोजिरवाण्या मुला
जणुं बुद्धप्रतिमा ऐशा त्या राहुला
तो वसंतवैभव पाही मातेसवें
आनंद सृष्टिचा मनामधें साठवे
ती पुष्करणीवर बाळाला घेउनी

कितिवेळ बैसली विचारांत गुंगुनी
चकचकीत मासे फिरती पाण्यामधीं
त्या तांदुळ टाकी राहुल तो चपलधी
वर निळ्या अंबरीं बलाकमाला फिरे
मारीत पंख ती चहूकडे संचरे
क्षणभरी लावुनी दृष्टी तिचियावरी
सावेग विरहिणी यशोधरा बोलली –

( वृत्त–देवप्रिया )

" हिंडतां हे पाखरांनो ! अंबरीं चोहीकडे
सांगतां का देव माझा कोणत्या ठायीं दडे ?
भेटतां सांगा तया मत्प्राण कंठीं दाटले
एक शब्द स्पर्श तूझा लाभण्या आसावले "

( जाति–लीलारति )

इतक्यांत नर्तकी धावत आल्या तिथें
देहावर ज्यांच्या यौवन ओसंडतें
आनंद कशाचा अपूर्व वदनावर !
त्या नाचुं लागल्या गान गात सुस्वर

( जाति–चंद्रकांत )

" जय युवराज्ञी ! ऐका आला क्षण मंगल आतां
पुरांत आले वणिक पाहिले ज्यांनीं सिद्धार्था ॥ ध्रु० ॥

समुद्रवसना पृथ्वीवरती ज्यांचा संचार
ठायीं ठायीं हिंडत आले करीत व्यापार
रत्नें, हस्तीदंत, दुकूलें, विहग रंगदार
या सर्वांहुन आज आणिली मोलाची वार्ता ॥ १

सांगतात ते, ' अम्ही पाहिला बुद्ध महाज्ञानी
जगन्मान्य तो नमलों आम्ही पवित्र तच्चरणीं
त्याच्या वचनामृतें खास ही वाचणार धरणी
करुणाघन तो मानवतेचा एकच हितकर्ता " २

पाप ताप फेडीत जगाचें बुद्धदेव जाय
याच दिशेला वळले आतां पावन ते पाय
महासतीची उग्र तपस्या निष्फळ हो काय ?
भेटणार तो अमुचा स्वामी अन् अपुला भर्ता " ३

( वृत्त–उपजाति )

ऐकून हें मंगल वृत्त साचें
उचंबळे रक्त यशोधरेचें
वसंत येतां हिम लुप्त होई
गंगा खळाळून जशी निघावी

यशोधरा हासुनि ती प्रसन्ना
सानंद सांगे मग नर्तकींना
" आणा त्वरें त्या वणिकांस येथें
अंतःपुरीं या मज भेटण्यातें

ऐकावया ती शुभकारि वार्ता
अधीर झाला मम जीव आतां
देईन रत्नें बहुमोल त्यास
नृपालही ज्यास्तव साभिलाष

जा, जा. मुलींनो ! आणि येथ आणा
त्या सर्व पांथस्थ वणिग्जनांना
तुम्हीहि द्यायास रहाच येथ
कृतज्ञ माझ्या हृदयास साथ "

निरोप त्या तत्पर बालिकांनीं
नेतांच ते सादर पावलांनीं
अंतःपुरीं सत्वर सर्व आले
ती राजलक्ष्मी निरखून धाले

पडे तयांच्या स्वर तोंच कानीं
सकंप जी कोमलकांत वाणी
अधीरता स्पष्ट दिसे तयांत
ऐकून ते मुग्ध अतीव होत

" वणिग्जनांनो ! तुम्हि धन्य झाला
पाहून माझ्या हृदयेश्वराला
तो बुद्ध, सन्मान्य त्रिखंडकीर्ति
त्याची तुम्ही पूजियली सुमूर्ति

आलांत लांवून दमून भारी
माझ्या मनाला नव ये उभारी
जाणा तुम्ही आप्तच या सतीचें
सांगाच त्या वृत्त महा यतीचें. "

( जाति–मेनका-पादाकुलक )

" रूप तें देखियलें या डोळां
युवराज्ञी ! जन असंख्य होती त्या भवतीं गोळा ॥ ध्रु० ॥

बोधिवृक्ष छायेंत जयानें
धर्म शोधिला उग्र तपानें
वाहुन जाय यदश्रुजलानें
दुःखाचा पाचोळा ॥ १ ॥

सम्राटाहुन वैभवशाली
श्रमी दलित दुनियेचा वाली

अमुचीं हृदयें ऐकुनि धालीं
त्या अमृतोपम बोला ॥ २ ॥

दिसली त्यातें धर्मज्योति
पाप दैन्य हें जिंकुनि अंतीं
उंच नेइ तो धरणीवरती
सत्याचा हिंदोळा ॥ ३ ॥

राणि ! तो अपुला प्राणेश्वर
करिल निजपदें पुनीत हें पुर
वर्षाची जेव्हां पहिली सर
भिजविल या भूगोला ॥ ४ ॥ "

( जाति–ली. र. )

मग यशोधरा त्या उत्सुकतेनें पुसे
" समजलें तुम्हा हें महापर्व हो कसें ? "
ते कथिती, " तेथिल ग्रामस्थानींच हें
कळविलें चहुकडे उत्साहें अतिशयें
ती महाभयंकर काळरात्र ये कशी !
फेकिलीं हत्यारें मारानें राक्षसी
त्यांतुनी सुरक्षित बुद्धदेव राहिला
उदयाचल शिखरीं जगदात्मा प्रकटला. '
सिद्धासन घालुनि बसलेली मूर्त ती
ती अपार शांती, अपार कांती, द्युति
पाहून तोषली भवतींची मंडळी
सर्वत्र लगोलग वार्ता ही पसरळी
साहून वादळें शंकांचीं सर्व तीं
उतरला सुरक्षित तो सत्याच्या तटीं
परि करुणाघन त्या भगवानाच्या मनीं
लागली सारखी एकच हो टोचणी

अनुरक्त सदा हो पापावर राहती
धावून वासना विषया आलिंगिती
तोडतां न येई मोहाची वागुरा
दृष्टी न टेविती सुविवेकाची जरा

जरि दार उघडिलें तरि न त्याकडे वळे
त्या विहगासम हे पंजरस्थ आंधळे
या ऐशा साऱ्या चुकलेल्या मानवा
पथ कसा दिसावा सद्धर्मांचा नवा ?

येथेच सोडुनी दुनियेचें चिंतन
जर गेला असतां एकटाच गौतम
तर आलें नसते जग पापातुन वरी
हें परम सुदैवें संकट टळलें परी.

( वृत्त—उपजाति )

तों नादली एक निगूढ वाणी
ओथंबलेली जणुं वेदनांनीं
" मी आणि माझी सगळी प्रजाही
हा हाय ! वेगें विलयास जाई "

जातां पळें चार पुनश्च झाला
गंभीर आवाज दहा दिशांला
" हे थोर सिद्धार्थ ! जगद्हितार्थ
तूं सांग तूझें नवें धर्मतत्व "

विनंति ही पीडित मेदिनीची
ऐकून सिद्धार्थ उठे तसाचि
बोले, " जगा धर्म कथीन सारा
ज्या पाहिजे घेइल तो निवारा "

( जाति—लीलारति )

संचार कराया निघे महान् तापसी
गाठली तयानें पुढती वाराणसी
भेटले मुमुक्षू पांच तया त्या स्थळीं
नव सत्याची त्या दीक्षा त्यानें दिली
भंगेल कशानें चक्र जन्ममृत्युचें ?
उघडेल कशानें द्वार स्वर्गभूमिचें ?

कृत्यावर अपुल्या दैवगती ठरतसे
नर नरक आपुला स्वतःच निर्मीतसे
नवदृष्टि देत ही उपदेशित गौतम
तापसी, मुमुक्षू, नृप भाविक बहुजन

पसरतां हळुहळू ओसाडित कालवे
बहरले फुलांचे चहुकडे ताटवे
संयमी, वासनायुक्त धर्मसत्तर
धाडले प्रभूनें साठ असे मुनिवर

मग आला जेथें बिंबिसार भूपती
लावून बैसला दृष्टी गौतमपथीं
खळखळती निर्झर, राया आल्हादक
त्या वेणुवनामधिं येइ धर्मनायक

सप्रेम नृपाला त्यानें आलिंगिलें
त्या नव धर्माचें गुह्य प्रतिपादिलें
बुद्धास वेणुवन भूपालें अर्पिलें
दररोज जनांचे थवे जमूं लागले

प्रभू सांगे महिमा करुणेचा प्रीतिचा
सुस्पष्ट दाखवी पथ जीवननीतिचा
करितांच विभूनें बोधाचें सिंचन
हो कृतार्थ नृपती करुनी अभिनंदन

बोलला आजचा आनंदाचा क्षण
ठेवीन यापरी पाषाणीं कोरुन

( वृत्त–उपजाति )

" आरंभ कैसा जगिं जीवनाचा ?
आधार त्याला मिळतो कशाचा ?
अद्यापि जें गूढ असें रहस्य
तथागतानें कथिलें अम्हांस "

( जाति–लीलारति )

त्या वेणुवनामधिं बुद्धाचीं प्रवचनें
ऐकून हरखलीं असंख्य व्याकुळ मनें
अनुकरण करुनी बुद्धाचे कितितरी
चढवितात पिवळीं वस्त्रें अंगावरी

( जाति–दोहा )

" पापानें वाढत जाई डोक्यावर ऋणभार
सत्कृत्यानें मनुजाचा अखेर तो उद्धार
अकुशल कर्में टाळा अन् कुशलाला द्या साथ
स्वतःवरी प्रभुता मिळवा हाच खरा सत्पंथ "

( जाति–लीलागति )

ही गाथा म्हणुनी भरतवाक्य गौतम
चालवी पुनरपी उपदेशाचा क्रम
सांगती वणिग्जन यापरि सारी कथा
किति महासतीची वर्णावी धन्यता !
उत्साह उसळला कपिलवस्तुपट्टणीं
शुद्धोदन राजा झाला हर्षित मनीं
उमराव आपुले झाडी बुद्धाकडे
त्यासवें आपला प्रेमळ संदेश दे

( वृत्त–देवप्रिया )

" मृत्युजवळीं चाललों मी सात वर्षें जाहलीं
बाळ ! तूंनें भेटण्याची आस नाहीं खंगली
बुद्धदेवा ! येइ वेगें वाट सारे पाहती
वृद्ध नेत्रा या दिसूं दे मूर्त तूझी गोमटी "

( जाति–ली. र. )

किति वियोगिनीची वर्णावी अधिरता !
पाठवी आंपुले शिलेदार ती स्वतः
हृदयाचें ओतून रक्त विनंती करी
कीं सिद्धार्थानें परतुनि यावें घरीं

( जाति–उद्धव )

" मी करी प्रतीक्षा अपुली
कुमुदिनी जशी चंद्राची
मीलनास आतुर झाली
राणी या प्रासादाची
रमणीच्या मृदुल पदांनीं
उमलणार आपण केंव्हां
हुरहूर अशोककळ्यांची
ही अनुभवतें मी देवा !
जें गमाविलें त्याहूनी
किति अधिक तुम्ही मिळवियलें
सहभागी राहुल अन् मी
व्हावयास फार आतुरलें "

( जाति–लीलारति )

परि नवल वर्तलें काय अहो ! तत्वतां
नृपदूत सर्व हे वेणुवनीं पोचतां

ती प्रसन्नमूर्ती पाहुनि ते भारले
कर्तव्य आपुलें पुरेपुर विसरले
त्या पवित्र ओठांतुनी निघे झरझरा
संदेश शांतिचा, उपदेशाचा झरा
तें स्फूर्तिप्रद वच निर्मल करुणामय
ऐकून जाहले सारे ते तन्मय
गवसता मधाचा सांठा पुष्पामधीं
तो दंग होउनी भृङ्ग गमे निरवधि
मग पडो निशेचा पडदा जगतावरी
येवोत मंद वा पर्जन्याच्या सरी
त्यापरी सर्व ते मंत्रमुग्ध होऊनी
नृपदूत बैसले बुद्धांच्या प्रवचनीं
घेऊन काम तें कुठचें आलों इथें
राहिलें कुणाला याविषयीं भान तें !
शेवटीं नृपानें वाट पाहुनी पुनः
धाडला प्रभूचा बालमित्र शहाणा
होवो न आपली स्थिति नृपदूतासम
तो श्रवणीं म्हणूनी घाली आच्छादन
यामुळेंच वेधक बुद्धाचें भाषण
पोचलें न त्याच्या श्रवणावर जाउन
तो बुद्धाजवळी जाउनिया पोचला
संदेश नृपाचा बुद्धाला कळविला

( गीत )

" मित्रा ! त्वरें सांग दयितेस पितयास
मी राजधानीस येणार रे ! खास ॥ ध्रु० ॥

ज्यांच्यामुळें प्राप्त हा मानवी जन्म
( हो शक्य ज्यांतून भवमुक्ति मनुजास )

माता पिता वंद्य, ते देवतातुल्य
स्पर्शावया अधिर मीं तत्पद्‌युगास ”

( वृत्त–उपजाति )

सिद्धार्थ येणार बहू दिसांनीं
म्हणून हो हर्षित राजधानी
प्रचंड तो मंडप एक खास
उभारताती जन दक्षिणेस

आरास खांबावरती फुलांची
चोहीकडे झालर रेशमाची
जरतारिची काढुनि वेलबुट्टी
सर्वत्र त्या ओढियल्या कनाती

शिंपून सर्वत्र सडे सुगंधी
ध्वजापताका चढवून सौधीं
पुरी जनांनीं शुभरम्य केली
समीप वाटे जणु ये दिवाळी

दांतांवरी टोपण सोनियाचें
हौदे जयांच्या वरती रुप्याचे
मेघापरी भव्य नि कृष्ण अंग
अनेक ऐसे झुलती मतंग

“ सिद्धार्थ आला, युवराज आला
सुसज्ज का रे झणिं स्वागताला ”
करावया उच्च रवें पुकारा
तयार ठेला करुनी नगारा

नृत्यांगनांनीं सुमनें सुगंधी
सर्वत्र द्यावी उधळून मार्गीं
येतांच सिद्धार्थ तदीय वाजी
बुडून जावा सुमराशिमाजीं

चाले तयारी अशि दीसरात्र
‘ पुरांत आला प्रिय राजपुत्र ’
हें ऐकण्या आणुनि जीव कार्नीं
ते तिष्ठताती जन कोनकोनीं

( जाति – ली. र. )

अवगुंठित मेण्यांतुन ये वेशीवर
मीलनोत्कंठिता यशोधरा सत्वर
स्वागतार्थ जेथें निळया टेकुनी नभा
शोभिवंत सुंदर मंडप होता उभा
रमणीय फुलांचे एकिकडे ताटवे
ज्यांवरी गुंजती भृंगाचे ते थवे
भिंती नि कमानी पानांच्या शोभल्या
सर्वत्र हिरवळी भवतालीं पसरल्या
दुसऱ्याच बाजुला गरिबांच्या झोपड्या
त्या चंद्रमोळी अन् निवाऱ्यास थोकड्या
स्पर्शहीं जयांचा नको द्विजा, क्षत्रिया
ही अशी उपेक्षित दुनिया बाजूस या !
परि याहि जनांच्या उचंबळति भावना
उत्कंठित होती बुद्धाच्या दर्शना
कुणि भल्या पहाटे उठुनी तत्परपणें
तरुशिरीं बैसले लावुनिया लोचनें.
कधिं मंदिरांतल्या घंटा त्या नादती
कधिं दूर कुटेंतरि झडताती नौबती

कीं होय आगमन सिद्धार्थाचें असें
वाटून समुत्सुक जनसागर तो फसे
झाडिती नागरिक राजमार्ग पुनरपी
चढविती फिरूनी नवपणें महिरपी
गातात विभूचीं स्तोत्रें तालावरी
पथिकांस पुसति ते बुद्ध येई कुठवरी
हें पहात होती साभिमान विरहिणी
ये उत्सुकतेचें उधाण उसळुनि मनीं
दृष्टीस पडे तो एक मुनी बाजूला
साश्चर्य पाहते युवराज्ञी त्याजला

( वृत्त–अश्वधाटी )

तेजाळ तें वदन ते आर्जवी नयन आकर्षिती जनमना
वाटे अहा ! प्रकट होई उदात्तरस घेऊन थोर करुणा
प्रेमें दिशा भरत पीतांबरें फिकट घेई कमंडलु करीं
' हा कोण दिव्य मुनि ? ' उद्गारती नमुनि मोठे लहान नगरीं

कांती, कृपा भवति फेकीत जाय यति तो संथ घेत सदनें
त्या मागुती विनत दो शिष्य ते फिरत लेवून पीत वसनें
त्या साधुला सकल धावूनिया विपुल भिक्षा समर्पिति पथीं
देवावतार जणुं कां हा मुनी न म्हणुं ? साश्चर्य लोक वदती

त्या मंडपा निकट येतां मुनीन्द्र पट तो रेशमी उचलुनी
वेगें पडे विरहभग्ना सती अहह ! येऊन बुद्धचरणीं
" सिद्धार्थ ! नाथ ! पतिदेव ! प्रभो !" म्हणत अस्पष्ट उत्कट परी
नेत्रीं असूं झरत, हो कंठ सद्गदित आनंदली सहचरी

( जाति–ली. र. )

बुद्धास एकदा पुढती कोणी पुसे
' आलिंगन सतिचें प्रभूस रुचलें कसें

जिंकून काम जो वीतराग जाहला
रमणीचा त्यानें स्पर्श कसा साहिला ? '
मुनिवर्य यावरी देई प्रत्युत्तर
" तळमळल्या प्राण्या ने मुक्तात्मा वर
योजुनी मधुरता, आर्जव हीं साधनें
इतरांस विदेही जीवें उद्धारणें
किति युगें लोटलीं एका जन्मामधीं
त्या निश्चय पर्वां, बोधिसत्त्व मी सुधी
ही कोमलकलिका यशोधरा संगतीं
मी रहात होतों खालीं सागरतटीं
सोडून एकदा दयिता ही सुंदर
लंकेस जाय मी होऊनि सौदागर
परतलों घेउनी एक अमोलिक हिरा
परि भयद अवकळा आली होती घरा !
ग्रासली चहुकडे दुष्काळानें मही
कण एकहि नव्हता धान्याचा मम गृहीं
डोळयांत सतीचें प्राण हाय ! थांबले
तीं मोजित पडली होती घटकापळें
तात्काळ रत्न तें अनर्घ्य मी वेचिलें
विनिमयांत त्याच्या धान्य शेर घेतलें
त्या क्षीण लोचनीं फुलले तेजःकर
" किति नाथा ! अपुलें प्रेम अहा ! मजवर ! "
जी तिला देणगी मोलाची वाटली
मी आज देत त्या तुलनेनें धाकुली
हा कुठें जलनिधी, तें तर निर्झर जळ
परि मुक्तात्म्यांनीं अशीच नवसाधका
हळूहळू मुक्तिची दावावी वीथिका
होऊन वासनाशून्य मुमुक्षूजना
वर्पुनी कृपाजळ शिकवावी साधना "

( वृत्त–उपजाति )

जेव्हां कळे हें नृपतीस वृत्त
घेऊन आला यतिवेष पुत्र
हो क्रुद्ध तो वृद्ध नृपाळ खिन्न
वात्सल्य लोपे हृदयांमधून

दाढी स्वतःची उपटी रुपेरी
रागें पदाघात करीत भारी
बघून त्याचा अनिवार कोप
सुटे सभोतीं सकलांस कंप

घोड्यापरी स्वार नृपाळ झाला
सक्रोध दे टांच तुरंगमाला
तीरापरी जाय जनांमधून
ये भूप याचें न कुणास भान.

क्षणोक्षणीं वाढत लोकयात्रा
आनंद आश्चर्य मनुष्यमात्रा
वेडावलेल्या जनसागराचा
वेढा पडे बुद्धविभूस साचा

दयार्णवाच्या अगदीं समीप
तो क्रुद्ध शुद्धोदन येइ भूप
सौजन्य ओसंडत लोचनांत
असा प्रभू तो जनका पहात

अंगार तो अंतरिंचा निमाला
सप्रेम पाही नृप आत्मजाला
पृथ्वींत ज्याची तुलना ना कोणा
आणी असें वैभव बुद्धराणा

ज्या वैभवानें दिपले समस्त
असंख्य झाले अवनम्र भक्त.
हें दृश्य पाहून अपूर्व भारी
बुद्धास शुद्धोदन हें विचारी.

( जाति – मेनका )

“ कां मुला, लेवुनि यतिवेष
येसी भिक्षापात्र घेउनी उतरवुनी केश ?
धरित्री ज्यांच्या करकमलीं
अशा प्रतापी वडिलांच्या तूं घेसी जन्म कुळीं
तळपती भाले तलवारी
थयथयती हय, अशी न कां तव परतावी स्वारी ?
खडीं हीं सैन्यें मैदानीं
वेशीवरती उभे नागरिक उत्सुक नयनांनीं
ठेवुनी कष्टी जनकास
सात भयानक वर्षं हिंडत कुठें राहिलास ?
तुझी ही वियोगिनी भार्या
राही संन्यासिनीसारखी त्यजुन सुखा साऱ्या
कधीं नच केला शृंगार
वाद्यावरचा तिनें ऐकला एक न झंकार
आज परि वस्त्राभरणांनीं
सजुनि तुझ्या ती स्वागतास ये साध्वी युवराज्ञी
आणि तूं होऊनि संन्यासी
भिक्षा मागत दारोदारीं येथें आलासी !
आपुल्या प्रथित राजवंशीं
कुणी न चोखाळिले आजवर असल्या मार्गासी
साधिला कसला पुरुषार्थ
सांग सांग सिद्धार्थ ! निवावि या पितया दुःखार्त ”

( जाति–उद्धव )-

“ जे बुद्ध आजवर झाले होतील तसेंच पुढेंही
मी त्याच मालिकेंमधला होऊनिया येत विदेही
संन्यस्त सुताला भूपें वेशीवर घेण्या जावें
हें पूर्वीं घडलें होतें तें आज फिरुनि घडताहे
करुणेनें, आत्मजयानें जो सम्राटाहुन थोर
तो ऋण फेडाया आला परतुनी आपुला पोर
मी घोर तपश्चर्येनें मिळविली ठेव जी कांहीं
ठेवितों पुढें ती ताता ! प्रेमानें स्वीकारावी ”

( वृत्त–उपजाति )

संतोपुनी भूप पुसे सुतासी
‘ ही ठेव बाळा ! वद रे कशाची ? ’
हातीं पित्याचा कर घेइ बुद्ध
सांगे स्वतःचा उपदेश शुद्ध


“ तीं आर्यसत्यें जणूं चार वेला
चौबाजुंला ज्ञानजलाशयाला
तो मार्ग अष्टांगिक मोक्षदायी
भंगून ज्यानें भवचक्र जाई

हा रावरंका, पुरुषस्त्रियांस
ज्ञान्यांस तैसाच निरक्षरांस
कल्याणकारी पथ एकजाणा. ”
असें नृपा सांगत शाक्य राणा

चाले नृपामागुन कोमलांगी
सिद्धार्थ तो शोभत मध्यभागीं

ती लोकयात्रा कमनीय थोर
ये राज्यवाड्याजवळीं अखेर

सुकून अश्रू फुलला प्रकाश
प्रसन्न झाली सति सावकाश
तों यामिनी मंद पदेंच येत
ओसंडली शांति दहादिशांत—



# सर्ग ८ वा

( छंद–अनुष्टुभ )

वाराणशी–पुरीहूनी–ईशान्य–पथिं चालता
पायथ्याशीं हिमाद्रीच्या लागे नगर पोचतां
बर्फाच्छादित शृंगें तीं चढतीं नील अंबरीं
पाचूचीं हिरवीं रानें चहुबाजूंस त्यांवरी
बारमास झळाळे ती हरित्कांति मनोहर
प्रसन्नता तिला देती धावते शुभ्र निर्झर
मंद निश्वास संध्येचा तिथें मधुर दर्वळे
पवित्रता नि शांती त्या स्थळीं अद्यापि आढळे
तांबूस शिल्प त्या जागीं पुराणें वृक्ष भोवतीं
हालत्या झालरी ऐसे लतापल्लव शोभती
भग्न लाक्षागृहीं केव्हां भुजंगमच येउनी
वक्राकार करी काया कोपऱ्यामधिं बैसुनी
मागें थोर नरेशाची होती वर्दळ जीवरी
सरडा आज धावे त्या भूवरी संगमर्मरी
जंबूक लपतो कोठें भंगलेल्या नृपासनीं
कुठें अशुभ गृध्राचा घुबडाचा कटु ध्वनि
मात्र पर्वतशृंगें तीं, राया सुभग निर्झर
पूर्वींपरिस अद्यापि असतीं अतिसुंदर
इथेंच बुद्धदेवानें पाहुनी मंगलक्षण
आपुल्या धर्मतत्त्वाचें केलें साग्र निरूपण

रम्य पुष्करिणी तेथें कारंजीं उंच नाचती
शोभा ती राजवाड्याची डौलानें तट पाहती
हिरव्यागार कुंजांना फुलांचे गुच्छ लोंबती
गूढ अस्पष्ट त्या ठायीं पक्ष्यांचें स्वर नादती
त्या मनोरम उद्यानीं मध्यें उच्चासनावरीं
भक्तपूजित तो ज्ञानी शोभे दिव्य रवीपरी
उपदेशामृतासाठीं श्रवणीं प्राण आणुनी
हजारो बैसले श्रोते येउनी लांबलांबुनी
नृपाळाच्या सभेंतालीं शाक्यांतील महाजन
आनंद देवदत्तादि मागुती मोग्गलायन
सारिपुत्त महाभक्त शेकडों शिष्य, साधक
लेवुनी पिवळीं वस्त्रें तिष्ठतात समुत्सुक
बाल राहुल बुद्धाच्या चरणांजवळीं बसे
अनिमित्त हसे त्याच्या वदनांवर गोडसें
सौम्य सात्त्विक तातातें पाही सभय सादर
यशोधरा तरंगे ती आनंदलहरींवर
वासनामुक्त झालेली प्रीति हो अजरामर
साक्षात्कार असा झाला सरली रात्र भेसुर
पीत वस्त्र मुनीन्द्राचें आदरें वेष्ठुनी करा
आपुल्या पल्लवा त्याची गांठ मारी यशोधरा
तीनही जगताचें जो करील अघनाशन
तोच एक जगत् तीचें एकमेवचि जीवन.
धर्मसंवाद ऐकाया देव आतुर होउनी
बैसले येउनी सारे स्वर्गीच्या खिडक्यांतुनी
गुलाबी पर्वतशृंगीं माध्यान्ह दिसते नभीं
रात्र येऊन कुंजाच्या आडोशास असे उभी
संध्याराणी उभी मध्यें लाजऱ्या युवतीपरी
स्वर्गीय प्रेमवेडी ती समुत्सुक दिसे परी

वाढतें तप रात्रीचें तिची चंद्रकळा निकी
हिंडती खंड मेघांचे काळ्या केशकलापकीं
तारकांचे हिरेमोतीं अलंकार चकाकती
बिंदी भाळीं शशांकांची संध्येची वाढवी द्युती
निःश्वासाच्या तिच्या भोतीं गंध कोमल दर्वळे
आणि आतां प्रभू सांगे धर्मकीर्तन आपुलें,
मनुष्येतर जीवांही प्रभूचें प्रेम आकळे
धीर येउनि त्या ठायीं प्राणी ते सर्व पातले
धीरगंभीर आवाजें सांगूं लागे महामुनी
अद्यापि ज्या सुशब्दांचे उठतात प्रतिध्वनी

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

“सृष्टीचा बुधहो ! तुम्ही समजुनी घ्या चक्रनेमिक्रम
आहे जीवनवाहिनी बदलती, स्थित्यंतरें कायम.
पाण्याचे बनती पयोद, फिरुनी येतात ते भूवर
जाऊनी मिळतात सागरजलीं अंतीं नद्या निर्झर

अंधारास कधीं प्रकाश करणें हें शक्य होईच ना
यासाठीं मम बंधूनो ! नच करा कोणाचिही प्रार्थना
आधीं जीं तुमचीं मनें विकल त्या पीडा न द्या आणखी
दानें आणि उपायनें सुरगणा सारेंच हें व्यर्थ कीं

तोडावें भवचक्र कायम कसें ! याचें करा चिंतन.
इंद्राहून मिळेल उच्च तर तें तुम्हांस सिंहासन—
आहां शुद्ध तुम्ही मुळांत, झटका जी धूळ आहे वरी
अभ्यासें शकतां चढूं वरिवरी एकेक ती पायरी

विश्वाच्या करिते सदा नियमना अदृश्य शक्ती कुणी
तारामंडळ चालवी, उमलवी बीजांस भूमींतुनी

देई चित्रविचित्र रंग मयुरा, पानां, फुलां, अंबुदा
सृष्टीच्या उदरांत ठेवि भरुनी नानापरी संपदा

विद्युत्, पाउस, आणि वायु सगळे त्या शक्तिचे सेवक
घ्या जाणून पुरे तिचे नियम जे सौख्यास संप्रेरक
धर्माचें अविभाज्य मूळ करुणा जी शांति दे शेवटीं.
ती योगें भवचक्र भंगुनि मिळे दुःखापदांना गति

दुःखाश्रूंमधिं बंधुच्या मिळविलीं मीं आपुलीं आसवें
पाहूनी जगतावरील विपदा मच्चित्त शोकें द्रवे
आतां मी परि हासतों, हरखतों, बुद्धत्व संपादतां
माझ्या पीडित बंधुनो ! हृदयिंची झाडून टाका व्यथा—

जें पेराल तुम्ही, तरारुन पिकें त्याचींच येतील तीं
जें जें संचित त्यापरीच तुमच्या ये जीवना आकृति
कौशल्यें करुनी मशागत तणं जो टाकितो काढुनी
लाभे पीक अमाप त्यास, सुफला होते तया मेदिनी

साही जो भवताप शांतहृदयें, क्रोधा पडे ना बळी
प्रेमाची करि वृष्टि शत्रुवरती जो संयमी आर्जवी
न्यायी, प्रेमळ सत्यनिष्ठ करितो जो वासनाखंडन
तो निर्वाणपदास जाय जगुनी साधें सुखी जीवन.

मी जो मध्यम मार्ग सांगत तुम्हा तो नीट घ्या जाणुनी
सत्वें चार तशींच नेतिल तुम्हा शोकाब्धि ओलांडुनी
कर्मानें अपुल्या गती ठरतसें वाईट वा चांगली
बंधूनो ! बिनतोड एकच असे सिद्धांत हा भूतळीं.

आहे ‘ दुःख ’चि आर्यसत्य पहिलें जें भाजतें पोळतें
जन्मापासुन राहतें बिलगुनी मृत्यूसवें संपतें.

प्रीती रम्य असेल देत मनुजा स्वर्गांतली माधुरी
अंतीं त्या शरिरास भस्म करिती ज्वाळा चितेच्या परी !

आप्ताच्या मरणें उदास बनले, जे व्याधिनें गांजले.
काठी टेंकित वाकुनि थकुनि जे कष्टे पथीं चालले
त्यांना ' जीवन काय सुंदर असे ? ' हा प्रश्न केला तुम्ही
औदास्यें कथितील " येथ न दुजें दुःखाविणा कांहिंही "

आतां सांगत आर्यसत्य दुसरें ' तृष्णा ', महानाशिनी
दुःखा भीषण आदिकारण असे ही डाकिणी, शंखिनी
जीवाभोवतिं वागुरा पसरते, मोहामधें पाडिते
जन्मा घालुनिया पुनः पुनरपी दुःखापदा निर्मिते

आहे ' दुःखनिरोध,' सत्य तिसरें आशा निराशेंतली
ज्या योगें दिसतो प्रकाश तिमिरीं कैवल्य येतें करीं.
चौथें सत्य अमोघ केवळ असे तो मार्ग अष्टांग कीं
जो निर्वाणपदास नेउन नरा लावी तनू सार्थकीं.

संकल्प, व्यवसाय, चिंतन, गिरा, आचार, सम्यक् कृति
सम्यक् यत्न तशी समाधि—असतीं अष्ट व्रतें या पथीं
या मार्गांमधुनी प्रवास करतां शक्तीप्रमाणें तुम्ही
पल्ला संतत एक एक पुढचा गांठाल तो प्रत्यहीं

ना द्वेषासम दुःख, दाह करिती अग्नीपरी वासना
अभ्यासें समजून घ्या सकल हें सोडा अहंभावना
आला शाश्वत धर्म घेउनि नवें सौंदर्य, मुक्ती जना
या संघांत शिरा कराच " शरणं गच्छामि" ही घोषणा

तृष्णा तप्त करावया खळखळा जाती इथें निर्झर
मोदाचीं फुललीं चिरंतन फुलें सर्वत्र मार्गावर

प्रक्षाळा करुणाजळांत हृदयें, व्हा बांधवांनो ! सुखी
देवांना तुमचा खरोखर उद्यां हेवाच वाटेल कीं

( जाति-दयिता )

अगदीं क्षुद्र जिवाचीही नका करूं हो हत्या
असेल जीव न जाणों तो चालत मंगलपंथा
मुक्त करें द्यावें कोणा घ्यावें कोणाकडुनी
मात्र कुणाचें धन नच घ्या सक्ती, कपट करूनी
खोटी साक्ष, असत्य वचें परनिंदा टाळावी
सत्य वचन हें अंतरिच्या पावित्र्याची ग्वाही
मादक पेयांपासूनी रहा सर्वदा दूरी
शुद्ध मनाला, देहाला सोमाची न जरूरी
मुमुक्षुनें ना केव्हांही परललना स्पर्शावी
अधर्म्य कृत्यें कायेचीं समूळ वर्ज्य करावीं
माझें हें अनुशासन जो श्रद्धापूर्वक पाळी
अक्षय त्याला जन्मभरी सौख्याचीच दिवाळी
जन्ममृत्युच्या चक्राची धाव सर्व भंगूनी
अपार संवित्सुखाब्धिला जाइल तो मिसळूनी. "

( छंद-अनुष्टुभ् )

अपूर्व बुद्धदेवाचें धर्मकीर्तन यापरी
ऐकून सगळीं गेलीं भारावूनचि अंतरीं
शुद्धोदन उभा राही करी पुत्रास वंदन
" बाळा ! घेई तुझ्या पंथीं सर्वांत क्षुद्र हा जन "
हर्षनिर्भर झालेली बुद्धा बोले यशोधरा
" आपुला वारसा द्यावा राहुला जीवितेश्वरा ! "
तिघेही गौतमाचे ते सोयरे निकटांतले
प्रभावी बौद्धधर्माचे नवदीक्षित जाहले.

कथा येथेंच बुद्धाची संपली रोमहर्षण
तथागत–पदीं माझें कृतज्ञ अभिनंदन
आम्हांस देइ तो प्रीति म्हणूनी भक्ति त्यावरी
वर्णाया थोरवी त्याची घेइ मी लेखणी करीं
गंगाजळें करावें कीं, गंगेचें जेविं पूजन
प्रभुच्या वचनाधारें केलें सर्व निरूपण
पंचेचाळीस वर्षें तो संचार करुनी पुढें
सर्वत्र उपदेशाचें घाली शाक्यमुनी सडे
आशियाच्या प्रकाशें या सारें जगत व्यापिलें
उणावलें अजूनी ना किंचितही तेज त्यांतलें
दिव्यसंदेश बुद्धाचा सम्राटांनीं परोपरी
ठेविला स्पष्ट कोरूनी लेण्यांत खडकांवरी
उद्धरीते कृपा ज्याची कोटिकोटी श्रमीजन
कोण त्याचें करूं जाणे यथार्थ गुणवर्णन—

( छंद ओवी )

हे बुद्ध प्रभो ! तारका !
त्रिजगसमुद्धारका !
या क्षीण काव्यलेखा
क्षमा कीजे

देवा ! तुझी उत्तुंगप्रीति
धीटपणें मापाया ती
धावे माझी अल्पमति
प्रमाद मोठा

जयजयाजी ! प्रियकरा !
मार्गदर्शका ! बंधुवरा !
अज्ञान ध्वान्तहरा !
धर्मदीपा

तुझ्या नामीं तुझ्या पायीं
तुझ्या कल्याणधर्मांठायीं
तुझ्या आज्ञेकडे जाई
आश्रया मी

येई सहस्रकरा ! वरी
हिम हें कमलपत्रीं
उचलोनी टाक सत्वरीं
लाटेमाजीं.

ॐ मणिपद्मे हुम् बोला
मरीचिमाली उदेला
तेजःसमुद्रीं बुडाला
दंवबिंदु.



# पुरस्कार आणि आशीर्वाद

[ गुरु. न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांच्या आशीर्वादपूर्वक पुरस्काराने ग्रंथाला विशेष शोभा आली आहे. मजकूर उशीरा हातीं आल्यानें ग्रंथाचे शेवटीं टाकावा लागला आहे, पण जाणत्यांनी हा अर्थगर्भ पुरस्कार वाचून पुनः काव्यवाचन केल्यास त्यांना काव्याचें रसग्रहण विशेष उत्कटतेनें करतां येईल. ]

( १ )

नंदनवनींच्या पारिजात पुष्पांची हळुवार वर्षा, प्रशांत मरकत मण्यांची आकाशांतून सहज स्रवलेली पखरण, हिरकण्यांनीं जडविलेली मुक्तामाला, स्वतः सुंदरतेनेंच घडविलेली एक नक्षत्रपंक्ति !

— असे सहजोद्गार, या काव्यसंभाराच्या अवलोकनानें माझ्या मनांत प्रकटले !

येथें पारिजातकाचें पावित्र्य आहे पाचूंची, मरकत-मण्यांची शान्ति प्रद शीतलता आहे. हिरकण्यांची चमकदार तेजस्विता आहे, मुक्तामालेची मोहकता आहे, व नक्षत्रांचें आकर्षक सौंदर्यही आहे.

श्री गोपीनाथांच्या गाढ प्रज्ञेंत प्रकटलेला व गूढ प्रतिभेंत स्फुरलेला हा काव्य-कलाप रसलोलुप कवींना व तत्त्वान्वेषक विद्वज्जनांना अगदीं प्रथमदर्शनींच आकृष्ट करील व सदैव विलोभित ठेवील.

भगवान् बुद्धांचें जीवन केवळ काल्पनिक वाटण्याएवढें अद्भुत आहे. ‘ललितविस्तर’ ही त्यांची चरित्रकथा म्हणजे कल्पकतेनें वास्तवतेवर मिळविलेली एक विजयपताकाच होय ! जगप्रसिद्ध फ्रेंच संशोधक **सेनार्ट** याच्या मतें, बुद्धचरित्र ही एक काल्पनिक नवलकथा आहे. वास्तवतेशीं तिचा संबंध अत्यल्प आहे !

भगवान् बुद्धांचें जीवन हा जणूं काय आकाश-गंगेवरचा एक उत्तुंग तरंग आहे !

तुझ्या नामीं तुझ्या पायीं
तुझ्या कल्याणधर्माठायीं
तुझ्या आज्ञेकडे जाई
आश्रया मी

येई सहस्त्रकरा ! वरी
हिम हें कमलपत्रीं
उचलोनी टाक सत्त्वरीं
लाटेमाजीं.

ॐ मणिपद्मे हुम् बोला
मरीचिमाली उदेला
तेजःसमुद्रीं बुडाला
दंवबिंदु.



# पुरस्कार आणि आशीर्वाद

[ गुरु. न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांच्या आशीर्वादपूर्वक पुरस्काराने ग्रंथाला विशेष शोभा आली आहे. मजकूर उशीरा हातीं आल्यानें ग्रंथाचे शेवटीं टाकावा लागला आहे, पण जाणत्यांनी हा अर्थगर्भ पुरस्कार वाचून पुनः काव्यवाचन केल्यास त्यांना काव्याचें रसग्रहण विशेष उत्कटतेनें करतां येईल. ]

( १ )

नंदनवनींच्या पारिजात पुष्पांची हलुवार वर्षा, प्रशांत मरकत मण्यांची आकाशांतून सहज स्रवलेली पखरण, हिरकण्यांनीं जडविलेली मुक्तामाला, स्वतः सुंदरतेनेंच घडविलेली एक नक्षत्रपंक्ति !

— असे सहजोद्गार, या काव्यसंभाराच्या अवलोकनानें माझ्या मनांत प्रकटले !

येथें पारिजातकाचें पावित्र्य आहे पाचूंची, मरकत-मण्यांची शान्ति प्रद शीतलता आहे. हिरकण्यांची चमकदार तेजस्विता आहे, मुक्तामालेची मोहकता आहे, व नक्षत्रांचें आकर्षक सौंदर्यही आहे.

श्री गोपीनाथांच्या गाढ प्रज्ञेंत प्रकटलेला व गूढ प्रतिभेंत स्फुरलेला हा काव्य-कलाप रसलोलुप कवींना व तत्त्वान्वेषक विद्वज्जनांना अगदीं प्रथम-दर्शनींच आकृष्ट करील व सदैव विलोभित ठेवील.

भगवान् बुद्धांचें जीवन केवळ काल्पनिक वाटण्याएवढें अद्भुत आहे. 'ललितविस्तर' ही त्यांची चरित्रकथा म्हणजे कल्पकतेनें वास्तवतेवर मिळविलेली एक विजयपताकाच होय ! जगप्रसिद्ध फ्रेंच संशोधक **सेनार्ट** याच्या मतें, बुद्धचरित्र ही एक काल्पनिक नवलकथा आहे. वास्तवतेशीं तिचा संबंध अत्यल्प आहे !

भगवान् बुद्धांचें जीवन हा जणूं काय आकाश-गंगेवरचा एक उत्तुंग तरंग आहे !

अति-मानवतेचा, अतीन्द्रिय सत्तेचा आविर्भाव श्री तथागतांच्या जन्म-क्षणापासून तो त्यांच्या महानिर्वाणापर्यंत क्षणोक्षणीं व पदोपदी भेटत रहातो. तथापि इहलोकींचें सर्वसामान्य जीवन हेंच त्यांचें मुख्य लक्ष्य आहे. त्या जीवनाचा विकास कसा होईल, ही त्यांची अन्तरीची खरी तळमळ होती.

( २ )

गौतमबुद्ध हे तत्त्वज्ञ नव्हते, केवळ नीतिज्ञ होते. जीवनांत पदोपदीं उपयुक्त असलेले अनेक नैतिक नियम त्यांनीं जगापुढें मांडले हें खरें. पण आत्मविचार, ईश्वरविषयक व सृष्टयुत्पत्तिविषयक विचार यांना विशेष महत्त्व त्यांनीं दिलें नाहीं, अशी एक टीका त्यांच्या भूमिकेवर केली जाते. ती अत्यल्प अर्थानें खरी आहे असें म्हणतां येईल; तथापि, खरोखर पहातां भगवान् बुद्ध हे महान् दार्शनिक व सूक्ष्मदर्शी तत्त्वज्ञ होते, असें त्यांच्या भूमिकेचें सूक्ष्मतम संशोधन केलें असतां सुस्पष्टपणें प्रतीत होतें.

'प्रतीत्यसमुत्पाद' हा एकमात्र सिद्धांत त्यांना भारतीय दार्शनिकांच्या व जगांतील तत्त्वज्ञांच्या पहिल्या रांगेंत नेऊन बसवितो.

'प्रतीत्य' म्हणजे विशिष्ट परिस्थितीची प्रतिक्रिया म्हणून; व समुत्पाद म्हणजे उद्भव किंवा परिणाम. "हें एक असें असेल तरच तें दुसरें तसें असू शकेल." अशा तऱ्हेच्या संबंधाला इंग्रजीमधल्या तात्त्विक परिभाषेंत, 'Dependent Origination' असें म्हणतात. प्रत्येक गोष्टीचा 'समुत्पाद' म्हणजे उदय, अनेक कारणांनीं होत असतो. कोठलीही गोष्ट विशिष्ट पार्श्वभूमीवर उदित होत असते; त्या परिणामाला ती संपूर्णच पार्श्वभूमि अवश्यमेव उपस्थित असली पाहिजे.

'सं—बद्धता' हेंच सर्व वस्तूंच्या उद्भवाचें कारण आहे. वस्तूवस्तूमधील परस्पर-संबंध हे सर्व कार्यकारण भावांचें मूल-स्वरूप होय. कोणतीही वस्तू स्वयं-सिद्ध नाहीं, स्वतंत्र नाहीं, स्वयं-प्रभ नाहीं; तिचें अस्तित्व, तिचें स्वरूप **संबंध-जन्य** असतें. म्हणजेच, तिला खरें स्वत्व नसतें. बुद्धांचा सुप्रसिद्ध **क्षणिक-वाद** या तत्त्वावरच आधारलेला आहे.

मला वाटतें, ही विशाल सहसंबद्धता सदैव मानवी बुद्धीच्या कक्षेपलीकडेच रहाते. मानवी बुद्धीचा हा मर्यादितपणा हीच खरी 'अविद्या' होय,

याज्ञवल्क्य, व्यास, वसिष्ठ, शंकराचार्य यांच्याप्रमाणेंच भगवान् बुद्ध देखील **अविद्या** हें आदिमूळ मानतात. अविद्येंत संस्कार उद्‌भवतात; संस्कारांतून विज्ञान किंवा अहंकार अथवा जीवात्मा.

बुद्ध ज्याला विज्ञान म्हणतात तो खरोखर वेदान्त दर्शनांतला जीवात्मा होय. बुद्धांना अनात्मवादी म्हणतात याचा अर्थ, बुद्ध हे जीवात्म्याला अन्तिम सत्य मानीत नाहींत. एवढाच आहे.

अहंकारांतून–विज्ञानांतून नामरूप; नाम–रूपांतून षडायतन, म्हणजेच षडिन्द्रियें–चक्षु, श्रोत्र, घ्राण, जिव्हा, काया व मन, नंतर स्पर्श म्हणजे सृष्टिसंपर्क, स्पर्शानंतर वेदना; वेदनेंतून तृष्णा व शेवटीं तृष्णेंतून दुःख निर्माण होतें.

( ३ )

‘ प्रतीत्य-समुत्पाद ’ ही उपपत्ति गहन-गूढ प्रतीति शास्त्रावर आधारलेली आहे. बुद्धदर्शनांतील हें एक महनीय तत्त्वरहस्य आहे. आधुनिक विज्ञानाला आधारभूत असणारा ‘ **कार्य–कारण भाव** ’ हा मॅक्स प्लॅक, युंग, आईनस्टाईन वगैरे बहुतेक तत्त्ववेत्त्यांनीं ‘ अपुरा, अपर्याप्त, केवळ मर्यादित संदर्भातच उपयुक्त ’ असा मानला आहे; याचेंही स्पष्ट कारण सर्व वस्तूंची सह संबद्धता व Relativity, म्हणजे सापेक्षता होय. कोठल्याही कार्याला एकच कारण कधींही नसतें.

प्रतीति ( प्रति + ई ) या शब्दाचाच निरुक्तार्थ ‘ प्रतिक्रिया ’ असा आहे.

विविध पदार्थांच्या संपर्कानें ज्या अनुभूति येतात त्यांना प्रतीति असें म्हणतात. त्या प्रतीति येत असतां व आल्यानंतर, सृष्टीचा, जीवनाचा उद्‌भव होतो. हा सृष्टिसंपर्क सामान्यतः बन्धनात्मक व दुःखात्मक आहे. पण तोच संपर्क निर्वाणालाही कारणीभूत होतो. त्याचें अभावीं निर्वाणप्राप्ति असंभवनीय आहे.

या सृष्टिसंपर्काचा अन्तिम विकासबिन्दू म्हणजे मानवी प्रज्ञा. या प्रज्ञेला तारतम्य किंवा विवेक करतां येतो. जगांत किंवा जीवनांत दुःख आहे हें विवेकालाच समजूं शकतें. ‘ सर्वमेव दुःखं विवेकिनः । ’ हा भगवान् पतंजलींचा शोध गौतम बुद्धांना पटला होता.

प्रतीत्य-समुत्पाद हें तत्त्व अनंतमुखी आहे. सृष्टीचा समुत्पाद, जीवमात्राची उत्पत्ति, दुःखाचा उद्भव, प्रज्ञेची व निर्वाणाची प्राप्ति या सर्व समस्यांचें स्वरूप व उत्तर या एकाच तत्त्वाच्या आकलनानें चांगलें लक्षांत येईल.

प्रतीत्य-समुत्पादावर, नंतरच्या कालांत भारतीय दर्शनकारांनींही पुष्कळ व्याख्यान केलें आहे. भामतीकार वाचस्पति मिश्रांनीं हेतु-उपनिबंध, प्रत्यय-हेतुनिबंध, बाह्य व आध्यात्मिक असे विविध भेद कल्पून प्रतीत्य-समुत्पादाचें उद्बोधक विश्लेषण केलें आहे.

स्वतः भगवान बुद्धांनीं प्रतीत्य समुत्पादाचे अनुलोम व प्रतिलोम असे दोन विभाग सांगितले आहेत. अनुलोम विभागांत अ-विद्येपासून दुःखापर्यंत कार्य-कारणभाव सांगितला आहे; प्रतिलोम विभागात दुःखापासून पुनः अविद्ये-पर्यंत किंवा अविद्यानाशापर्यंत म्हणजे निर्वाणापर्यंत उपलब्ध होणारी कार्य-कारण परंपरा विशद केली आहे.

सुमारे २॥ हजार वर्षांपूर्वी एका वैशाखी पौर्णिमेच्या रात्रीं प्रफुल्ल कौमुदीच्या प्रशान्त प्रकाशांत भगवान बुद्धांना 'संबोधि' अवस्था प्राप्त झाली. त्या तत्त्वसाक्षात्काराचे प्रसंगीं 'प्रतीत्य समुत्पादा'चें महनीय तत्त्व त्यांच्या प्रतीतींत आलें.

चार आर्य सत्यें, अष्टांग मार्ग, निर्वाण हीं सर्व प्रतीत्य समुत्पादाचीं अन्य दर्शनें, स्वरूपान्तरें आहेत. प्रतीत्य समुत्पादामधून तीं सर्व उपलब्ध होतात.

'धर्म' ही संज्ञा त्यांनीं प्रतीत्य–समुत्पादाला दिली आहे. दीर्घ-निकाय (१४।३।१) या एका मूळ ग्रन्थामधलें वचन येथें उद्धृत करणें समुचित आहे.

'अधिगतो खो मे अयं धम्मो...गम्भीरो दुदुःस्सी दुरनुबोधी...निपुणो पंडित वेदनीयो।'

हें संपूर्ण वचन पहाणें बोधप्रद ठरेल.

(४)

जर्मन तत्त्वज्ञ शॉपेनहॉर व हार्टमन यांच्या सुप्रसिद्ध निराशावादाची गंगोत्री भगवान बुद्धांच्या विचारसरणींत आढळून येते. हे दोघेही तत्त्वज्ञ,

मानवी इच्छाशक्ति—Will – हें जगण्याच्या इच्छेचें मूळ आहे, असें मानतात.

‘ जिजीविषा ’, जगण्याची इच्छा व जन्माला आल्यानन्तर उत्पन्न होणाऱ्या आशा-आकांक्षा या सर्वांचा उगम इच्छा या तत्त्वांत आहे. ऋग्वेदांतील नासदीय सूक्तांत देखील, ‘ काम ’ म्हणजे ‘ इच्छा ’ या तत्त्वाला सृष्टीच्या उत्पत्तिक्रमांत अग्रस्थान देण्यांत आलें आहे.

कामस्तदग्रे समवर्तताधि ॥

या इच्छेलाच गौतमबुद्ध ‘ तृष्णा ’ अथवा ‘ तन्हा ’ समजतात. ही तन्हा मानवाला आपला गुलाम करते. या तन्हेच्या सर्वंकष पाशांतून मुक्त होणें याचें नांव निर्वाण अर्थात् मोक्ष. भगवान् बुद्धांच्या प्रतीत्य–समुत्पाद याचाही अन्तिम संदेश ‘ निरिच्छ होणें, अनासक्त होणें ’ असाच आहे. वेद, उपनिषदें व गीता या एकाच सत्याचा, **अनासक्तीचा** उद्घोष करतात. बुद्धाचें निर्वाण हें गीतेंतल्या ब्रह्मनिर्वाणाचा एक पुनरवतार होय !

बौद्ध धर्म हा वैदिक धर्माचा एक पूरक पंथ आहे. ईश्वर जसा एक आहे, अगदीं तसाच धर्मही एकच आहे. सर्व धर्म हे विविध पंथ **पंथ** आहेत. एकाच ईश्वराकडे नेणारे ते **अनेक** मार्ग आहेत. सर्व महापुरुष हे **धर्म-दर्शक** असतात. धर्म-संस्थापक कोणीही असूं शकत नाहीं. पूर्वी नसलेला असा नवा **धर्म** कोणीही स्थापन करूं शकला नाहीं व पुढेंही शकणार नाहीं.

धर्म हा स्वयंभू, स्वयंप्रकाश व स्वयंस्थापक आहे. धर्म पहाणारे ते ‘ द्रष्टे ’. धर्म सांगणारे ते ‘ उपदेष्टे ’, असा एक **द्रष्टा** व **उपदेष्टा** भारतांत अदमासें, इ. स. पूर्वी ४६७ व्या वर्षी जन्मला होता. लुंबिनी वनांत त्याचा जन्म झाला. जन्मदाती आई, राणी मायावती, सुमारें एक सप्ताह त्याला लाभली. नंतर गोतमी या त्याच्या पालनकर्त्या मावशी ? त्यांनीं त्या बालकाचें संगोपन केलें. त्याचे जनक, शाक्य राजे शुद्धोदन. सोळाव्या वर्षी विवाह. ऐंशीं वर्षें जीवन. ४५ वर्षें धर्मचक्रप्रवर्तन.

( ५ )

भगवान बुद्धांचा संबोधि कालांतील शोध व बोध म्हणजे एक त्रिसूत्र यज्ञोपवीत आहे.

पहिलें सूत्र 'प्रतीत्य समुत्पाद'; दुसरें सूत्र चार आर्य सत्यें; व तिसरें 'अष्टांग मार्ग.'

"प्रतीत्यसमुत्पाद" या विषयाचें अल्प विवेचन झालेंच आहे.

चार आर्य सत्यें म्हणजे, (१) सर्व जग दुःखमय आहे, (२) त्या दुःखाला कारण आहे; (३) तें कारण दूर करतां येते, व (४) त्याचा उपाय म्हणजे अष्टांग मार्ग.

अष्टांग मार्गाचीं तीन उपांगें आहेत; प्रज्ञा, शील व समाधि

प्रज्ञेमध्यें सम्यक् दृष्टि व सम्यक् संकल्प यांचा अन्तर्भाव होतो.

सम्यक् शीलामध्यें वाचा, कर्मान्त व आजीव ( व्यवसाय ).

समाधीमध्यें, व्यायाम ( प्रयत्न ) स्मृति व समाधि अशी तीन व एकंदर आठ अंगें होतात.

या अष्टांग मार्गाचे आठही अवयव वैदिकांच्या सहा ग्रन्थांत बहुतांशीं उपलब्ध आहेत. ते सहा ग्रन्थ म्हणजे शतपथ ब्राह्मण, गीता, योगवासिष्ठ, श्वेताश्वतर, बृहदारण्यक, व योगसूत्रें.

भगवान् बुद्धांनीं ते अष्ट अवयव पुनश्च संस्कारित करून तेजःपुंज व उपयोजनीय केले आहेत. प्रतीत्यसमुत्पादाचें चिंतन व आचरण याला भगवान् बुद्धांनीं 'ब्रह्मचर्य' अशी संज्ञा दिली आहे. शतपथ ब्राह्मणांत योगी याज्ञवल्क्यांनी, "ब्रह्मचर्य" हीच संज्ञा देऊन अविद्या-नाशाची वैचारिक साधना प्रकट केली आहे.

भगवान बुद्धांच्या चारित्र्याचें तत्त्वज्ञानाचें आकर्षण जगांतल्या व भारतांतल्या कवितत्त्वज्ञ जीवांना, अगदीं पूर्वकालापासून तो आजपर्यन्त आहे. एरवीं, एडविन् आर्नोल्ड या आंग्ल कविपंडितानें 'आशियाचा

प्रकाश ' हें बुद्ध-जीवनावरचें महनीय काव्य इंग्रजींत कसें लिहिलें असतें ?

श्री गोपीनाथांच्या या काव्यकुंजांत हिंडतांना श्री जयदेवांच्या गीत-गोविन्दांतील कातीव-कोरीव शब्दप्रयोगांचें मला सहज स्मरण झालें.

बुद्धदेवांना उद्देशून श्री जयदेवांनीं लिहिलेल्या दशावतार स्तोत्रांतील गीत-पंक्ति येथें उद्धृत करून हें मंगलाचरण संपवितों.

निन्दसि यज्ञविधेरहह श्रुतिजातम् ।
सदयहृदय दर्शितपशुघातम् ।।
केशव धृतबुद्धशरीर ।
जय जगदीश हरे ।।

धुं. गो. विनोद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम ५४५८२ दि. [illegible]
[illegible] २०१० [illegible] १५।३।०९
REFBK-0015581
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५८१

# शुद्धिपत्र

[ अर्थ लावून वाचल्यास वाचकाला अशुद्ध कोणतें व शुद्ध कोणतें हें सहज समजतें. या पानावर फक्त ढोबळ आणि अगदीं विरुद्ध किंवा विचित्र अर्थ होईल अशींच अशुद्धं दुरुस्त केलीं आहेत. ]

| ओळ | पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २५ | ६३ | माझें | माझें |
| २५ | ७२ | ध्यांना स्थित | ध्यानस्थित |
| १ | ८० | रक्षण | रक्षक |
| १८ | ८३ | वधू | वधूं |
| ९ | १११ | माझे | मासे |
| १४ | ११४ | महाप्रजापति | महाप्रजावति |
| १३ | १२१ | वासनायुक्त | वासनामुक्त |
| २ | १३९ | अभिनंदन | अभिवंदन |